उत्तर अमेरिकेतील मराठी लेखकांसाठी कथास्पर्धा

फाऊंडेशन

॥ जतन भाषेचे, रक्षण संस्कृतीचे ॥

# एकता फाउंडेशन

# व

# अक्षयभाषा संस्था

# आयोजित

# कथास्पर्धा २०२३

# ई-पुस्तक

# वर्ष चौथे

# मूळ स्त्रोत

एकता त्रैमासिक : १९७९-२०१९

स्थापना : २०२०

संस्थापक :

श्री. विनायक दा. गोखले

# एकताची वाटचाल

नमस्कार मंडळी,

एकता त्रैमासिक बंद झाल्यावर उरली सुरली गंगाजळी आम्ही 'चॅरिटेबल एकता फाउंडेशन' स्थापन करून त्यामध्ये जमा केली व त्यातूनच ही कथास्पर्धा आयोजित केली आहे. पुढील अनेक वर्षे आम्ही ती चालू ठेवणार आहोत.

टोरांटो, कॅनडा येथून प्रसिद्ध झालेल्या एकता त्रैमासिकने ४१ वर्षे पूर्ण करून ऑक्टोबर २०१९च्या अंकाबरोबर आपणा सर्वांचा निरोप घेतला. उत्तर अमेरिकेत मराठी भाषा आणि संस्कृती टिकून राहण्यासाठी एकताने अनेक उपक्रम ह्या ४१ वर्षात हाती घेतले. 'अक्षयभाषा संस्था देखील मराठी भाषा टिकवण्याचा प्रयत्न करते आहे.

आर्किटेक्ट, इंजिनिअर, डॉक्टर अशा निरनिराळ्या व्यवसायातील आपण ४०-५० वर्षांपूर्वी इकडे आलो आणि येताना आपली भाषा, आपली संस्कृती तसेच साहित्य व कला यांचे संस्कार बरोबर आणले. कोणत्याही प्रकारच्या आर्थिक फायद्याची अपेक्षा न करता काहीतरी वेगळे करण्याचे प्रयत्न आपल्यातील काही ध्येयवेडी व हरहुन्नरी मंडळी करत राहिली त्यातूनच एकता त्रैमासिक किंवा अक्षयभाषा यांसारखे उपक्रम उत्तर अमेरिकेत सुरु झाले.

**-विनायक दा. गोखले**
**एकता फाउंडेशन**

अक्षय भाषा AKSHAYBHASHA

A non-profit organization in Mesa, AZ, USA Tax ID # 30-0280809

**https://akshaybhasha.org/akshaybhasha-title-song/**

Through Akshaybhasha-
https://akshaybhasha.org

Donate to –
Pallium, India
(https://palliumindia.org/)

JnanaPrabodhini, Solapur
(www.jnanaprabodhini.org)

## ॥ जतन भाषेचे, रक्षण संस्कृतीचे ॥

# कथास्पर्धेविषयी थोडे –

उत्तर अमेरिकेतील मराठी भाषकांना नमस्कार,

एकता फाउंडेशन-अक्षयभाषा कथास्पर्धेतील दुसरे पुष्प वाचकांना अर्पण करताना आनंद होतो आहे. उत्तर अमेरिकेची (यु.एस.ए.+कॅनडा) ही अमराठी भूमी हे आपले सर्वांचे कर्मक्षेत्र. या स्पर्धेच्या निमित्ताने मायबोलीला जपणारे एकत्र येतात, आपल्या लेखणीची धार आजमावून पाहतात, अमेरिकन मराठी सारस्वताची जोपासना करतात. काहींच्या लिखाणात अजूनही स्मरण-रंजन (नॉस्टाल्जिआ) आहे, भारतीय बाज आहे तर काहीजण हा चष्मा बदलवून नवीन नजरेने जग बघण्याचा प्रयत्न करताहेत हे जाणवतं. हा होणारा बदल अनिवार्य आहे आणि तो कुठलेही निर्बंध न ठेवता होऊ द्यावा.

उत्तर अमेरिकेतील मराठी लेखकाने डोळसपणे आजूबाजूचे जग अनुभवावे आणि जास्तीत जास्त प्रामाणिकपणे ते आपल्या लेखणीतून टिपावे. ही प्रक्रिया स्वागतार्ह आहे. कारण वाचकासमोर एका विशिष्ट चौकटीतले, गुळगुळीत साहित्य ठेवण्याऐवजी ताजे, दमदार, अगदी नवीन असे साहित्य निर्माण व्हावे, हेच या कथास्पर्धेचे उद्दिष्ट आहे. उत्तर अमेरिकन मराठी लेखकाकडून एका वेगळ्या अनुभूतीची अपेक्षा आहे. या स्पर्धेच्या प्रवासातून 'उत्तर अमेरिकन मराठी साहित्य' असा वेगळा वाङ्मय प्रवाह निर्माण होऊन एकता मासिकाने अतिशय निरलसपणे अखंड सुरु ठेवलेल्या या कथास्पर्धेला ऐतिहासिक महत्व प्राप्त व्हावे, हीच सदिच्छा !

मराठी भाषेवर असाच लोभ असू द्यावा !

सस्नेह,
भाग्यश्री बारलिंगे
अक्षयभाषा

कथांचे प्रकाशन हक्क लेखकांकडे.
All rights reserved by the writers

The characters and events portrayed in this book are fictitious. Any similarity to real persons, living or dead, is coincidental and not intended by the author.

No part of this book may be reproduced, or stored in a retrieval system, or transmitted in any form or by any means, electronic, mechanical, photocopying, recording, or otherwise, without express written permission of the publisher and the writers.

Year of publication २०२३
Created in the United States of America

# अनुक्रमणिका


मुखपृष्ठ १

मूळ स्रोत २

एकताची वाटचाल ३

अक्षयभाषा ४

कथास्पर्धेविषयी थोडे ५

प्रकाशन हक्क ६


## ***कथास्पर्धा २०२३ - परीक्षक***


**डॉ. विद्युल्लेखा अकलूजकर (९-१०)**

**मोहना प्रभुदेसाई जोगळेकर (११-१३)**

**संजय गोखले (१४)**

# कथास्पर्धा २०२३ - विजेत्या कथा

प्रथम क्रमांक- वारी - प्राजक्ता पाडगांवकर (१५-२१)

द्वितीय क्रमांक- दोन शब्द- प्रियदर्शन मनोहर (२३-२७)

तृतीय क्रमांक-(विभागून)-

परतफेड -गिरीश देसाई (२८-३६)

कणा-श्रद्धा भट (३७-४३)

# कथास्पर्धा २०२३ - उल्लेखनीय कथा

नातिचरामि -अमृता देवधर (४३-५०)

घर- प्रगती नाडकर्णी (५०-५७)

बीज अंकुरे, अंकुरे -चित्रा मेहेंदळे (५७-६१)

कृष्ण-धवल -सागर साबडे (६१-६७)

वेताळ- डॉ. शिरीष कीर्तने (६७-७१)

************************************************************

# परीक्षकांची ओळख :

## डॉ. विद्युल्लेखा अकलूजकर-



**Bio Data : A Self-portrait**

**A poet, philosopher, friend and lover,
a writer, an editor, and avid reader,
a hiker, a biker, a Sun-Run-walker,
a compost-maker, and zucchini-loaf-baker,
gardening-prize-winner, wisteria-grower,
sighted on a sunny day beside the rose-bower,
an artist who knits, snaps pictures and paints,
sells items at craft fairs and plants at garage sales,
She'll be at the film fests volunteering every year and
the meals on wheels once a week will deliver.
She can cook delicious meals and tame wild beasts!
She'll talk to the birds and the dogs and the trees.**

**She can change from a denim to a saree in a jiffy and**
**attend fine functions hiding nails torn n' scruffy,**
**write research papers when she's not writing poems and**
**travel when she can 'tween her two distant homes.**
**Why ask for more?**
**You can never quite surmise All that a woman can do without a price.**
**Why ask for more?**
**You will never succeed Trapping in words my life indeed.**

विद्युल्लेखा अकलूजकर यांचे मराठीतील निवडक साहित्य:

स्वतंत्र पुस्तके:

१. मेरा जूता है जापानी (ग्रंथाली, मुंबई. १९९०)
२. यथा काष्ठं च काष्ठं च (देशमुख आणि कं. पुणे. १९९१)
३. मेपलची पाने (ग्रंथाली, मुंबई. १९९७)
४. कहाणी (देशमुख आणि कं. पुणे. १९९८)
५. शब्दवेध (मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई. २००५)
६. दर्पणी पाहता रूप (मेहता प्रकाशन, पुणे. २०११)

जागतिक कथानुवाद-संग्रह : अठरा धान्यांचे कडबोळे - (मेनका प्रकाशन, पुणे. २००४) या संग्रहास साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक केन्द्राचा "बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार" २००४ ते २००७ मधील उत्कृष्ट अनुवादासाठी दिला गेला.

संपादित साहित्य: १. आजीच्या सुपातील मोती [गोमंतकीय म्हणींचा कथारूप परिचय; लेखिका- कमला ग. वाघ] विवेचक प्रस्तावना आणि म्हणींच्या सूचीसह. (स्वाध्याय पब्लिकेशन्स, रिचमंड, कॅनडा. १९९५)

२. विदेशिनी - 'एकता' टोरांटो या त्रैमासिकातील निवडक कथांचा संग्रह (एकता प्रकाशन, टोरांटो.२००१)

***********************************************************

# मोहना प्रभुदेसाई जोगळेकर



**कथासंग्रह:**

**रिक्त : मेहता प्रकाशन - जुलै २०१८.**

**मेल्टिंग पॉट - उन्मेष प्रकाशन - कोकण मराठी साहित्य परिषदेचा उत्कृष्ट कथासंग्रहाचा पुरस्कार.**

**लेखमालिका/सदर:**

**ओऽऽ ड्युड - लोकसत्ता - व्हिवा पुरवणीसाठी अमेरिकेतील शालेय विद्यार्थ्यांच्या जीवनावर वास्तववादी लेखमालिका.**

**बृहनमहाराष्ट्रवृत्त (BMM) - अमेरिकेतील भारतीयांच्या जीवनावर आधारित लेखमालिका.**

**कॅलिडोस्कोप - श्री. व सौ. मासिकाकरता विविध विषयावरींल लेखमालिका.**

**तरुणाई - रत्नभूमी वर्तमानपत्राकरता दर आठवड्याला सदर. यातून महाविद्यालयीन जीवनावर लेखन.**

**इतर:**

**माझं गाव - श्री. व सौ. - लेखकाचा गाव सदराअंतर्गत माझ्या गावाला प्रसिद्धी.**

लोकमत वर्तमानपत्र - ग्लोबल कोकणी या विशेष पुरवणीतून लोकमतने मुलाखत/ओळख प्रसिद्ध.
लोकसत्ता - चतुरंग, लोकरंग, लोकमत, साप्ताहिक सकाळ, दैनिक सकाळ, रत्नागिरी टाइम्स, प्रहार, रत्नभूमी, दिव्यमराठी इत्यादी अनेक वर्तमानपत्रांतून वर्तमान परिस्थितीवर लेख सातत्याने प्रसिद्ध.

दिवाळी अंक/मासिकं:
मायमराठी (मॅजेस्टिक प्रकाशनचा BMM साठी खास अंक), श्री. व सौ., सामना, कथाश्री, प्रसाद, मेहता ग्रंथ जगत, आवाज, कॉमेडी कट्टा, अनुराधा, कुबेर, कोकण दिनांक अशा भारतातल्या तर फ्रान्स महाराष्ट्र मंडळ, माझ्या मराठीचा बोल, अभिरुची, Marathi Culture And Festivals या भारताबाहेरच्या आणि आंतरजालीय - डिजीटल दिवाळी, मायबोली, मनोगत या दिवाळी अंकासाठी लेखन. माहेर, श्री. व. सौ., महिला प्रबोधिनी इत्यादी मासिकासाठी कथा/लेख लेखन.

एकांकिका लेखन:
वेषांतर - सांगलीहून तामिळनाडूत स्थलांतर केलेलं एक कुटुंब, त्या घरात स्वार्थकरता सद्यकाळातही पाळली जाणारी 'आलवण' संस्कृती आणि ती उघडकीला आणून आलवणात राहणाऱ्या तिला, मुक्त करण्याचा प्रयत्न करणाऱ्या वार्ताहारांची हृद्य गोष्ट म्हणजे सत्यघटनेवर आधारीत एकांकिका. याचे रॅले, शार्लट, क्लिव्हवलंड येथे प्रयोग.
कथाकथन:
हलक्याफुलक्या तसंच वेगळ्या विषयांना स्पर्श करणाऱ्या कथा कथाकथनातून

**सादर: न्यू इंग्लड - बॉस्टन, टॅम्पा - प्लोरिडा, पीट्सबर्ग, न्यूयॉर्क, वॉशिग्टन डी. सी., विन्स्टन सेलम, शार्लट, रॅले येथे तसंच अनेक घरगुती कार्यक्रम**

**अभिनय, दिग्दर्शन, निर्माती आणि अभिव्यक्ती संस्था:**

**गेल्या अकरा वर्षात स्वत:च्या अभिव्यक्ती संस्थेद्ववारे भिंत, महाभारताचे उत्तररामायण, वेषांतर, भेषांतर, खेळ, सांगायचं राहिलंच, धोबीपछाड, भारत एक खोच यासारख्या प्रायोगिक, विनोदी, रहस्यमय, गंभीर एकांकिका तर डंख, मंतरलेली चैत्रवेल यासारख्या नाटकांचं मंडळातील कलाकारांना घेऊन मुख्य रंगमंचावर व्यावसायिक दर्जाचं सादरीकरण. यातील काही एकांकिका क्लिववलंड - ओहायो,  ओरलँडो, टॅम्पा - फ्लोरिडा, रॅले - नॉर्थ कॅरोलायना येथे सादर.**

**रिचमंड - व्हर्जिनिया, रॅले, शार्लट - नॉर्थ कॅरोलायना इत्यादी मंडळांच्या विविध स्पर्धांसाठी परीक्षक म्हणून काम.**

**व्यवसाय: वेब प्रोग्रॅमर.**

**मराठी शाळा - २०१४ पासून शार्लट, अमेरिका येथे मराठी शाळा.**

**अनुदिनी: https://mohanaprabhudesai.blogspot.com/**

**अभिव्यक्ती: https://www.youtube.com/c/AbhivyaktiTheater**

************************************************************

# संजय गोखले



संजय गोखले हे मूळचे मुंबईकर असले तरी १९९९ पासून नोकरीच्या निमित्ताने त्यांचे वास्तव्य अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरात आहे. गेली २४ वर्षे ते न्यूयॉर्कच्या महाराष्ट्र मंडळात सक्रिय असून, २०२३ सालासाठी मंडळाचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली आहे. २००३ साली न्यूयॉर्कमध्ये झालेल्या बृहन्महाराष्ट्र मंडळांच्या संमेलनात श्री. गोखले ह्यांचा सहभाग होता. गेली अनेक वर्षे त्यांनी एकता, एकोपा ह्या त्रैमासिकांत, तसेच रंगदीप ह्या दिवाळी अंकात कविता, कथा, लेख असे विविध लेखन केले आहे. तसेच रंगदीप दिवाळी अंकातील काव्यस्फूर्ती स्पर्धेसाठी परीक्षक म्हणूनही काम पाहिले आहे. त्यांच्या कथांना एकताच्या, तसेच अक्षयभाषा संस्थेच्या वार्षिक कथास्पर्धेत सातत्याने पारितोषिके मिळाली आहेत. २०२१ साली श्री. गोखले ह्यांच्या ‘मावळतीचे रंग’ या कथासंग्रहाचे मुंबईत प्रकाशन झाले. लेखनाबरोबरच श्री. गोखले ह्यांनी २०१०-११ मध्ये बृहन्महाराष्ट्र मंडळांच्या 'बृहन्महाराष्ट्र वृत्त' ह्या मासिक मुखपत्राचे संपादनही केले होते. २०११ साली न्यूयॉर्क महाराष्ट्र मंडळाच्या ‘स्नेहदीप’ ह्या ई-त्रैमासिकाची त्यांनी सुरवात केली.

************************************************************

**प्रथम क्रमांक**

**वारी**

**लेखिका: प्राजक्ता पाडगांवकर**

"पायात जोडवी नाही घालत माऊली?" आवाज आला तशी अलिशा वर बघू लागली, एक पोरसवदा सावळा उंच मुलगा, मळखाऊ सदरा, विटकी जीन्स, गळ्यात तुळशीमाळ घालून गर्दीत तिच्या मागेच उभा होता! आज वारी लोणी काळभोर इथे मुक्कामी होती, तिथल्याच मंदिरात रात्री कीर्तन सुरु होतं, म्हणून अलिशा इतर मंडळींसोबत बसली होती...पाय दुखत होते म्हणून बसल्या बसल्या ती हलके पाय चेपत होती...
ह्या आगाऊपणाचे तिला फारसे वाटले नाही, देहू ते लोणी काळभोर तिच्या ते अंगवळणी पडले होते! हे लोक चट्कन हक्क गाजवतात परक्यावर, मदत करतात तशी टीका देखील सढळपणे करतात, कुतूहल दाबून ठेवत नाहीत, सगळं थेट! हा मुलगा त्याला अपवाद नव्हता! मात्र वारकरी वाटत नव्हता!
पुन्हा वर बघून उत्तर द्यावं तर दिसेनासा झाला, तेवढ्यात कोणी पायाला स्पर्श केला अलिशाच्या! गांगरून खाली बघितलं तर चक्क तोच मुलगा, हलके हलके तिचे पाय चेपून देत होता! त्याच्या स्पर्शाने ती अवघडून गेली...ही अंगचट तिला वेगळीच वाटली...
"अहो, काय करताय? पाय कसला धरलात?" काहीशा वैतागाने बोलली...
"माऊली, निवांत बसा, परका समजू नका, थोडं पुण्य जमा करतोय बघा, सेवा करून, पाय दुखतात ना? देतो चेपून, तुम्ही ऐका, महाराज कीर्तन लै गोड करत्यात...बसा बसा अशा टेकून बसा...म्या अबीर, म्या पन वारीत चालतोय, नारायण शेवेत हाय जी..."
"ओह, हम्म..." का कोणास ठाऊक अलिशाने त्याला पाय चेपू दिले, तो ज्या प्रकारे कमी हलक्या दाबाने पाऊल चेपत होता, तिच्या मांसल तळव्यात पेर रुतवून हलके दाबत होता, अगदी प्रत्येक शीर माहित असल्यागत, घोटा,पाऊल हलके घुसळत, त्याने कुठूनसे एक बाम काढून तिच्या पायाला लावले आणि त्याच्या मांडीवर पावले ठेऊन तोही कीर्तन ऐकू लागला...सगळे अगदी सहज, त्यात कोणताही वासनेचा अंतर्भाव नव्हता, कोणताच आविर्भाव नव्हता. अलिशा किंचित शहारली, सैलावली, तरी सावधपणे तिने पाय परत जमिनीवर ठेवले. मागे टाळ मृदूंग दुमदुमत होता, त्यात तिचे चोरटे थँक यू हरवलेच बहुधा, त्याच्या कानापर्यंत पोचायच्या आधी! त्याने मंद स्मित करत पुन्हा हरिनामाचा ठेका धरला!

रात्री निजानीज सुरु झाली, अलिशा बॅकपॅक घेऊन एका कोपऱ्यात विसावली. दुसऱ्या दिवशी आन्हिकं आटोपून, ट्रक मधून नवीन कुर्ता काढून जुना त्यात टाकून ती पुन्हा दिंडीत सामील झाली...
'बोला पुंडलिक वरदे हाSSरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम! बोला पंढरीनाथ महाराज की जय! तुकाराम महाराज की जय!'
'जय हरी विठ्ठल, जय जय विठ्ठल, विठ्ठल विठ्ठल...'
सर्वदूर गुलालासारखा उधळलेला नामगजर, एकच नाद... पांडुरंगाचा!

लाखो पाऊले चालत निघालेली, एकच वाट- भक्तीची,एकच ध्येय- विठुरायाचे दर्शन! कोणताच दंभ नाही, दर्प नाही की अहंकार नाही, प्रत्येकाची व्यथा निराळी, कथा निराळी तरी प्रत्येकाची पाऊले एकाच वाटेने निघालेली, ओठी हरिनामाचा गजर! प्रत्येक पाऊल भक्तिमार्गावर, प्रत्येक गाव, शहर, रस्ता भक्तिमय, प्रचंड जनसागर नामगजरात भिजून गेलेला!

आज जरा हळूच चालावे असे ठरवून अलिशा चालू लागली, तिच्या दिंडीतल्या इतर बायका देखील चालत होत्या, रख्मा आणि सिद्धी तिला दिंडीत भेटल्या होत्या, त्यांचा आधार होता, मात्र त्यांचे आणि तिचे जग खूप खूप निराळे होते!
आज त्या दोघी पहाटे उठून लवकर चालायला लागल्या होत्या, त्यामुळे इतर गर्दीचा आधार घेत ओठातल्या ओठात जय हरी विठ्ठल पुटपुटत अलिशा निघाली...
अलिशा मकरंद प्रिया! पत्रकारितेची विद्यार्थिनी! टाइम्स ऑफ इंडिया, पुढे वॉशिंग्टन पोस्ट अशा नामवंत संस्थांसोबत काम केलेली, संस्कृतचा प्राध्यापक असलेला जर्मन नवरा आणि ती, अमेरिकेत गेली दहा एक वर्ष राहणारी ती एक बेदरकार मुलगी! मूळची बांद्रयाची, प्राध्यापक आई वडिलांची एकुलती एक लेक! जगभर फिरलेली!
रख्मा मूळची देहूची, आता पिंपरीला स्थायिक, नवऱ्याने टाकली, स्वतःला पोसून एकटी राहणारी!
सिद्धी जेमतेम तेवीस चोवीसची, दरवर्षी आजी आजोबा वारीत सामील होत, कोविडने दोघांना हिरावून नेले, म्हणून पहिल्यांदाच वारीत आली होती! आकुर्डीपासून चालू लागली होती...
प्रत्येकीची गोष्ट निराळी...प्रत्येकीला विठ्ठलाला विचारायचा जाब निराळा!

अलिशा चालू लागली तसे दिवस उजाडू लागला, नाश्ता करून निघाली,ओळखीचा कोलाहल सभोवताली होता, मनातला कोलाहल आणि भोवतीचा निराळा, दोन्हीच्या गुंगीत ती चालत राहिली...
दुपार होऊ लागली तसे नारायण सेवक दिंड्यांमधून पाणी, सरबत वाटू लागले, जेवणाचे द्रोण रस्त्याच्या कडेने वाटले जाऊ लागले, आपापल्या दिंड्यांचे नियम सांभाळत मंडळी चालत होती, थांबत होती...जेवणं आटोपून पुन्हा चालू लागत होती! यवत गाठायचे होते! नारायण सेवक बघून अलिशाला अबीर आठवला! काल घडल्या प्रकारानंतर पुन्हा दिसला नव्हता तो. असे डोक्यात यायला आणि दुरून अबीर यायला एकच गाठ पडली! गर्दीत ओळखीचा तोंडवळा दिसला की उगीचच हायसं वाटतं, तसेच काहीसे अलिशाचे झाले!
“माऊली जेवल्या का?” अबीरने सहज विचारले,
अनोळख्या उत्साही स्वरात अलिशा हसून हो म्हणाली! ‘एवढे अगदी काय?’ असे आतून वाटत असताना तिला अचानक त्याचे असे दिसणे हायसे वाटत होते!
“तुम्ही आता कोणत्या दिंडीत चालणार? का तुम्ही ट्रक मधून येता?” अलिशाने प्रश्न केला
“माऊली चालतोय मी असाच, कोणाला मदत लागली, काही दुखलं खुपलं तर सेवा करत करत म्या बी चालतोय...” अबीर आणि तिची पावले सहज एकत्रित पडत दोघेही चालू लागले. तोही फार मोठ्याने न

बोलता चालत होता, त्याचा अवतार कालच्यासारखाच होता, पुन्हा विटकी जीन्स मात्र कुर्ता आज श्रीखंडी रंगाचा होता...

“कितवी वारी तुमची अबीर?”

“जी तशी पहिलीच...नारायण सेवक म्हणून, आधी आईच्या पोटातून गेल्तो, मग आज्याच्या खांद्यावरून एकदा...पहिल्यांदा जातोय...”

बोलताना त्याचे स्वरयंत्र किंचित वर खाली होत होते, गळ्यात तुळशीमाळ होती, पायात कोल्हापुरी चपला होत्या,खिशातून मोबाईलचा आयत दिसत होता. पाठीवर एकही बॅकपॅक नव्हती, पिशवी नव्हती, बहुधा सामानासोबत असेल. अलिशाच्याकडे बरेच सामान होते, वॉकिंग शूज, बॅकपॅक, त्यात एक पाण्याची बाटली, तीन चार प्रोटीन बार, टिशू, टूथब्रश, पेस्ट, कंगवा, लिपबाम, औषधं, मोबाईल, वॉलेट, पासपोर्ट, तिची कॅन्सरच्या रिपोर्ट्सची फाईल आणि मुंबईच्या फ्लॅटच्या किल्ल्या. डीएसएलआर कॅमेरा आणि एक पुस्तक. दिलीप चित्रेंचे ‘सेज तुका’

पाच फूट सहा इंचाची छबी, कृश देह, बारीक कापलेले केस, गोरटेला वर्ण आणि निळी करडी ‘ओस्प्री मीरा २२’ बॅकपॅक...उठून दिसावी इतका वेगळा अवतार होता तिचा वारीत!

अबीर अगदीच सडा, सहा फुटी देह, शिडशिडीत, सावळा सुकुमार रंग, कुरळे केस, काही रुपेरी तारा अधून मधून डोकावणाऱ्या! मोठाल्या ढांगा टाकत अगदी चार दिवसात अंतर पार करेल पंढरपूरपर्यंतचे असेच वाटत होते, मात्र तो हळुवार अलिशाच्या सोबतीने चालत निघाला होता. साडेचार पाचला वारीचा वेग मंदावला, वाटेतले गावकरी चहा घेऊन सेवेस आतुर होतेच, यवत आता दूर नव्हते...अबीर कुठूनसा दोन चहाचे कप घेऊन आला, झाडाच्या आडोशाला थांबून दोघे चहा पिऊ लागले.

“तुम्ही एवढी मोठी पिशवी का घेतली सोबत माऊली? इतकं ओझं घेऊन कशाला चाललाय?”

“अरे, सामान लागत राहतं, मला सवय नाही ह्या सगळ्याची, मी माझे माझे सामान सोबत ठेवते इतकंच”

“तरी ओझं लै आहे बघा पाठीवर, दिसतंय की!”

“तुझी पिशवी कुठे आहे?”

“जी फार लागत नाही, वारी समद्यांना खाऊ पिऊ घालिते, तो बोलावतो तशी खातीर पण करतोय, फकस्त इस्वास हवा! आपणपण झोकून द्याया हवं मंग त्यो झेलील ना! ताठा ठेविला की त्याला पन वाटतंय झाड उभं हाय तर चिंता न्हाय! झुकलं की बरं पडतं, ओझं राहत न्हाई! इस्वास लै सोप्पा असतोय, पाऊल टाकितो ना, त्या सहजतेने ठिवून द्यायचा! आपन लै चिकित्सा करतोय, पृथ्वी गोल कशी, तिचा येग किती? पाऊल कसं टाकू? त्याला कोणत्या बुटाने झाकू? किती खाल्लं की बरं, किती पानी प्यावं? काहीच्या काही मोजू लागलोय आपन, म्हणजे मोजायचं त्यो कुटे काय बोलतोय? इतकी रानफुलं असत्यात पठारावर, किती असली तर सुंदर दिसत्यात? इतक्या चांदन्या असल्या की रात्र नटते? किती काजवे पेटले की रान जादुई व्हतंय? किती थेंब पडले की पाऊस, पाऊस व्हतो?

मंत्रचाळी प्राणी असतोय माणूस बघा! अगदी लहान लेकरागत, एक दोन तीन मोजू लागला की त्योच नाद! एकमेकांना भेटावं बोलावं वाटलं की मद्ये आकडे - फोनचे ओ, मग जगातला समदा तंत्रज्ञाचा पसारा गनितावर! अर्रर! पन मर्दा, ईठू काय मागितो व्हय? शबूद पन न्हाय, शांत समाधानात ऱ्हावा! त्याला भेटा किंवा नको, त्यो ते पन सांगत न्हाय! तुक्याला ते समजलं, ज्ञानोबाला आधीच उमगलं मात्र आपन असे इथेच, निस्ते चालतो पन ईठू गावल कसा, त्याचे काय न्हाय! आतली कविता नीट उमगली पायजे न्हवं? आतल्या गाभाऱ्यात ईठू हवा, त्यो गाभारा इतका कचऱ्याने भरलेला आनी आपल्याला रस्त्यावरली घान खुपती...आतली बोचकी,ओझी फेकली की काय लागतं मानसाला? भडाभडा बोलून टाकावं भ्या, सोडून द्यावा राग! तो सोबत असतोय कायम!

चला माऊली यवत गाठायला हवं..."

अलिशाला अजबच वाटत राहिला हा, नेमके वय समजेना, मुद्दा कळेना, सामान कुठे विचारलं तर काहीही बोलतोय ! तरी त्याची सोबत होती, वाट सहज सरत होती! दिवसभरात ती फारशी दमली नव्हती! पाय दुखले नव्हते. साडेसहापासून जलद गतीने चालत मंडळी यवत मुक्कामी पोचली. जेवणं, कीर्तन आणि निजानीज, रोजचा क्रम साधारण ठरलेला!

आज कीर्तन ऐकायचे नव्हते, ती व्हरांड्यात बसून डायरी लिहीत होती, रोजची सवय, वारीचे अनुभव टिपून ठेवत होती! गेली दोन तीन दिवस त्यात सतत अबीरचा उल्लेख होता! मोठाच विलक्षण मुलगा, बोलायला लागला की नेमकं कशाबद्दल बोलतोय कळेना, वय फारसे वाटले नाही, तरी काहीतरी संचित होते त्याच्याकडे, त्यातूनच बोलत असावा बहुधा...स्वतःबद्दल काही विचारावे सांगावे, तर तसे काही संभाषण होत नाही, मात्र मनकवडा आहे पक्का, काल पाय चेपून दिलेन, आज सोबत होता दिवसभर. तिच्या मनात यायच्या आधीच गरज ओळखून हा पठ्ठ्या मदत करत होता. मधूनच कुठे गायब होई, मग परत येतो अगदी सहज. काय तर म्हणे तिच्याकडे ओझे जास्त होते! ह्याला काय ठाऊक किती बॅगेज होते तिचे! इमोशनल, फिजिकल...

वरवंड, उद्वाडा करत करत तीन दिवसांनी पालखी बारामतीत शारदा विद्यालयात पोचली! दोन दिवस रख्मा सिद्धी मुक्कामी पण दिसल्या नव्हत्या. अलिशा काहीशी भिरभिरली गर्दीत. बहुधा सगळे मुक्कामी भेटत...बारामतीत रख्मा दिसली! बघताच अलिशाला मिठी मारली! "माऊली कुठे होतात? दिसला नाही दोन दिवस"

"अगं मी तेच विचारणार होते!"

"अहो माझी चुलती आलेली भेटायला, तिच्या घरी गेले, आज सोडलंय चुलत्याने परत"

"अच्छा असं मध्येच जाता येतं का कुठे? मला माहित नव्हतं!"

"हा म्हणजे काही कोणी बोलत न्हाई, सांगून जायचं म्हणजे सोप्पं पडतं"

सिद्धी देखील तेवढ्यात आली, "माऊली! हे मलम ठेवा, मी काल घेऊन आले तुमच्यासाठी!"

अबीरने लावून दिले असे अलिशा बोलणार होती, मात्र राहून गेलं ते, बाकीच्या गप्पात!

ती बोलत होती खरी, मात्र मनात विचारांची चक्रे सुरूच होती, खरेतर ही कोण माणसे होती? अगदी दहा दिवसापूर्वी त्यांचे- तिचे जग इतके भिन्न होते आणि आज त्यांचे तोंडावळे बघून हायसे वाटत होते! त्यांचे हसणे लोभसवाणे वाटत होते! मन आणि दृष्टी त्यांच्यासाठी आसुसत होती! त्यांना तिच्यात विठ्ठल कसा दिसत होता कोणास ठाऊक, तिला मात्र अजून दिसला नव्हता!

अलिशा नुकतीच कर्करोगातून मुक्त झाली होती, तात्पुरती कदाचित... सहा किमो सायकलने केस गेले होते, त्वचा काळवंडली होती, पुरती रया गेली होती! खांद्याची हाडं वर वर आली होती आणि गालफडं बसली होती! हळूहळू ट्रीटमेंट संपली, केस अर्धे पिकलेले, अर्धे काळे परत आले, वर्ष सरलं कॅन्सर फ्री होती!
आजारपणात दिलीप चित्रेंचं 'सेज तुका', नुसतं पारायण केलं! सरेंडर काय प्रकार आहे? एवढी कशी कोणी लीनता अनुभवू शकतं? झोकून द्यायचे, विसंबून राहायचे कसे? स्वतःच्या कर्तृत्वात अढळ उभं राहायला शिकल्यावर स्वतःवर विसंबून न राहता मऊ होऊन शरण जायचे त्या परमात्म्याला,कसे? कोण असतो तो? असेल जरी कोणी मोठी शक्ती, ती आपल्याला कशाला मदत करेल? विश्वाचा इतका पसारा, काहीच गरज नाहीय आपल्याकडे लक्ष देण्याची! मलाच का कॅन्सर झाला?? अलिशाचे प्रश्न तिला भेडसावत होते! शेवटी तिने अवचित निर्णय घेऊन टाकला, वारीला जायचा! मार्टिन येऊ शकणार होता, समर ब्रेक होता खरेतर, पण तिला एकटीला वारी करायची होती. बोस्टन एअरपोर्ट ते मुंबई, मग देहू अशी येत, आता गेले अनेक दिवस वारीत चालत होती! तिला उत्तरं नव्हतीच मिळाली, प्रश्न वाढले होते! लोकांचे साधे राहणे, देवभोळेपण, तिला झेपत नव्हते! प्रश्न न करणे तिला गावंढळ वाटत होते! तिच्यातले कुत्सितपण कमी होत नव्हते,भोवतीचे चांगुलपण तिला अजिबात उमगत नव्हते! का लोकं इतकी चांगली आहेत हेच समजत नव्हते!

"चला माऊली..." अबीरची हाक आली तशी भानावर आली, रख्मा आणि सिद्धी पुन्हा थोड्या पुढे मागे होत्या, ती एकटीच चालत होती आजपण...विचारांत चालताना नामजप अलगद मिटून गेला ओठांवरून, गर्दीतले एकटेपण तिला तसे नवीन नव्हते, मात्र असे ह्या अबीरचे येणे जाणे तिला नवीन होते! आज इंदापूरला निघाली होती पालखी!
"माऊली किती इचार करता! लक्ष कुठे?" अबीर जवळ येत पुन्हा बोलू लागला! त्याचे ओघवते बोलणे तिला आवडू लागले होते! म्हणजे तो आकर्षक होता, वगैरे म्हणून नाही, तो एक मित्र होता, त्याचा आधार होता...भले त्याचे पूर्ण नाव तिला ठाऊक नव्हते मात्र त्याचे तसे तिला देखील न विचारणे तिला आवडत होते! फार गुंतागुंत नव्हती!
अलिशा समजुतीचे हसून त्याच्यासोबत चालू लागली...
"माऊली पाच दिवसांनी वखरी येईल मग पंढरपूर! तुम्ही काय मागणार पांडुरंगाला?"
"प्रश्न आहेत बघ, तुझे वय माहित नाही, मी बेचाळीस वर्षांची आहे, अर्धवट मोठी, म्हातारी नाही अजून! मला कर्करोग झाला होता, आता बरी आहे असे म्हणतात डॉक्टर, मात्र मला प्रश्न आहे की मलाच का हा सगळा

त्रास झाला? का एवढ्या वेदना? मी काही कोणाचे बरे वाईट केले नाही तरी मीच का भोगू? हे वय आहे? आता कुठे आर्थिक स्थैर्य लाभले,अजून कितीतरी देश बघायचे आहेत, पुस्तकं वाचायची आहेत, लेखन करायचे आहे! ही काय कटकट मध्येच? मला मनःशांती हवी! हक्क आहे माझा! खरेतर वारी वगैरे मला फारसा रस नव्हताच! दिलीप चित्रेंचं ‘सेज तुका’ वाचलं आणि प्रश्न अधिक गहिरे झाले! काय आहे शरणागती? असे कसे विसंबून राहता येईल कोणावर?
प्रश्नांचा हार घालणार आहे बघ विठ्ठलाला मी!”
अलिशा अचानक सगळे एका झटक्यात बोलून गेली आणि मग लागलीच पश्चाताप झाला तिला, ओव्हरशेरिंगचा! तिचे नेहेमीचे होते ते! समोरच्याचा अंदाज न घेताच त्याच्यावर असे डाऊनलोड करणे!
अबीर तिच्या सोबत निमूट चालत होता, ती थांबली की एखाद पाऊल हळू घेत परत चालू लागत, त्याचे काहीच म्हणणे नव्हते तिच्या त्राग्यावर! वाटले कॅन्सर वगैरे ऐकून काही सहानुभूती तरी देईल... एक क्षण तिलाच खजील झाले! सहानुभूतीची कसली अपेक्षा करत होती ती!
हा ठोंब्या रोज भेटला की इतकी बडबड करत होता, नको तेवढे ज्ञान पाजळत होता, आज काय कुलूप ह्याच्या तोंडाला!
अबीर रोज तिच्यासोबत चालू लागला,जेवण चहा नियमित आणून द्यायचा, हक्काने पाय चोळून द्यायचा, तिचे कपडे धुवायला घेऊन जायचा. बोलायचा काहीच नाही, म्हणजे रोजचे माऊली हे, माऊली ते असे वरवरचे बोलायचा मात्र तिच्या प्रश्नांवर काहीच वाच्यता नाही...पाच दिवसांनी वखरी आली आणि उद्या पंढरपूर! रस्ते सजलेले, उत्साह सर्वदूर होता...अलिशा मात्र खजील होती! रिक्त होती! अजून काहीच हाती लागलं नव्हतं तिच्या! कोणताच साक्षात्कार तिला झाला नव्हता! प्रश्न रोज पाठीवरून प्रवास करत होते!

पहाटे पहाटे रख्मा आली, “माऊली उजाडायच्या आधी निघू, गर्दी व्हायच्या आधी पोचू! चला!”
वेस ओलांडून पंढरीत अलिशा शिरली, गर्दीच्या लोंढ्यासोबत चंद्रभागेपाशी पोचली. त्या हिरवट,कळकट पाण्यात शिरावे न शिरावे, न समजून तशीच उभी राहिली...रख्मा भक्तिभावाने पाण्यात उतरली. तितक्यात मागून अबीर आला, “आता तरी ओझं द्या माझ्याकडे, जा माऊली पाण्यात उतरा की!” हक्काने तिच्याकडून बॅग काढून घेत अबीर काठाशी उभा राहिला. हलकेच अलिशा पाण्यापाशी गेली, घोटे बुडतील इतपत, तिचे गोरे पाऊल त्या शेवाळी पायरीवर उठून दिसत होते, अजून पुढे सरकली, गार पाण्याने पोटऱ्यांना मिठीच घातली, हळूहळू सगळा शीण पाण्यात मिसळून वाहून गेला! करत करत ती छातीपर्यंत पाण्यात गेली, ‘मानलं तर हे पाणी गढूळ आहे, मानले तर पवित्र, सगळा खेळ मनाचा, आपण फार अडकतो ह्या धारणांमध्ये...कर्करोग म्हंटल तर रोग नाहीतर एक संधी, पुनर्जन्माची! नव्याने गाभाऱ्याची, मनाची पुनर्बांधणी करण्याची! आधीचे संभ्रम विभ्रम मोडून काढण्याची! धारणा नव्याने तपासून बघण्याची! चित्रे जसा तुकाराम मांडतात, तुकाराम कसा म्हणतो, “टु अरेंज वर्ड्स, इन सम ऑर्डर/ इज नॉट द सेम थिंग, ऍज द इनर पॉईज/ दॅट्स पोएटरी”
आत होता विठ्ठल, तिथे वारी करून पोचायला हवं, मनातली चंद्रभागा स्वच्छ वाहू द्यायला हवी!

अलिशा वाकून पाण्यापाशी थांबली, डोळे मिटून डोके पूर्ण पाण्याच्या पृष्ठभागाखाली बुडवले! मनातला कोलाहल मिटला एक क्षण! श्वास रोखून डोक्यावरून पाणी जाऊ दिलं आणि हुंदका फुटला म्हणून डोळे मिटून ओलेत्याने उभी राहिली पात्रात! सभोवताल विरघळून गेला होता! होती फक्त ती! शांत! मनातला सगळा आकांत मिटला! होती फक्त तुकोबाची कविता!

ती तशीच चालत घाटापाशी आली! एक क्षण समजलंच नाही, कारण गर्दीत अबीर नव्हता! तिची बॅग नव्हती! तिचे ओझे घेऊन हा गायब झाला होता! अबीर! बस्स इतकीच ओळख! नाव, गाव, पत्ता काहीच ठाऊक नाही! आता फोन देखील नव्हता त्यामुळे आता करायचे काय! एक क्षण तिला सुचलेच नाही! अख्खा घाट पिंजून काढला तरी अबीर सापडेचना! अशीच ओलेत्याने अलिशा भिरभिरत्या नजरेने फिरत राहिली, तितक्यात रख्मा आली कुठूनशी.
“माऊली, अहो! चला!” “अगं तो मुलगा बॅग घेऊन गेलाय! माझे सगळे चोरले त्याने! घरी कशी जाऊ?”
“माऊली, असे वंगाळ बोलू नका, तुमच्याकडूनच कुठे राहिली असेल बॅग, इथे तुम्ही एकट्याच होता, तुम्ही ओल्या कपड्यात किती वेळ बसणार? ही साडी नेसा, तिने अलिशाला बळे बळे स्वतःची साडी चोळी दिली, डाळिंबी रंगाचे पातळ आणि कसूटीचा खण ल्यालेली अलिशा निराळीच दिसत होती! रख्मा आणि सिद्धीने बळेच दोन्ही दंडाला धरून अलिशाला मंदिरात नेले! तिथे पांडुरंग एकटाच आहे हे बघून अलिशाला आश्चर्य वाटले! रखुमाईचे निराळे मंदिर आहे, ती देखील एकटीच उभी ठाकली आहे...असा शेवट असतो? इतका तुटक? संपली वारी?
गर्दीतून ढकलत वाट काढत तिघी पुन्हा आडोशाला आल्या, तर अलिशाचे कपडे कोणी नीट वाळत घातलेले, आणि खांबाला टेकून तिची बॅग!
तिच्या डोळ्यात खळ्ळकन पाणीच तरळले!
आतल्या वस्तू जशाच्या तशा...
मात्र ते ओझं हलकं भासत होतं...
अबीर तिला कुठेच दिसला नाही, तिची परत वारी सुरु झाली, तिच्यातल्या विठ्ठलाची आठवण घेऊन ती परतली, त्याचा चेहरा थेट अबीरचा होता!

*********************************************************************************

**<u>लेखिकेविषयी</u>**

***प्राजक्ता पाडगांवकर***

वृद्ध संगोपन संशोधक लेखक. गेली १३ वर्ष वृद्ध संगोपन विषयात विपुल लेखन, अभ्यास आणि व्यावसायिक म्हणून कार्यरत.

साल २०१२ पासून अनेक मासिकांतून आणि नियतकालिकातून नियमित लेखन. अटलांटा येथे गेली ५ वर्ष वास्तव्य.

किशोर, एकता मासिकासाठी लेखन, लोकसत्तेत लेख प्रसिद्ध,

आजपर्यंत अमेरिकेतील विविध मराठी संस्था, नियतकालिकांसाठी सातत्याने लेखन- बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या नियतकालिकांसाठी स्तंभ लेखन.

२०१७ च्या संपूर्ण वर्षभरासाठी, लोकप्रभा मासिकातून "दुसरे शैशव" हे २६ भागांचे सदर लेखन.

लोकप्रभा मासिकातून "जगाची थाळी" हे ५२ भागांचे सदर लेखन. भारतीय खाद्यसंस्कृती, खाद्यपदार्थांचा इतिहास आणि मागोवा ह्या विषयावर लेखन.

२०१८-१९-२०-२१ मध्ये लोकप्रभा मासिकासाठी अनेक निबंध, वैचारिक आणि राजकीय विषयांवरील लेखन.

ह्या व्यतिरिक्त अनेक दिवाळी अंक, आंतरजालावरील अनेक समूह ह्यांच्यासाठी ललित लेखन, वृद्ध संगोपनाच्या बाबतीत लेखन.

२०२०साली पहिले पुस्तक, "सांजवात-भारतातील वृद्ध संगोपनाचे भवितव्य" राजहंस प्रकाशनातर्फे प्रकाशित.

२०१५साली पुण्यातले पहिले वृद्ध संगोपन आणि विरंगुळा केंद्राच्या स्थापनेसाठी मुख्य सल्लागार, २०२० रोजी पुण्यात पहिले वृद्ध सहयोगी निवास केंद्र स्थानपन, त्याची प्रमुख सल्लागार.

२०१९-२०-२१ साली कॅलिफोर्निया येथील मराठी आंतरजाल रेडिओसाठी कार्यक्रमाची निर्मिती, लेखन आणि सादरीकरण.

२०२० साली लॉकडाऊनच्या काळात युट्यूबवर सिम्पल बात ह्या चॅनेलवरून प्रसारित करण्यासाठी ७ भागांच्या "विश्व कुटुंबाचि जाहले" मालिकेची निर्मिती, गीत लेखन आणि सहभाग.

*********************************************************************************

**द्वितीय क्रमांक**

**दोन शब्द...**

**लेखक : प्रियदर्शन मनोहर**

काय गं झोपलीस का? नाही - नाही - झोप तू - माझं काही काम नाही - उगीच विचारलं. म्हटलं असलीस जागी तर बोललो असतो दोन शब्द. आता तसं बोलायचं काही राहिलं नाही म्हणा. माझ्या आवाजाने तुझी नसती झोपमोड झाली असेल. चुकलं माझं. मुळात तू जागी आहेस का हे मी विचारायलाच नको होतं. पण काय करणार? जुनी सवय तुला ना त्रास देण्याची. म्हणजे मुद्दाम त्रास देतोय असं नाही पण माझ्या वागण्याचा तुला त्रास होत असणारच. तू सहन करायचीस आपला. तू झोपली आहेस का हे मी विचारून बघितलं कारण कधी कधी तू झोपेचं सोंग घेऊन पडून राहतेस ना मी पुढे काय करतोय ते बघायला. म्हणून विचारलं की खरंच झोपलीस की झोपेचं सोंग घेतलं आहेस. काही असो - तू आपली झोप. मला अगदी मान्य आहे तुला सलग झोप पाहिजे. उद्या उठून तुला कामंच करायची आहेत. मी कुठे असा राजा-महाराजा लागून गेलोय की घरी नोकर-चाकर आहेत कामं करायला. मला मनोमन खरंच वाटतं की तुला माझ्याहून चांगला नवरा मिळाला असता. थांब! थांब! चांगला म्हणजे मला त्याचा अर्थ नीट सांगू दे. मला चांगला नाही म्हणायचं - श्रीमंत म्हणायचं आहे. एकूण सर्व गोष्टींचा विचार करता, माझ्याहून चांगला नवरा मिळणं कठीणच. ते असो. येडाखुळा का असेना पण समजा तुला श्रीमंत नवरा मिळाला असता तर मग तुला कधीच काम करायला लागलं नसतं. माझ्याशी लग्न करून जन्मभर माझ्यासारखीच तुलाही चक्की पिसायला लागली. मी आत्मसन्मान जपण्यासाठी माझ्या सामान्य आर्थिक परिस्थितीचं समर्थन करतो - मी तुझ्याशी गप्पा मारतो, विनोद करतो, गोष्टी सांगतो म्हणून तुला संसार करताना मजा आली असेल म्हणून. पण तुलाही माहित आहे आणि मलाही माहित आहे - रोज रोज चक्की पिसण्यात कसली आली आहे मजा? कुठेतरी दूर - हवाई किंवा बहामाला जाऊन, बीचवर तंगड्या लांब करून, मार्गारिटाचा ग्लास हातात घेऊन आपल्याच पायाच्या बोटांच्या रंगवलेल्या नखांचा फोटो घेणे ही खरी मजा! इथे रोज पोळ्या लाटता लाटता माझ्या गप्पा-गोष्टी ऐकणे हा केवळ मन गुंतवून ठेवायचा विरंगुळा - एक डिस्ट्रॅक्शन. पण मी जे काही बोलतो ते तू हसून साजरं करतेस आणि मी ही स्वतःवर खुश होतो. किती आपण हुशार! इतक्या वर्षांच्या संसारानंतरसुद्धा आपण बायकोला हसवत ठेवली आहे! खरं म्हणजे एव्हाना बायकांना संसार वगैरे बासच झालं असेल नाही? इतके कष्ट करून जरा कुठे आडवं व्हावं तर लगेच प्रश्न येतो - काय गं झोपलीस का?

मी हे का विचारतो माहित्ये का? कारण प्रत्येक गोष्टीत तुला काय वाटतं ते मला ऐकायचं असतं. तुझे विचार माझ्याहून वेगळे असतात. ते ऐकायला बरे वाटतात. मला बरं वाटावं म्हणून तू उगीच काहीतरी बोलत नाहीस हे त्यात फार बरं आहे. नाही म्हणजे एखादी नवऱ्याची स्तुती करणारी बाई असती ना तर माझे फार हाल झाले असते. काही तरी गोड गोड, खोटं खोटं बोलायला आणि ऐकायला मला आवडत नाही. अगदीच तसं नाही - म्हणजे अधून मधून तू गोड बोललीस तरी चालेल मला. प्रत्येक वेळी काही मला धारेवर धरायला नको. अगदी

आपलं स्थळ एकमेकांना सांगून आलं आणि आपण आपला 'दाखवायचा' कार्यक्रम बाहेर ठरवला. भेटलो आपण गेट वे ऑफ इंडियाला. दोघंही ऑफिस संपवून पोचलो तिथे. तू इतकी फ्रेश दिसत होतीस आणि मी गबाळा. शर्ट चुरगळलेला, केस पिंजारलेले. तू पाहिलंस माझ्याकडे आणि लगेच डोळे मोठे केलेस! इतकी लाज वाटली मला माझ्या अवताराची. मला वाटलं आज जरा कडक इस्त्रीचा शर्ट अंगावर असता तर बरं झालं असतं. कशी काही न बोलतासुद्धा ओरडलीस गं तू मला! पण मला पटलं तुझं - पुरुषांनीही नीट राहायचा, दिसायचा प्रयत्न करायला हवा. बायकांनीच नटावं थटावं आणि पुरुषांनी काहीही करावं हे सूत्र बदलायला पाहिजे आपण.

पण ह्यात टोकाची भूमिका घेता कामा नये. कारण काय होतं की कधी कधी नवरा बायको एकमेकांचे शब्द खाली पडू देत नाहीत. तू मोठा की मी मोठी हीच चढाओढ लागते त्यांच्यात. मी पाहतोय अशी पावर कपल्स झाली की माघार कोण घेणार? प्रत्येक जण आपापली मतं पुढे दामटणार. कोण कुणाचं ऐकून घेणार? सारखे असे पावर गेम्स चालू झाले की संसार कसा होणार? हल्ली तसा थोडा प्रॉब्लेम झालाय समाजात मला वाटतं. मुलं आणि मुली सारखीच शिक्षणं घेऊन सारखीच नोकरी करतात मग ह्याच्यात ज्येष्ठ-कनिष्ठ कसं करणार? म्हणजे तसं करायला नकोच आहे. प्रत्येकाचं वेगळेपण आहे - निसर्गाने सगळ्यांना जगण्याची समानता दिली आहे साम्य नाही. प्रत्येकाने आपापल्या परीने जगावं. आपापल्या परीने संसाराचा भार उचलावा. पण असं शहाणपण आपल्या पारंपारिक संस्कृतीत नाही. त्यात मुलांची चूक नाही - चूक आपली आहे. आपण चांगली उदाहरणं घालून द्यायला हवी होती. उदाहरणार्थ, मी दर आठवड्यात कमीत कमी तीन वेळा पोळ्या करायला हव्या होत्या. त्या केल्या नाहीत म्हणून चूक माझी आहे. अशा पारंपारिक परिघाच्या पलीकडे उडायची माझ्याकडे शक्ती होती पण मी ती वापरली नाही. नुसता परिघात फिरत राहिलो. पास होण्यात समाधान मानलं. हुशार माणसांनी नुसते पास होण्यात ही अशी घोडचूक असते. ज्याला शक्य आहे त्याने पुढे जायला पाहिजे. ती त्याची जन्मदत्त जबाबदारी आहे. सगळेच अनुयायी झाले तर पुढारी कोण होणार? गरिबांना पैसे वाटून, निवडणूका जिंकून कुणी पुढारी होत नाही. पुढारी व्हायला मागचं कळावं लागतं, पुढचं दिसावं लागतं आणि प्रत्यक्ष आहे त्या वर्तमानात बदल घडवून आणावे लागतात. त्याला हिंमत लागते. नाही का?

लागलो व्यर्थ बडबडायला मी. कुणाला पडली आहे पुढारी कसा असावा त्याची काळजी? पण माझं खटलं हे असंच तिरपागडं आहे. मी झोपणार नाही आणि तुला झोपू देणार नाही. पण समजा तुलासुद्धा झोप येतच नसेल तर मग बोलायला काय हरकत आहे. म्हणून म्हटलं चान्स घ्यावा. जागी असलीस तर बोलावे दोन शब्द. पण मला बोलायचं होतं एक आणि बोललो मी भलतंच. म्हणजे 'काय गं झोपलीस का?' हे मी तुला विचारणारच नव्हतो - इन फॅक्ट हा प्रश्न विचारला नाहीच आहे असं समज. माझ्या मनातलाच हा प्रश्न. मनातच राहणार. म्हणजे मी स्वतः कधी झोपणार हे ही मला ठाऊक नाही. लवकर, शांत आणि चांगली सलग झोप लागली की बरं वाटेल नाही का? उद्या उठल्यावर प्रसन्न वाटेल. नवा दिवस उगवला ह्याचा आनंद होईल. काय करू आणि किती करू अशी ऊर्जा अंगात येईल. पण माझं काय होतं की असं झोपून वेळ वाया कशाला

घालवायचा असं मला वाटतं. आत्ताच उजाडत का नाही. तसं झालं असतं तर किती बरं झालं असतं. ही अशी काळोखी, एकाकी रात्र तळमळून काढावी लागली नसती. खरं म्हणजे तळमळायचं काही कारण नाही. पोटाला अन्न आहे, अंगावर कपडे आहेत, सुबत्ता आहे, सन्मान आहे पण... पण काय? सुख बोचतंय ना? प्रॉब्लेम काय आहे? लो अँबिशन इज अ प्रॉब्लेम. आपली ध्येयंच एव्हडी खुरटी आहेत की ती सहज साध्य होतात आणि मग हे असे प्रॉब्लेम निर्माण होतात. माझं ध्येय अशक्य मोठं का असू नये? जे मोठे झाले त्यांची ध्येयं मोठी होती म्हणून ते महान झाले. कुणी गरिबी बघितली, कुणी विषमता बघितली, कुणी समाज सुधारणा बघितली, कुणी स्त्रियांचे प्रश्न बघितले, कुणी साक्षरता बघितली, कुणी देशाचं स्वातंत्र्य बघितलं. तुरुंगात जाताना सावरकर त्यांच्या बायकोला म्हणाले, "माई, काटक्या एकत्र करायच्या आणि घरटं बांधायचं, त्या घरट्यात पोराबाळांची वीण वाढवायची ह्याला जर संसार म्हणायचा असेल तर हा संसार चिमणी-कावळेसुद्धा करतात - आपल्या स्वतःच्या घरट्याइतका संसार कुणालाही करता येतो. मला माझ्या देशाचा संसार करायचा आहे." सावरकरांच्या व्याख्येप्रमाणे मी माझा स्वतःचा इवलासा संसार करतो आहे. नाही म्हणजे त्यात वाईट काही नाही. तो जरी नीट केला तरी संसाराच्या परीक्षेत पास व्हायला पुरेसे मार्क मिळतील! पण फक्त पास व्हायचं उद्दिष्ट का ठेवायचं पुढे? पास होण्यात वाईट काय आहे? सगळ्यांना 'ए' ग्रेड मिळायला हवी असं कुठे आहे? सगळ्यांनी जीव खाऊन पळत सुटावं असं कुठे आहे? रमत गमत जाण्यात, स्वतः खुश राहण्यात आणि दुसऱ्याला खुश ठेवण्यात चूक काय आहे? पण तरीसुद्धा मन कुठेतरी आतल्या आत स्वतःला खात आहे. दोष देत आहे. अपयश माथी मारत आहे.

म्हणून म्हटलं बोलावे दोन शब्द. बघावं जागी आहेस का ते. माझा असेल इवलासा संसार पण तो सोपा नक्कीच नव्हता. चारचौघांसारखा तर अजिबात नव्हता. देवानं आपल्याला एक महान देणं दिलं होतं. त्याची काळजी घेण्यात संसार कधी संपला तेच कळलं नाही. आणि तरी असं वाटतं की चैतीचं नीट केलं ना आपण? चैत्रमासात झाली म्हणून चैती. चैत्रगौरीसारखी सुरेख पोर आपल्या घरी आली. आपलं पहिलंच बाळ. चैत्राच्या नव्या पालवीसारखी आनंद उधळत आली. कसे पाळणे सजवले, किती रांगोळ्या घातल्या. किती सुवासिनी ह्या पार्वतीचं दर्शन घ्यायला आल्या. पण देवाच्या मनात काही वेगळंच होतं नाही? सहा-आठ महिने उलटून गेले तरी चैती कुशीवर वळेना तेव्हा शंका यायला लागली. म्हणून डॉक्टरला दाखवली. एव्हढ्याशा त्या जीवाला पुढे किती मानसिक, शारीरिक, वैद्यकीय चाचण्यांना सामोरं जायला लागलं कुणास ठाऊक. ती नीट उभी राहीना आणि उभी राहिलीच तर तिचा एकदम तोल जायला लागला तेव्हा तिचे ते अपयशी प्रयत्न बघून काळीज फाटायचं. वाटायचं देवा का माझ्या चैतीच्या नशिबात हे लिहून ठेवलंस. ह्याला काही उपाय नाही का? शेवटी अनेक चाचण्यांनंतर डॉक्टरांनी निदान केलं चैतीला 'सेरेब्रल पाल्सी' आहे. आपल्या दोघांना तर आधी काही कळलंच नाही सेरेब्रल पाल्सी म्हणजे काय ते. तर म्हणाले पक्षाघात. तिच्या मेंदूला काहीतरी इजा झाली आहे त्यामुळे मेंदूची वाढ नीट होत नाही. आणि भविष्यात ती कधी होणारही नाही. पक्षाघातावर काही वैद्यकीय इलाज नाही. आपण नेहमी तिची काळजी घेत राहायचं. डोक्यावर आभाळ कोसळलं आपल्या. काय केलं आपण? ती पडली का कधी पाळण्यातून? कधी आपल्या हातून लागलं का तिच्या डोक्याला. काही दुर्लक्ष झालं

का तिच्याकडे. पण डॉक्टर म्हणाले तुमची काही चूक नाही. बाळ गर्भात असतानासुद्धा इजा होऊ शकते. त्याला काही इलाज नाही. स्वतःला दोष देऊ नका. बाळाची काळजी घ्या. उपचार करा.

माझ्या तोंडातून शब्द फुटत नव्हते पण काळजाचा घडा करून विचारलंच शेवटी डॉक्टरना - किती आयुष्य आहे चैतीचं. तर म्हणाले तसं सांगता येत नाही. पुढे काय घडतं, मेंदूची कशी वाढ होते, आपण सगळे तिची कशी काळजी घेतो त्यावर आहे सगळं. कदाचित एक-दोन वर्षं काढेल कदाचित वीस-पंचवीस वर्षंसुद्धा जगेल. विधात्याने तिच्या ललाटी काय लिहिलं आहे ते आत्ता नाही वाचता येणार आम्हाला. ते त्यांचं बोलणं ऐकलं आणि पोरीला उराशी कवटाळली - म्हटलं कितिक आयुष्य का असेना बाळा तुझं. देवाने आम्हाला नेमलेलं आहे तुझी काळजी घ्यायला आणि ते काम आम्ही निष्ठेने करणार. तू काही काळजी करू नकोस. तुझी आई आणि हा तुझा बाबा तुला फुलासारखी सांभाळणार, तुझे लाड करणार. आणि अगदी तसंच केलं नाही का गं आपण सगळं. डॉक्टर म्हणाले वीस-पंचवीस वर्षं जगेल पण त्याहूनही जास्त जगली आपली मुलगी. चांगली तीस वर्षं जगली! खूप आनंद देऊन गेली आपल्याला. पण तरी वाटतं अजून काही करू शकलो असतो का तिच्यासाठी? बरी झाली असती का कदाचित? अजून थोडी जगली असती का? पण असा विचार करण्यात काही अर्थ नाही. आपण दोघे देवाचे लाडके होतो म्हणून देवाने हे अमूल्य दान आपल्याला दिलं. तिच्यामुळे आपण किती शिकलो, किती शहाणे झालो त्याला काही सीमा नाही. आपण तिला काही शिकवायच्या ऐवजी तीच आपल्याला जीवनाचा अर्थ शिकवून गेली. प्रत्येक क्षणाचं चैतन्य दाखवून गेली. प्रत्येक श्वासाचं महत्व पटवून गेली. प्रत्येक हास्यातला बहर दाखवून गेली.

ऐकलंस ना? की झोपलीस आता नक्की? नाही - नाही - झोप तू. तुझ्यावरच सगळा भार आला. मी नोकरीनिमित्त घराबाहेरच असायचो आणि घरी फक्त तू आणि चैती. कसे दिवस काढलेस तुझं तुला ठाऊक. शेवटी शेवटी तर तुलाही काम झेपेनासं झालं तेव्हा मी स्वेच्छानिवृत्ती घेऊन घरी राहिलो तुला मदत करायला. केलं आपण दोघांनी मिळून. पण घरी राहिलो तरी कामात तुझा वाटा सिंहाचा आणि माझा खारीचा. मला विचारायला काय जातंय झोपलीस का ते. मला कुठे इतके श्रम पडले की मी दमून भागून झोपावं. तो अधिकार तुलाच आहे. झोप आता निवांत. मी अगदी काही म्हणजे काही बोलणार नाही. माझ्या आधी झोपलीस म्हणून तुला जराही दोष देणार नाही. तू माझ्या शेजारी आहेस हे महत्वाचं. तू माझ्या आयुष्यात आलीच नसतीस तर काय हा विचारही मला करता येत नाही. तुझ्याविना मी म्हणजे अगदी कस्पटासमान एक जीव. तुझ्या संगतीनं ह्या लोखंडाचं सोनं झालं. कोरांटीचा प्राजक्त झाला. साध्या सुती धाग्याचं रेशीम झालं. कुठून हे शहाणपण घेऊन आलीस? मी जीव ओवाळून टाकावा तुझ्यावरून. अजून जरा जागी राहिली असतीस तर हे दोन शब्द बोललो असतो तुझ्याशी. पण असू दे. न बोलताही तुला कळल्याच असतील माझ्या भावना. सगळंच बोलायला कशाला हवं. झोप तू सुखात. मी ही डोळे मिटतो आता. उद्या बोलू. गुड नाईट.

जयंतरावांनी शेजारी ठेवलेल्या त्यांच्या बायकोच्या अस्थिकलशावर एकदा प्रेमाने हात फिरवला आणि कुशीवर वळून त्यांनी डोळे मिटले.

********************************************************************************

**लेखकाविषयी** –

**डॉ. प्रियदर्शन मनोहर** ह्यांनी कॉलेज पासून साहित्य लेखनाला सुरुवात केली. अनेक कथास्पर्धांतून बक्षिसे (दै. लोकसत्ता, सकाळ, विमल प्रकाशन, एकता, रंगदीप, विश्व मराठी परिषद आदी) मिळाली आहेत. ह्याच्या व्यतिरिक्त 'पैंजण', 'बुवा', 'श्री व सौ', 'एकता', 'झेप', रंगदीप', 'रुची', 'बेळगाव समाचार', 'बृहन्न महाराष्ट्र वृत्त', 'एकोपा', 'पंचधारा', 'आपलं मन' अशा अंकांतून/मासिकांतून अनेक कथा प्रसिध्द झाल्या आहेत. 'कथा कुणाची व्यथा कुणा' हा कथासंग्रह, तसेच 'आनंदाचा फॉर्म्युला', 'ऑफ द हुक', 'ऑफ द हुक : पुस्तक दोन - जीवनगाथा' हे ललित लेखसंग्रह अजब पुस्तकालय, कोल्हापूर आणि दहावी दिवाळी प्रकाशन, पुणे यांनी प्रकाशित केले आहेत. 'सिग्नल' हा एकांकिका संग्रह अरिहंत प्रकाशन, पुणे ह्यांनी प्रसिद्ध केला आहे. आतापर्यंत एकूण पंचवीस संगीतिका, श्रुतिका आणि एकांकिका लिहून उत्तर अमेरिकेत सादर केल्या आहेत. 'आनंदाचा फॉर्म्युला' ह्या विनोदी लेखसंग्रहाला वाङ्मय चर्चा मंडळ, बेळगाव यांनी दिलेला कृष्णराव हुईलगोळ साहित्य पुरस्कार. 'संगीत नाट्यसंभव' ह्या संगीत नाटकाच्या संहितेला 'खल्वायन, रत्नागिरी' आणि 'अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेचा' संहिता लेखन पुरस्कार प्राप्त झाला. अमेरिकेतील मराठी नाटकाच्या वृद्धीसाठी विशेष पुरस्कार - द बिग बँग थिएटर, कॅन्सस सिटी ह्यांनी दिला आहे.

शिक्षण: मटेरियस सायन्स मध्ये डॉक्टरेट,

व्यवसाय: पिट्सबर्गमधील रॉबर्ट मॉरिस विद्यापीठात इंडस्ट्रियल इंजिनियरिंगचे प्रोफेसर.

लेखक डॉ. प्रियदर्शन त्यांची पत्नी सौ. अनघासह पिट्सबर्ग, अमेरिका येथे राहतात तर त्यांचे दोन मोठे झालेले मुलगे न्यू यॉर्क शहरात कार्यरत आहेत.

********************************************************************************

## तृतीय क्रमांक-(विभागून)
## परतफेड
### लेखक : गिरीश देसाई

घरासमोर “एव्हरग्रीन”ची गाडी थांबली. गाडीतून लॉन मोवर काढून त्याने ताबडतोब कामाला सुरुवात केली. सव्वापाच फूट उंची, दणकट शरीरयष्टी, रापलेला चेहरा, ठेवणीतील बारीक डोळे असलेला नवा कामगार दिसायला इतर हिस्पॅनिकांप्रमाणे होता. चहाचा घोट घेत काचेच्या तावदानातून त्याच्या गवत कापणीकडे मी बारकाईने लक्ष देत होतो.

बऱ्याच काळापासून मी घरूनच काम करीत होतो. घरून काम करण्याचा एक तोटा म्हणजे दिवसेंदिवस माणसांशी प्रत्यक्ष संवाद न घडणे! माझ्यासारख्या गप्पिष्ट व्यक्तीला याचा सुरुवातीला खूप त्रास झाला. त्यामुळे प्रत्यक्ष संवाद साधण्याच्या शोधात, मी नेहमीच असतो. सुटीच्या दिवशी इतरांबरोबर ट्रेकिंगला जाणे, यामागेदेखील संवाद हे एक कारण असावे. हिस्पॅनिक कामगारांविषयी मला प्रचंड आदर तसेच कुतूहल आहे. मुंबईतील उत्तर भारतीय निर्वासित ज्याप्रमाणे कुठल्याही कामाची लाज न बाळगता पडेल ते काम इमाने इतबारे करतात नां, अगदी त्याचप्रमाणे दक्षिण अमेरिका खंडातील हा वर्ग कमालीचा कष्टाळू आहे. बांधकाम, शेती, साफ सफाई अशा नानाविध क्षेत्रात यांच्या अविरत कष्टांचे खूपच योगदान आहे.

सकाळी ऑफिसच्या मीटिंग्ज नसल्याने काहीसा निवांत होतो. त्यामुळे नवीन कामगाराशी गप्पा मारण्याची संधी मिळाली. लॉन मोवरचा आवाज थांबला तसा मी थंडगार पाण्याची बाटली घेऊन घराबाहेर आलो. माझ्याकडे पाहून तो कसंनुसं हसला. त्या स्मितहास्यात कृतज्ञतेची भावना, आपलेपणा आणि मैत्रीची सूचकता इत्यादी गोष्टी जाणवल्या. भाषेचा अडसर आल्यास त्याच्याशी कितपत संवाद साधला जाईल याविषयी थोडा साशंक होतो.

“गुड मॉर्निंग!” थंडगार पाण्याची बाटली देत संवादाला सुरुवात केली.

“गुड मॉर्निंग! धन्यवाद सिन्योर.” काहीसा संकोच बाळगीत पाण्याच्या बाटलीचा स्वीकार करीत तो उत्तरला.

“नवीन दिसतोस.” माझा प्रश्न.

“नवीन नाही. गेली ४ वर्षे याच कंपनीत आहे. पण तुमच्याकडे पहिल्यांदाच आलो.” हा इतरांपेक्षा इंग्रजी उत्तम बोलतो याचा मला आनंद झाला.

“नांव काय तुझं?” संवादासाठी माझा पुढील प्रश्न

“जोसेफ. पण सगळे मला होजे म्हणतात.” पँटीला हात पुसत त्याने हस्तांदोलन केले.

“गवत चांगलं कापलंस. इंग्रजी उत्तम बोलतोस.” समोरील हिरवळीकडे बघत मी बोललो. माझ्या कौतुकामुळे तो किंचित लाजला.

“सिन्योर, माझे बऱ्यापैकी शिक्षण झाले आहे. मला इंजिनियर व्हायचे होते. पण कुटुंबाच्या जबाबदारीमुळे कमावणे भाग पडले. आमच्या भागात नोकऱ्या नाहीत. व्यवसाय करायला भांडवल लागते. शिवाय तिकडे खूप भ्रष्टाचार आहे.” होजेची भीड एव्हाना चेपली होती.

“कुठला तू?” कुतूहलपोटी त्याला विचारले.

“मेक्सिको!” होजे उत्तरला. त्याचा फार खोळंबा होऊ नये म्हणून मी संवाद उरकता घेतला.

“तुम्ही खूप चांगले आहात. छान वाटलं तुमच्याशी बोलून.” असे म्हणत होजेने निरोप घेतला.

होजे, शिकलेला, आदबशीर आणि गप्पिष्ट वाटला. संवादाची भूक सर्वांनाच असते. मात्र सुसंवादासाठी माणसामाणसांमधील वैचारिक तरंग जुळावे लागतात.

त्यानंतर होजे अगदी वेळेवर येऊ लागला. कीटकनाशके, खते, रासायनिक फवारणी, झुडुपांची छाटणी इत्यादि कामे तो मन लावून करीत असे. त्याच्या आजूबाजूला उभे राहून गप्पा मारीत मलाही बागकामातील काही नवीन गोष्टी शिकायला मिळाल्या. मेक्सिकोमध्ये त्याच्या घरात वयस्कर आई वडील, बायको आणि दोन मुले होती. वेळप्रसंगी पोट मारून जमेल तेवढी रक्कम तो कुटुंबाला पाठवीत असे. आपल्या दोन्ही मुलांनी खूप शिकावे, चांगल्यापैकी नोकरीधंदा करावा असे त्याचे स्वप्न होते. माझ्याकडे धूळ खात पडून असलेले सुस्थितीतील लॅपटॉप आणि इतरही उपयुक्त शैक्षणिक वस्तू होजेच्या मुलांसाठी देऊ केल्या. आधी तो संकोचला. परंतु माझ्या आग्रहाखातर मुलांसाठी त्याने त्या स्वीकारल्या. त्याच्या डोळ्यांतील कृतज्ञतेचे भाव, वस्तूंपेक्षा अनमोल होते. हळूहळू आमच्यातील व्यावहारिक नात्याने कात टाकून मैत्रीत रूपांतर केले.

घराच्या मागील बाजूस बनवलेल्या छोटेखानी मंदिराबद्दल होजेला खूप कुतूहल होते. एके दिवशी मनाचा हिय्या करून त्याने आपले कुतूहल प्रकट केले. माझ्या परीने हिंदू मंदिर, देवदेवता वगैरे गोष्टी त्याला थोडक्यात सांगितल्या. गणपतीच्या पितळी मूर्तीकडे बोट दाखवून ही बुद्धीची देवता आहे हे त्याला सांगितले, तेव्हा तो खूपच भारावला. त्याच्या डोळ्यातील भाव बघून नकळतपणे ती लहानशी पितळी मूर्ती त्याला भेट म्हणून दिली. होजे सद्गदित झाला. त्याने मनोभावे मूर्तीचा स्वीकार केला.

पुस्तकातल्या पानांप्रमाणे दिवसांमागून दिवस उलगडत गेले. एके दिवशी “एव्हरग्रीन” च्या गाडीमधून होजेऐवजी एक वेगळाच कामगार उतरला. कदाचित वैयक्तिक कारणामुळे होजेने सुट्टी घेतली असावी असा विचार मनात डोकावला. मात्र पुढील काही महिने होजेऐवजी दुसरेच कामगार येत गेले. मग मात्र

मी बेचैन झालो. होजेने नोकरी बदलली असेल तर निदान एकदातरी भेटायला किंवा कळवायला हवे होते. एव्हढी माफक अपेक्षा बाळगण्याइतपत आमची मैत्री नक्कीच दृढ झाली होती.

“आमच्याकडे होजे नावाचा कामगार बरेच दिवस येत होता. मात्र आता त्याच्या ऐवजी इतरजण येतात. तो तुमच्याकडे कामाला आहे ना?” न राहवून मी “एव्हरग्रीन”ला संपर्क केला.

“होजे आता इथे काम करत नाही. तो तुम्हाला काही देणं लागतो कां?” “एव्हरग्रीन”च्या माणसाने विचारले. त्याला उत्तर म्हणून आमच्या झालेल्या मैत्रीबद्दल मोजक्या शब्दांत सांगितले.

“आपण एक जुने ग्राहक आहात म्हणून सांगतो. होजेला दोन महिन्यांपूर्वी डिपोर्ट केले. त्याचा व्हिसा संपून कित्येक महिने उलटले होते.” हे ऐकल्याबरोबर मी सुन्न झालो. कोडे तर उलगडले, परंतु एक मित्र गमावण्याचे दुःखही झाले. त्याचबरोबर होजेवर आता आर्थिक कुऱ्हाड कोसळणार या विचाराने वाईट वाटले.

काळ कुणासाठी थांबत नसतो. अशीच काही वर्षे सरली. कॉलेज संपवून मुलगा आणि मुलगी चांगल्या ठिकाणी नोकरीला लागले. एका मोठ्या जबाबदारीतून मुक्त झालो. आता डोंगरभ्रमंतीचा छंद जोपासण्यास अधिक वेळ मिळू लागला. स्मोकी माऊंटन, योसेमिटी अशा नावाजलेल्या नॅशनल पार्कमधील डोंगरवाटा पालथ्या घालू लागलो. सहा जणांनी मिळून पेरूमधील माचूपिचूला भेट दिली. ट्रेकिंगच्या निमित्ताने इतर भागातील लोकजीवन जवळून अनुभवता येते. विविध भौगोलिक प्रदेश आणि तेथील रीतीरिवाज हे जवळून बघण्याचे लहानपणापासून स्वप्न होते. त्या दृष्टीने दक्षिण अमेरिका खंडातील देश नेहमीच खुणावीत असतात.

गेली अनेक वर्षे ज्यांच्याबरोबर डोंगरवाटा पालथ्या घातल्या ते शॉन आणि ब्रॅड भटकंतीला नेहमीच तयार असतात. समवयीन असल्याने आमचे विचारदेखील जुळतात. माचू पिचू नंतर बाहेर देशात भटकंतीसाठी गेलो नव्हतो. या वर्षी कुठेतरी नक्की जायला हवे यावर आमचे एकमत झाले.

“आफ्रिकेतील माऊंट किलिमांजारोला जायचं कां?” शॉनने विषयाला तोंड फोडले.

“किलिमांजारो खूप खर्चिक होईल. त्यापेक्षा आपण जवळपासच्या देशात जाऊ.” ब्रॅडने किलिमांजारोवर ताबडतोब फुली मारली.

“किलिमांजारोवरील ग्लेशियर हळूहळू नामशेष होत आहे. बघ विचार कर”. शॉनने ब्रॅडला पटवण्याचा प्रयत्न केला.

“अरे, ग्लेशियर असलेला पर्वत जवळच आहे. किलिमांजारो एक क्रमांकाचा तर तो पर्वत जगात दोन नंबरचा आहे. तिथे फारसे कुणी जात नाही. शिवाय त्यासाठी फारसा खर्चदेखील येणार नाही.” बल्ब पेटावा तसा एक पर्याय माझ्या डोक्यात चमकला.

“अरे थोडे विस्तार करून सांग.” त्यांनी उत्सुकतेने विचारले.

“पिको डि ओरिझ्झाबा हे मेक्सिकोतील सर्वांत उंच बर्फाच्छादित शिखर. हा निद्रिस्त ज्वालामुखीचा पर्वत असून तिथे सुमारे दीडशे वर्षांपूर्वी उद्रेक झाला होता.” याविषयी नुकतेच वाचल्यामुळे मी लगेचच उत्तर दिले.

“तिथे जायचे कसे?” शॉनने विचारले.

“मेक्सिकोच्या राजधानीपासून शिखराच्या पायथ्याशी जायला सात तास लागतात. नोव्हेंबर ते मार्च हा तिथे जायला योग्य काळ असल्याने आपल्याला तयारीला पुरेसा वेळ आहे.” मी माहिती पुरवली.

पिको डि ओरिझ्झाबाला जाण्याविषयी एकमत झाले. मोहिमेची तयारी, आखणी आणि व्यवस्थापन या जबाबदाऱ्या तिघांनीही आपापल्या परीने वाटून घेतल्या. थँक्स गिव्हिंगला जोडून सुट्टी मिळायला अडचण आली नाही. आठवड्यातून एकदा तरी आसपासच्या डोंगररांगा पालथ्या घातल्या. दरम्यान विमान प्रवास, हॉटेल वगैरे गोष्टी मार्गी लागल्या. मोहिमेपर्यंत सर्वांच्या डोक्यात पिको डि ओरिझ्झाबा एव्हढा एकच किडा होता.

ऑक्टोबर उजाडला आणि पानांचे रंग बदलू लागले. निसर्गात विविध रंगांची उधळण होऊ लागली. चित्रकाराने कुठेही बसून कुंचला फिरवला तरी अप्रतिम निसर्गचित्र होऊ शकत होते. पावसाची चाहूल लागताच मोराने पिसारा फुलवावा तसा पानगळ सुरु होण्याआधी निसर्ग विविध रंगानी बहरलेला असतो. अशा दिवसांत डोंगरभ्रमंती करण्यास अधिक उत्साह येतो.

हॅलोवीन सरला आणि थँक्स गिव्हींगची चाहूल लागली. मेक्सिको मोहिमेसाठी आम्ही सज्ज झालो. यादीप्रमाणे सर्व वस्तू मोठ्या सॅकमध्ये भरल्या. मेक्सिको सिटीचा विमान प्रवास सुरळीतपणे पार पडला. सर्व सामान व्यवस्थितपणे आल्यामुळे तिघांनीही सुटकेचा निःश्वास सोडला.

ठरवल्याप्रमाणे मेक्सिको सिटीत दोन रात्र मुक्काम केला. शहर समुद्रसपाटीपासून बऱ्यापैकी उंचावर असल्याने मोहिमेच्या दृष्टीने ते जरुरी होते. हॉटेलमध्ये मिळालेल्या माहितीच्या आधारे टॅक्सी ठरवली. पहाटे मेक्सिको सिटी सोडले. मोहिमेची सुरुवात जिथून करणार होतो, तिथे पोहोचेपर्यंत दिवस मावळला. भरभक्कम पेसोज मिळाल्यामुळे टॅक्सीवाला खूष होता. शिखराच्या पायथ्याशी गिर्यारोहकांना राहण्यालायक एक मोठा हॉल बांधला आहे. रात्री तिथेच मुक्काम केला. चढाईच्या मोसमाची नुकतीच

सुरुवात असल्याने तिथे आम्ही एकटेच होतो. मिट्ट काळोख पडण्याआधी लागणारे सामान सॅकमध्ये नीट भरून तिघेही झोपी गेलो.

पहाटे उठून सूर्योदयापूर्वीच पाठीवर बॅगा घेऊन चढाईला सुरुवात केली. हजारो फुटांची खडी चढण विरळ हवेत पार पाडणे ही सोपी गोष्ट नव्हती. एकमेकांना सांभाळीत अनेक तासांच्या चढाईनंतर एका लहानशा पठारावर पोहोचलो. हवेतील विरळपणाशी समरस होण्यासाठी तिथे एक रात्र मुक्काम करणे गरजेचे होते. एकाच तंबूत कशीबशी रात्र घालवली. दुसऱ्या दिवशी एक एक पाऊल मोठ्या मुश्किलीने टाकीत कसेबसे शिखरावर पोहचलो. सभोवतालचे दृश्य बघून हरखून गेलो. निसर्गाचे ते विराट रूप बघून आपण किती क्षुद्र आहोत याची जाणीव होत होती. ते सोनेरी क्षण कॅमेऱ्यात आणि मनात साठवले. हळूहळू परतीच्या मार्गावर लागलो. उतरताना विशेष दमछाक होत नव्हती. परंतु घसरू नये म्हणून सावधपणे पावले टाकीत पर्वताच्या पायथ्याशी येऊन पोहचलो. सारे कसे योजनाबद्ध पार पडले.

काळोखात आसमंत बुडाला. संपूर्ण इमारतीत आम्ही तिघेच होतो. ढगाळलेल्या आकाशात चंद्र, तारे दडून बसले होते. अशा वातावरणात माणसाचे संवेदनशील मन जागृत होते. निरनिराळे आभास होऊ लागतात. चित्रविचित्र कल्पना अवतीभवती फेर धरून नाचू लागतात. कदाचित पुढे येणाऱ्या वादळाची जाणीव करून देतात.  डोक्यातील अभद्र विचार झटकून मी निद्रादेवीच्या स्वाधीन झालो.

सकाळी निवांतपणे उठून सामानाची आवराआवर केली आणि टॅक्सीची वाट बघत बसलो. टॅक्सीवाल्याला काही रक्कम आगाऊ दिली असल्याने तो वेळेवर येणार याची खात्री होती. परतीच्या मार्गावरील "प्योबला" शहरात एक दिवस मुक्काम करून पुढे मेक्सिको सिटीला जाऊन प्रस्थान करण्याचा बेत होता. ठरलेल्या वेळेवर एक भलीमोठी व्हॅन आली. पुढील सीटवर निर्विकार चेहऱ्याचा ड्रायव्हर आणि त्याच्या बाजूला एक विशीतील तरुण बसला होता. मागच्या बाजूस ऐसपैस जागा होती. आधीच्या टॅक्सीवाल्याप्रमाणे हा खेळकर नव्हता. कदाचित इंग्रजी येत नसल्याने ते गप्प असावेत असे आम्हाला वाटले.

ड्रायव्हरला "प्योबला" म्हटल्याबरोबर त्याने मान डोलावली. आपलीच टॅक्सी आहे याची खातरजमा झाली. येताना ज्या रस्त्याने आलो होतो त्याच रस्त्याने परत जाणार होतो. तासाभरात एका ढाब्यावजा ठिकाणी नाश्त्यासाठी थांबलो. भरभक्कम खाणे झाल्याने प्योबला येईपर्यंत पुढील तीन तासांची निश्चिंती होती. हळूहळू माझ्या डोळ्यांवर झापड येऊ लागली. बाजूला शॉन आणि ब्रँड घोरताना दिसले. कालचा शीण बाहेर पडत असावा, असा विचार करीत मलाही डुलकी लागली. जाग आली तेव्हा येताना लागलेला रस्ता हा नव्हता हे जाणवले. घड्याळात बघून धक्काच बसला. आम्ही जवळपास साडेसहा तास झोपलो होतो.

एव्हाना प्योबला यायला हवे होते. माझी अस्वस्थता जाणत ब्रँडने नजरेनेच पुढील सीटकडे बघण्यास सांगितले. त्या विशीतल्या तरुणाजवळ भलेमोठे पिस्तुल होते. आपण एका मोठ्या संकटात

सापडलो आहोत, याची तिघांनाही खात्री पटली. शॉनच्या घड्याळातील होकायंत्रानुसार गाडी पश्चिमेऐवजी दक्षिणेकडे चालली होती.

“आपण नक्की कुठे चाललो आहोत?” शॉनने मोडक्यातोडक्या स्पॅनिशमध्ये उसने अवसान आणीत ड्रायव्हरला विचारले.

“अजून अर्धा तास लागेल. तोवर गप्प बसा.” अस्खलित इंग्रजीत तो मग्रुरीच्या स्वरात बोलला. त्याच्या सहकाऱ्याने आमच्यावर डोळे वटारले.

आपण गुंडांच्या तावडीत सापडलो आहोत हे कळून चुकले. त्यांच्याकडील पिस्तुलीच्या धाकाने, आमच्या तोंडाला अदृश्य चिकटपट्टी चिकटली. तेव्हढ्यात दूरवर एक वस्ती दिसू लागली. ढासळलेली बांधकामे, ओबडधोबड रस्ता, पडके चर्च अशा बकाल परिसरातून गाडी पुढे सरकत होती. अखेरीस एका जुनाट इमारतीपुढे गाडी थांबली. इमारतीचा पोलादी दरवाजा उघडण्यात आला. समोरचे दृश्य पाहून अंगाचा थरकाप उडाला. कमरेला पिस्तुल, चाकू, सुरे लावलेले झुपकेदार मिशा राखलेले काही राकट गडी मस्तीत उभे होते. प्रत्येकाच्या नजरेत क्रूरता ठासून भरलेली दिसत होती. इमारतीच्या मधोमध गाडी थांबली.

एका इसमाने आमची रवानगी त्या इमारतीच्या तळघरात केली. कुबट वासाच्या त्या खोलीत काही सतरंज्या पसरल्या होत्या. कोपऱ्यात दोन मोडक्या खुर्च्या आणि टेबल होते. भिंतीपुढे उभे करून त्यांनी आमचे मोबाईलने फोटो काढले. त्यानंतर ठीकठाक पोषाखातील एक धिप्पाड इसम खोलीत आला. देहबोलीवरून तो या टोळीचा म्होरक्या असावा अशी आमची समजूत झाली. कमरेला पिस्तुल, तोंडात उंची सिगारेट, घारीसारखी तीक्ष्ण नजर असलेला हा इसम खुर्चीवर पाय ठेवून टेबलावर बसला. आम्ही एका मळकट गादीवर घाबरून बसलो होतो.

“इथून पळून जाण्याचा विचारही डोक्यात आणू नका. तुम्हाला कोणीही त्रास देणार नाही. मात्र अति शहाणपणा केला तर इथेच गोळी घालण्यात येईल.” सिगारेटचा झुरका घेत अस्खलित इंग्रजीमध्ये तो शांतपणे सूचना देत होता. त्या शांत आवाजाला विलक्षण धार होती.

“तुम्ही कोण आहात? आम्हांला इथे का आणले आहे?” ब्रॅडने भयभीत आवाजात विचारले.

“तुम्ही अशा ठिकाणी आहात की बाहेरच्या जगाला तुमचा मागमूसही लागणार नाही. इथे आमचे राज्य आहे. तुमच्या घरच्यांकडून सांगितलेली रक्कम मिळाल्यानंतरच तुम्हाला सोडण्यात येईल.” हातातल्या पिस्तुलाशी खेळत तो म्हणाला.

“कृपया आम्हांला सोडा. आम्ही कुणालाही एक शब्ददेखील सांगणार नाही.” शॉन काकुळतीला येऊन म्हणाला.

“आम्हांला बायकापोरं आहेत. तुमचा काहीतरी गैरसमज झाला आहे. आम्ही अजिबात श्रीमंत नाही.” मीही गयावया करू लागलो.

“गपगुमान नीट रहा. फार गडबड केली तर तिघांनाही वेगळे ठेवू.” आमच्या बोलण्याचा त्याच्यावर यत्किंचितही परिणाम झाला नसावा. बाहेर जाताना मागे वळून त्याने जळजळीत कटाक्ष टाकला.

आपले अपहरण झाले असून जोपर्यंत यांना भरभक्कम रक्कम मिळत नाही, तोपर्यंत आपली सुटका नाही हे आम्हांला कळून चुकले. दक्षिणेकडील देशांमध्ये आणि विशेषतः मेक्सिकोत पर्यटकांचे अपहरण केले जाते या बातम्या ऐकिवात येत होत्या. मात्र आपले अपहरण होईल असे कधी वाटले नव्हते. दोन दिवस दोन वर्षांसारखे भासले. कैद्यांसारखी वागणूक मिळत होती. झोपायला सतरंजी आणि मोजके खाणे, एव्हढेच मिळत होते. यांना अपेक्षित रक्कम मिळणार नसल्याने आपला अंत अटळ आहे या विचाराने तिघांचाही धीर खचला होता. फाशीची शिक्षा फर्मावलेल्या कैद्यांप्रमाणे आमची अवस्था झाली होती.

सकाळी अचानक दरवाजा उघडला गेला. तोच धिप्पाड इसम तळघरात आला. यावेळेस त्याची देहबोली थोडी वेगळी जाणवली.

“अमिगोज, माझे नाव दिएगो. तुम्हाला सोडण्यात येतं आहे. तुमचे सामान गाडीत टाकले आहे. पटकन चला.” त्याच्या बोलण्यात मार्दवता आली होती. हे ऐकून आमचा कानांवर विश्वासच बसला नाही. पोलीस एनकाउन्टर करतात तसे तर आपले करणार नाहीत नां, अशी एक शंका मनाला चाटून गेली.

जवळपास तीन दिवसांनंतर खुले आकाश दिसले. बीएमडब्लू व्हॅनमध्ये आम्ही स्थानापन्न झालो. दिएगो स्वतः गाडी चालवत होता. त्या बकाल वस्तीतून बाहेर पडलो आणि आम्ही निःश्वास सोडला.

“अर्ध्या तासात पोहचू बॉस. ते ठीक आहेत.” आलेल्या फोनवर दिएगो अदबीने बोलत होता. याचा अर्थ असा की याच्याही डोक्यावर कुणीतरी आहे हे समजले.

अर्ध्या तासात गाडी एका टुमदार बंगल्यासमोर येऊन उभी राहिली. वाळवंटातील ओएॅसिसप्रमाणे ते एक नितांत सुंदर ठिकाण होते. आजूबाजूला रंगीबेरंगी फुलझाडे, भरपूर हिरवळ होती. त्यामधून एक झरा वाहत होता. आम्ही दबकत गाडीतून उतरलो. समोरील झोपाळ्यावर सुटाबुटातील एक जण कानाला फोन लावून पाठमोरा बसून बोलत होता. त्याच्या समोर आलिशान सोफे आणि टेबलावर विविध फळे ठेवली होती. आमची चाहूल लागताच त्याने फोन बंद केला. डोळ्यावरचा गॉगल बाजूला करून तो वळला. तोच रापलेला चेहरा, तेच ठेवणीतील बारीक परंतु भेदक डोळे आणि तेच निरागस हास्य.

“होजे, तू?” त्याला पाहून मी जवळजवळ उडालोच.

“सिन्योर, मीच तो.” होजेने हसतहसत पुढे येऊन मला घट्ट मिठी मारली. शॉन आणि ब्रॅड अवाक होऊन बघतच राहिले.

“मला माहीत आहे तुमच्या मनात खूप प्रश्न साठले असतील. आधी जेवून घेऊ. मग गप्पा मारू. नंतर तुम्हाला हेलिकॉप्टरने प्योबलाला सोडले जाईल. त्यापुढील प्रवास तुम्ही निश्चिन्तपणे पार पाडा.” होजे एका दमात बोलला. दिएगोने निरोप घेतला.

जेवण झाल्यानंतर शॉन आणि ब्रॅड टीव्ही बघत बसले. मी आणि होजे त्या नितांतसुंदर बगीच्यात फेरफटका मारीत एका बाकावर बसलो. मला बरेच काही ऐकायचे होते आणि होजेलाही बरेच काही सांगायचे होते.

डिपोर्ट झाल्यानंतर होजे आपल्या गावी आला. डिपोर्ट होण्याचा अनुभव त्याला कमालीचा क्लेशदायक आणि अपमानास्पद वाटला. परत आल्यावर अर्थार्जनाचा कोणताही मार्ग नव्हता. त्या भागातील बहुतेक पुरुषमंडळी वैफल्यग्रस्त होती. कामधंदे मिळत नव्हते. काहीजण ड्रग-माफियांचे शिकार होत होते. होजेचे आतडे पिळवटले. आपला समाज स्वावलंबी व्हावा ही त्याची पूर्वीपासूनची इच्छा उफाळून वर आली. इथल्या तरुणांनी उद्योगधंद्याचे प्रशिक्षण घ्यावे, मेक्सिकोतच राहून कामधंदा करावा या विचाराचा होजेने ध्यास घेतला. मात्र या गोष्टीला प्रचंड भांडवल लागणार होते. कमीतकमी वेळेत जास्तीत जास्त पैसे मिळवण्यासाठी त्याला गुन्हेगारीशिवाय पर्याय दिसत नव्हता. ड्रग माफिया जाळे पसरून तयारच होते. मात्र ड्रग्जच्या धंद्यापासून दूर राहण्याचे होजेने मनाशी पक्के ठरवले होते. समाजाचे कमीत कमी नुकसान होऊ शकेल असा परदेशातील पर्यटकांचे अपहरण करण्याचा मार्ग त्याने निवडला. मात्र त्यातून कुणालाही इजा होणार नाही हा शिरस्ता त्याने पाळला. मेक्सिकोत प्रचंड संख्येने पर्यटक येतात. देशाच्या अंतर्गत भागात कायदा व्यवस्था तितकीशी कडक नाही. खूपच कमी अवधीत होजेला खूप पेसोज मिळत गेले. त्यातून त्या भागात अनेक लहानसहान उद्योगधंदे उभारण्यात आले. रिकाम्या हाताला काम मिळाल्याने जनता खूष झाली. परिसरातील जनतेची साथ असल्याने होजेला हात लावायची कुणाचीही हिम्मत नव्हती. होजेने निवडलेला मार्ग निश्चितच कायद्याच्या चौकटीबाहेरचा होता, परंतु त्यामागची भावना निश्चितच वाखाणण्याजोगी होती.

तळघरातील आमचे फोटो जेव्हा होजेच्या नजरेस पडले, तेव्हा त्याने तात्काळ आम्हाला विना मोबदला सोडण्याचा निर्णय घेतला.

“होजे, तुझ्या वागण्याचे मी उघडपणे समर्थन करत नाही.” सारी कहाणी ऐकल्यानंतर माझे मत व्यक्त केले.

“हा मार्ग योग्य नाही हे मला मान्य आहे. परंतु एकदा का हा परिसर स्वयंपूर्ण झाला की मी हे थांबवणार आहे.” माझ्या खांद्यावर हात ठेवत होजेने मला आश्वासन दिले.

“परत गेल्यावर मीदेखील तुझ्यासाठी आमच्यासारखे ट्रेकर्स पाठवतो.” या माझ्या विनोदावर दोघेही खळखळून हसलो.

निरोप घेताना होजेला जादूची झप्पी दिली. पाठीवर सामान घेऊन प्रांगणातल्या हेलिपॅडकडे निघालो. जाताजाता बगिच्यातील कोपऱ्यातील एका गोष्टीकडे माझे प्रकर्षाने लक्ष गेले. होजेला दिलेली पितळी गणपतीची मूर्ती, एका लहानशा मंदिरात दिमाखात उजळली होती. मागे वळून होजेकडे कृतज्ञतेचा कटाक्ष टाकला. आम्हाला निरोप देणारे होजेचे हात नकळत जोडले गेले. मीदेखील क्षणभर थांबून होजेला आणि गणपतीच्या मूर्तीला मनोभावे नमस्कार केला. हेलिकॉप्टरमध्ये वाट बघत बसलेल्या शॉन आणि ब्रॅड बरोबर स्थानापन्न झालो. पंखे फिरवीत आम्हाला कवेत घेत हेलिकॉप्टरने प्योबलाच्या दिशेने झेप घेतली.

*****************************************************************************

**लेखकाविषयी-**

**गिरीश देसाई** (+1 678-674-6616 )

संगणक ह्या क्षेत्रात पूर्णवेळ कार्यरत असून सध्या अटलांटा येथे वास्तव्य.

गेली अनेक वर्षे विविध देशातील विविध अंकांमध्ये ललित, साहसी पर्यटन/भटकंती,भय-गूढ-विज्ञान इत्यादी विषयांवर सातत्याने लिखाण. तसेच अनेक माध्यमातून स्वलिखित कवितांचे सादरीकरण. प्रसिद्ध पुस्तके- "ताडोबाचे पडघम आणि इतर भय-गूढ-विज्ञान कथा" ( कथासंग्रह ), "राजगड-तोरणा -रायगड " (चित्तथरारक डोंगरभ्रमंती). मराठी साहित्य संमेलन -२०२१ साठी साहित्यिक म्हणून आमंत्रित. पदभ्रमंती हा विशेष छंद आणि याच विषयावर मार्गदर्शनपर विविध माध्यमातून व्याख्याने. एव्हरेस्ट बेस कॅम्प, माउंट किलीमांजारो, माचू पिचू अश्या अनेक शिखरांवर पदभ्रमण. शिवाय सह्याद्रीतील अनेक दुर्गम गडांवर भ्रमंती.

*****************************************************************************

**तृतीय क्रमांक-(विभागून)**

# कणा

**लेखिका: श्रद्धा भट**

'कर्र्... कर्र्'... कर्र्' असा स्मिताच्या बुटांचा आवाज होत होता, पांढऱ्याशुभ्रशा पसरलेल्या रांगोळीसारख्या भुसभुशीत बर्फावर चालतांना. अगदी काळजीपूर्वक ती एक एक पाऊल टाकत होती. एका हाताने तिने आयुषच्या दंडाचा आधार घेतला होता आणि किंचित त्याच्यावर भार टाकत, एकीकडे कलत ती चालली होती. खरंतर शिकागो काही तिला नवीन नव्हतं. पण बर्फ मात्र नवीन होता. गेल्या ३-४ वर्षांपासून ती उन्हाळ्यात दोन महिन्यांसाठी आपल्या लेकाकडे, आयुषकडे येऊन राहत होती. ती शिकवायची त्या शाळेला सुट्ट्या लागलेल्या असायच्या त्यावेळी. पण यंदा आयुषचं शिक्षण पूर्ण झालं होतं. आणि त्याने एक छानशी नोकरी जॉईन केली होती. म्हणून लवकर रिटायरमेंट घेऊन आयुषकडेच राहायला जावं असं तिला वाटायला लागलं होतं. एकटीने तरी आता किती काळ रहायचं ना? मग चक्क सुट्ट्या टाकून चांगले सहा महिने राहायचा प्लॅन करून आली होती ती.

या कायरोप्रॅक्टरच्या ऑफिसमध्ये ती आता तिसऱ्यांदा येत होती. गेल्या गेल्या निकोलने पुढे येऊन तिचं स्वागत केलं. मागच्यावेळी तिनेच एक्स-रे काढले होते. कायरोप्रॅक्टरचं हे ऑफिस म्हणजे एक भला मोठा हॉल होता. त्या हॉलचे साधारण पाच-एक विभाग केले होते. प्रवेश केल्या-केल्या दाराच्या डाव्या बाजूला दोन बेंच होते. एक छोटं कोट रॅक होतं. त्यावर तिने आपला अवजड कोट अडकवला, त्याबरोबर तिला मोकळं वाटलं. उजव्या बाजूला सांध्यांना व्यायाम देणाऱ्या मशिन्स होत्या. त्यातलं एक स्टूल फार मजेशीर वाटत होतं. त्याची सीट आणि पूर्ण गोलाकार सगळीकडून स्विवेल होत होती. त्यावर बसून लोकं कंबरेला छान व्यायाम देत होती. असं सगळ्यांसमोर व्यायाम करावा लागणार की काय असं वाटून स्मिताला थोडं ऑकवर्ड वाटलं. एका बाजूला भिंतीला लागून आडव्याशा, ज्यावर आपण पाय पसरून बसू शकतो अशा खुर्च्या होत्या. खुर्चीच्या पाठीशी एक मान ठेवायला रेस्ट होती, त्यावर मान ठेवून, चेहेरा वर छताकडे करून एक मुलगी बसली होती. तिच्या कपाळावरून लोंबकळणारा एक बेल्ट होता त्याला एक छोटा लोखंडी गोळा अडकवलेला होता. आणि तिच्या मांडीवर तिचं छोटं बाळ निर्धास्तपणे हातातल्या खेळण्याशी खेळत होतं. त्या निरागस बाळाला पाहताच स्मिताच्या चेहेऱ्यावर हसू उमटलं. आणि थोडं दडपण कमी झालं. मग हळूच बेंचवर बसून तिने हातमोजे, स्कार्फ, टोपी असे सगळे साज उतरवायला सुरुवात केली. तोवर आयुष तिथल्या ऑफिस स्टाफशी बोलत होता. स्मिताला न कळणाऱ्या इथल्या इन्शुरन्सच्या जंजाळातून त्याने तिचा पेमेन्ट प्लॅन जमवून आणला होता. या बावीस-तेवीस वर्षाच्या आपल्या मुलाला आलेली जबाबदारीची जाणीव आणि समस्येतून मार्ग काढण्याची वृत्ती बघून तिला खूप बरं वाटलं. बारावीनंतर लगेच नीलिमा त्याला अमेरिकेत घेऊन आली होती. त्याच्या शिक्षणाची सगळी जबाबदारी स्वतःवर घेऊन. बरेचदा वाटायचं तिला राहिला असता तो अजून काही वर्ष भारतातच, तर बरं झालं असतं. आपल्याला सावरायला मदत झाली असती.

एक पोरगेलेशी मुलगी आली आणि डॉ. विल्यम लवकरच इव्हॅल्युएशनच्या रिपोर्ट बद्दल बोलतील असं सांगून बाजूला असलेल्या एका छोट्या हॉलवे मधून ती स्मिताला आणि आयुषला एका कन्सलटिंग रूममध्ये घेऊन गेली. स्मिता ती कन्सल्टिंग रूम न्याहाळत बसली. बसायला खुर्च्या, एक तपासणीसाठी टेबल, कंप्युटर होता भिंतीवर एका बाजूला पाठीच्या कण्याची चित्रं, तक्ते, काही व्यायामाची प्रात्यक्षिक दाखवणारी चित्रं लावली होती. तेवढ्यात डॉ. विल्यम आले. त्यांनी स्मिताशी हस्तांदोलन केले आणि तिला तिचे रिपोर्ट्स कंप्युटरवर दाखवू लागले. तिच्याच पाठीचे, वेगवेगळ्या बाजूने झुकलेला कणा दाखवणारे एक्स रे, माहिती हे सगळं पाहत-ऐकत असतांना तिला भांबावून झाल्यासारखं झालं. 'स्कोलिओसिस' हे तिच्या सततच्या पाठदुखीचं कारण आहे असं निदान डॉक्टरांनी केलं होतं. तिच्या पाठीचा कणा एका बाजूला झुकत चालला होता, पिसाच्या झुकत्या मनोऱ्यासारखा. किंवा अगदी लांब दांडा असलेलं गुलाबाचं फुल कसं एकीकडे कललेलं असत तसं. म्हणजे ते फूल म्हणजे आपलं डोकं. याही परिस्थितीत आपल्या मेंदूतून मजेशीर उपमा सुचाव्या याची तिला गंमत वाटली.

असं ठरलं कि ३-४ महिने आठवड्यातून ३ वेळा इथे उपचार घेण्यासाठी यायचं. कायरोप्रॅक्टिक उपचार हे स्मितासाठी नवीन प्रकरण होतं. भारतात तर हे असं काही अजून तिने पाहिलं, ऐकलं नव्हतं. पाठदुखीचा तिचा त्रास कधीचाच. थोडेफार व्यायाम करणे आणि आयोडेक्स लावणे यापेक्षा तिने याकडे जास्त लक्ष दिलं नव्हतं. इथे आल्यापासून जास्तच त्रास व्हायला लागला आणि आयुषनी कायरोप्रॅक्टरकडे जायचा आग्रह धरला. आजचे ते झुकत्या मनोऱ्यासारखे पाठीच्या कण्याचे एक्स-रे पाहिले आणि वाटलं या झुलत्या मनोऱ्याला आता स्वतःच सावरलंच पाहिजे.

या प्रकाराची म्हणजे कायरोप्रॅक्टिक ऍडजस्टमेन्टची तिला थोडी भीतीच बसली होती. एकतर या ऍड्जस्टमेंट्स चक्क हॉलमध्ये सगळ्यांसमोर होतात. त्याबद्दल तिला भलता संकोच वाटत होता. हे ऍडजस्टमेन्ट वगैरे करतांना कुठे काही चुकीचा जोर पडला आणि हाड बीड मोडलं तर काय अशी भीती वाटून गेली तिला. आयुष मात्र तिला खूप धीर देत होता.

डॉ. विल्यम उंचेपुरे आहेत. तिथे जवळच व्यायाम करणाऱ्या तिशी-पस्तिशीच्या गृहस्थाला त्यांनी 'Hey Mark', अशी हाक मारून "If you are free, we can get started". असं म्हणत बोलावलं. पाठ ऍडजस्ट करता करता अगदी सहज त्यांचा संवाद सुरु होता. काल तुम्ही काय केलं? वगैरे विचारत डॉक्टरांनी मार्कचे हात त्याच्या छातीजवळ क्रॉससारखे ठेवले. स्वतः तसेच हात समोर धरून आपला सारा भार त्याच्यावर टाकला. बोट मोडतांना जसा कडकड आवाज येतो तसा आवाज आला. स्मिता थोडी दचकलीच. स्मिताला आता मार्कची काळजी लागली... थोड्यावेळ शांतता होती... डॉक्टर एकाग्रतेने पुढची ऍडजस्टमेन्ट करत राहिले. मग मार्क अर्ध राहिलेलं संभाषण पूर्ण करत 'काल घरूनच काम केलं.' असं काहीसं म्हणाला. ते शांत स्वरातलं वाक्य ऐकून स्मिताचा जीव भांड्यात पडला. पण थोडावेळच. मग डॉकटरांनी त्याला मान मोकळी सोडायला सांगितली आणि मान एकदा फटकन उजवीकडे आणि दुसऱ्यांदा डावीकडे फिरवली. पुन्हा स्मिता श्वास रोखून पाहत राहिली. आणि दोन मिनिटांनी पुन्हा त्यांचं संभाषण सुरु झालं. एक असिस्टंट

तिच्या प्लॅनची प्रत घेऊन स्मिताकडे आली मग स्मिताने सगळे रिपोर्ट्स आणि इतर कागदपत्र उचलले आणि ऍलेक्सला आणि निकोलला निरोप दिला.
घरी येऊन सारखे हेच विचार तिच्या मनात घोळत राहिले. 'स्कोलिओसिस'... 'कायरोप्रॅक्टिक केअर'... . दोन्ही गोष्टी तिच्यासाठी नवीनच होत्या. स्मिताला काही सुचेनासं झालं. नीलिमाला विचारावं का? ही तिची नेहेमीची सवय, काही सुचत नसेल तर ती नीलिमाला किंवा आयुषला फोन लावत असे. ते सुद्धा न कंटाळता स्मिताच्या मनातला गुंता सोडवायला मदत करत असत. पूर्वी ती राजेशला विचारायची. सोळा वर्षाचा सुखाचा संसार. एखादं पान जरी हलवायचं तरी दोघे मिळून ठरवणार. अगदी जिवाभावाचं सख्य होतं त्यांचं. साहजिकच सगळ्याच बाबतीत त्याच्यावर अवलंबबून राहायची सवय झाली होती स्मिताला. त्याचं असं अचानक अपघातात जाणं सहनच झालं नव्हतं तिला. ज्याच्यावर निर्धास्त डोकं ठेऊन राहावं अशा खांद्याचा आधार खसकन हिसकावून घेतला होता नियतीने. तिची अगदी सैरभैर अवस्था होऊन गेली होती. आयुष अगदी आठवीत होता तेव्हा. तो तर अगदी केविलवाणा होऊन गेला होता. तिथेच शाळेत नोकरी लागली आणि वरवर तरी गाडा सावरला. पण आतून कोलमडलीच स्मिता. नीलिमाने खरा आधार दिला. आयुषच्या बारावीत येऊनच राहिली ती पाच-सहा महिने आणि हट्टाने घेऊन गेली अमेरिकेत. आयुषही मग नीलिमाआत्यावर अवलंबून राहू लागला. नीलिमाने आयुषचं आयुष्य सावरलं म्हणायचं. पण स्मिता मात्र पूर्ण एकाकी झाली.
एक निश्वास सोडून स्मिता तिच्या रूममध्ये आली. तिथे ड्रेसरवर तिचा आणि राजेशचा फोटो ठेवला होता. इतके वर्ष ती त्या फोटोकडे पाहत असे. आज पहिल्यांदाच तिच्या एक गोष्ट लक्षात आली. ती राजेशला रेलून त्याच्या आधारावर निर्धास्त उभी होती. मनाने पण त्याच्यावर विसंबून होती. राजेश गेला, मग ती आणि तिचा कणा असाच अधांतरी राहून गेला. कुठलातरी अदृश्य आधार शोधत एका बाजूला झुकत राहिला. .

"गुड मॉर्निंग स्मिटा!" स्मिताने प्रवेश केल्या केल्या निकोल, एमी, ऍलेक्स यांनी जिथे असतील तिथून तिचं स्वागत केलं. ट्रीटमेंट सुरु होऊन आता एक महिना होत आला होता. आता तिला इथल्या रुटीनची सवय झाली होती. सुरुवातीला वाटणारी भीती, संकोच गेला होता. इथे येणाऱ्या पेशन्ट्सना ती ओळखायला लागली होती. तिच्या नकळत ती त्यांच्या लकबी, त्यांच्या स्वभावाचे बारकावे टिपत होती. बास्केटबॉल खेळणारी सहाफुट उंचीची कॅथी, तिचं भारदस्त आणि शिस्तशीर वागणं स्मिताला आवडलं. नाजूक चणीची छोटीशी आणि टीपटाप, कुठेही न रेंगाळणारी किम, स्वतःचा व्यवसाय करणारा बडबड्या मॅक्स, बाळाला कारसीट मध्ये घालून घेऊन येणारी सँडी, बाळ एकदा तिकडे आलं की कधी निकोलच्या कडेवर खेळ, कधी एमीकडे जा अशी सफर करत असे आणि सँडी तोपर्यंत तिची ऍडजस्टमेन्ट करून घेत असे. आज न राहवून तिने बाळाला खेळवलंच. मन प्रसन्न झालं एकदम.
आज डॉक्टर विल्यमनी ट्रीटमेंट झाल्यानंतर विचारलं, काय फरक जाणवतो आहे का? वरवर काही फरक वाटला नाही तरी पाठ बरीच मोकळी वाटत होती. पाठदुखी थोडी कमी झाल्यासारखी वाटत होती. एकंदरीत थोडा जास्त मोकळेपणा आला होता चालण्यात. डॉक्टरांनी समाधान व्यक्त केलं. स्मिताला समजावून

सांगितलं की कुठलंही स्थित्यंतर हळूहळू आलेलंच चांगलं. आपल्याला सहन न होणाऱ्या गतीने किंवा एकदम बदल घडले तर आपलं शरीर ते तो ट्रॉमा आहे असं समजतं आणि अजून जास्तच प्रतिकार करतं. "The important thing is you notice the changes. I am happy with your progress Smita!" दोन्ही हातांनी 'थम्स अप'ची ऍक्शन करत डॉक्टर विल्यम म्हणाले. एकतर कितीतरी दिवसांनी कोणीतरी तिला तिने केलेल्या प्रगतीबद्दल आंनदाने सांगत होतं आणि नवल म्हणजे साठी जवळ आलेल्या स्मिताला असं तरुणासारखं थम्सअप करून कोणीतरी प्रोत्साहन देत होतं. तिला खुद्कन हसूच आलं.

आज थोड्या वयस्क मैत्रिणींचा घोळका आला होता क्लिनिकमध्ये. त्या इथेच येऊन ट्रीटमेंट घेऊन बऱ्या झाल्या होत्या. त्यांच्या गप्पा सुरु होत्याच. त्यांनी स्मिताला सुद्धा त्यात सामील करून घेतलं. त्यांना कसा या ट्रीटमेंटचा फायदा झाला याची हकीकत आणि इथल्या गमती-जमती ऐकवल्या. सगळ्यांशी बोलून त्यांना घरी केलेल्या कुकीज देऊन मंडळी लंचसाठी गेली. सगळ्या सत्तरीच्या. पण उत्साह तरुणींचाच. स्मिताचे विचारचक्र सुरु झाले. आपल्याला आयुषला त्रास न देता येणंजाणं करता येईल का? मग तिने निकोलकडे बसबद्दल चौकशी केली तर तिला कळलं की इथे बसेस असतात. मग बसचं वेळापत्रक मागवून आयुषकडून कुठल्या स्टॉपवर चढायचं, कुठल्या उतरायचं, हे समजावून घेतलं. आता थंडी कमी झाली होती. बर्फसुद्धा बंद झाला होता. आयुषने बसवून दिलं आणि ती योग्य स्टॉपवर उतरली. मागे बघते तो आयुष बसपाठोपाठ आलाच होता. तिला हसू आलं. सहावीत सायकलनीच शाळेत जाणार म्हणून त्याने ठरवलं तेव्हा स्मितासुद्धा 'हा व्यवस्थित जातो की नाही' म्हणून रिक्षाने त्याच्या पाठीमागे गेली होती. जबाबदारीची अदलाबदल झाल्याची तिला जाणीव झाली. मग स्मिता बरेचदा बसने जायला लागली. परतीची बस थोडी उशिराने येत असे. तेव्हा थोडं एक्सप्लोर करायचं ठरवलं. हे क्लिनिक ज्या ठिकाणी होतं तिथेच एक 'हॉबी लॉबी' दिसलं तिला. आयुषबरोबर काहीवेळा ती आली होती इथे. फिरत फिरत ती पेंटिंगचं सामान जिथे असतं तिथे आली आणि तिला एक कल्पना सुचली. आपण त्या क्लिनिकसाठी एखादं पेंटिंग करून द्यावं का? किती दिवसात असं कॅनव्हासवर मोठ्ठं पेंटिंग केलं नव्हतं. शाळेत ती शिकवायची ते अगदी बेसिक पेंटिंग असे. लहान मुलांना योग्य असं. कितीतरी वर्षांनी काहीतरी सुंदर कलाकृती करावी असं तिला वाटायला लागलं. आणि तिने सगळं सामान विकत घेतलं.

नीलिमा येणार म्हणून तिने खास बेत केला होता. नीलिमाचा उत्साहाचा धबधबा आला आणि तिनेच सगळ्या घराचा ताबा घेतला. हळूहळू आयुषसुद्धा त्या गप्पांमध्ये सामील झाला. शांत शांत असलेला आयुष मस्त हसत होता. ते इतके दिवस अमेरिकेत राहत असल्याने त्यांच्या गप्पांतले बरेचसे संदर्भ तिला लागेनासे झाले. आपोआप तिने श्रोत्याची भूमिका घेतली. "काय मग कशी चाललीय कम्पनी? किती काम असतं?.. बॉस कसा आहे?.... मित्र कुठे असतात?" नीलिमाने विचारलं. अचानक स्मिताच्या काळजात छोटोशी कळ उमटली. असं वाटत होतं की आयुष नीलिमाचाच मुलगा आहे आणि आपणच त्याच्या आत्या आहोत. आपल्या सैरभैर काळात आपण पोराला गमावून बसलो याची खंत तिचं काळीज कुरतडत गेली. डोळ्यात जमा होणारं पाणी दिसू नये म्हणून ती 'पाठ दुखते आहे थोडं पडते' असं सांगून तिच्या खोलीत

गेली. मनसोक्त रडून झाल्यावर तिला मात्र अपराधी वाटलं. आपण असे नैराश्याला तोंड देत होतो तेव्हा आयुष तिथेच राहिला असता तर त्याचं नुकसान झालं असतं. निदान त्याच्या आयुष्यात तरी आनंद आला. तोंडावर पाणी मारून ती बाहेर जायला निघाली तेव्हा तिच्या कानावर त्यांचा संवाद आला. "एवढी फी? व्हिजिटर इन्शुरन्स कव्हर करेल?.... मी पाठवते तुला पैसे... " नीलिमा म्हणत होती. "नाही ग आत्तु, होईल माझ्या सेविंग्समध्ये ऍडजस्ट." हा संवाद आपल्याबद्दल आहे हे तिला कळलं आणि ती जागेवरच थांबली. स्मिताचा स्वभाव एरवी सुद्धा अबोल असल्यामुळे तिच्या मनातली चलबिचल कोणाला जाणवली नाही. नीलिमाने बोलता बोलता विचारलं, "आता तुझ्या रिटायरमेंट किती वर्ष आहेत अजून?" " चार" स्मिताचं उत्तर. "नंतर काय ठरवलं आहेस?" स्मिताने प्रश्नार्थक नजरेने नीलिमाकडे पाहिलं. "अगं, आता कुठे आयुषला जॉब लागला आहे. जॉब लागला म्हणजे झालं असं समीकरण राहिलं नाही. मुलं अजून चांगल्या संधी शोधतात. जोपर्यंत स्थैर्य येत नाही तोपर्यंत त्याला ग्रीनकार्ड साठी अप्लाय करता येणार नाही. अप्लाय करेल तिथून पुढे काही वर्ष प्रोसेसिंगला, ग्रीनकार्ड मिळालं की मग सिटीजनशिप. त्यानंतर तो तुझ्या ग्रीनकार्डसाठी अप्लाय करू शकेल. या सगळ्यात किती वर्ष जातील सांगता येणार नाही. मला माहित आहे तुला आयुषकडे येऊन राहायचं आहे. पण ते ना त्याच्या हातात आहे ना तुझ्या. राग मानू नको पण तुला तुझं स्वतःचं असं विश्व निर्माण करावं लागेल आता." स्मिताला या बोलण्याचा रागही आला नाही आणि वाईटही वाटलं नाही. याबद्दल तिने विचारही केला नव्हता. स्वतःचं कुठलं विश्व? जे विश्व मन लावून उभं केलं होतं ते नाहीसं झालं होतं. त्या विश्वाचा भाग म्हणून आयुषला तिच्या मनात घट्ट धरून ठेवलं होतं. त्याच्या आधाराची ती वाट पाहत होती. पण हे काही खरं नाही. आपणच खंबीर झालं पाहिजे. कणा ताठ ठेऊन आपणच आपला आधार झालं पाहिजे आणि जमलंच तर आयुषचाही.

तिने हे सगळे विचार बाजूला ठेऊन हातात ब्रश घेतला आणि भराभर कॅनव्हासवर ब्रशचे फटकारे बसू लागले. जणू तिचं मन दुःखाचे, नैराश्याचे रंग टाकून उत्साहाचे समर्थ रंग निवडत होतं. जेंव्हा पेंटिंग पूर्ण झालं तेंव्हा तिचं मन पूर्ण शांत झालं होतं. काही वेळापूर्वीच्या गहिऱ्या रंगाचे सावट तिच्या मनावरही नव्हते आणि तिच्या कॅनव्हासवरही. पेंटिंगच्या तळाशी तिने पूर्वी करायची तशी लफ्फेदार सही केली आणि तिचं मन समाधानाने भरून गेलं.

ऍलेक्सने तिला काही व्यायाम करायला सांगून तिचं इव्हॅल्युएशन केलं. तिच्या शरीराची डावी बाजू आणि उजवी बाजू यात काही इम्बॅलन्स आहे का हे ती तपासत होती. सुरुवातीला जेवढा इम्बॅलन्स होता त्यापेक्षा आता किती तरी कमी झाला होता. याचाच अर्थ पिसाचा झुकता मनोरा झालेला तिचा पाठीचा कणा हळूहळू पूर्वपदावर येत चालला होता. तिला क्लिनिकबद्दल अगदी कृतज्ञता दाटून आली. त्यांना खरंच कल्पना नव्हती की तिच्या पाठीच्या कण्याबरोबरच तिच्या मनाचा सुद्धा बॅलन्स हळूहळू पूर्ववत येत होता. तिने हे पेंटिंग गिफ्ट म्हणून डॉक्टरांना आणि सगळ्या स्टाफला दिलं. त्याचं केवढं कौतुक झालं. प्रत्येकाने हस्तान्दोलन करून धन्यवाद दिले. चित्रातल्या रंगसंगतीचं, विषयाचं कौतुक केलं आणि अगदी सगळ्यांना दिसेल अशा ठिकाणी त्याला जागा दिली. स्मिता अशा कौतुकाने हरखून गेली. ती जेव्हा ‘स्कूल ऑफ

आर्ट'मध्ये होती तेंव्हा तिच्या काही चित्रांची प्रचंड वाहवा झाली होती. त्यावेळीही तिला एवढं अप्रूप वाटलं नव्हतं. नंतर मात्र तिने चित्र काढणं आणि प्रदर्शनं भरवणं कमीच केलं होतं. आधी संसारात गर्क झाल्यामुळे आणि नंतर....

नेहेमीप्रमाणे ऍलेक्स तिच्याशी गप्पा मारायला आली. "Smita, we didn't know you are an artist. Do you paint professionally?" "Not nowadays, but I would like to start painting again." स्मिताने मग तिला तिच्या चित्रांच्या, प्रदर्शनाच्या आठवणी सांगितल्या. तिला भरभरून बोलावंसं वाटलं. जाता जाता ती सहज म्हणाली, " Would you mind painting something for me? I wouldn't mind paying for it."

स्मिता उत्साहाने कामाला लागली. कितीतरी संकल्पना, भावना कुंचल्यातून कॅनव्हासवर उतरू लागल्या. कसल्यातरी अनामिक जाणिवेने भारल्याप्रमाणे तिची चित्रं पुन्हा जिवन्त होत होती. इतके वर्ष जे अंतर्मनात दडून बसलं होतं ते सगळं रितं झालं. शब्दात न व्यक्त होणारं सगळं कुंचल्यातून व्यक्त झालं. जणू तिचा त्या कॅनव्हासशी संवाद सुरु होता.
जुलैचं स्वच्छ ऊन होतं, पक्ष्यांची मंजुळ किलबिल साथीला होती. आयुषने पिकनिकचा प्लॅन आखला, म्हणाला, " तुझं पेंटिंगचं सामानपण घेऊन चल. खूप सुंदर तळं आहे तिथे तुला नक्की आवडेल." कुणाही चित्रकाराला मोह पडावा असा देखावा. आयुषसुद्धा उत्साहात येऊन या जागेबद्दल, पिकनिकबद्दल भरभरून बोलत होता. "आई तू हे पेंटिंग करायला लागलीस ना ते खूप मस्त झालं. तू खूप चित्र काढत जा आपण एटसी वर विकू." "हे एटसी काय?" स्मिताचा प्रश्न. खरंतर आज किती दिवसांनी आयुष असं पूर्वीसारखं बोलतो आहे याचंच तिच्या मनाला समाधान वाटलं. आणि एखादं सुरेल गाणं ऐकावं तसं ती आयुषचं बोलणं मन लावून ऐकत राहिली.
आज तिचा ट्रीटमेंटचा शेवटचा दिवस होता. इव्हॅल्युएशन झालं होतं. ती आणि आयुष क्लिनिकमध्ये पोहोचले तर सगळ्या असिस्टंट्स हजर होत्या. सगळ्यांनी हसून स्वागत केलं आणि स्मिता नवलाईने पहात राहिली. रिसेप्शननंतरच्या भिंतींपासून ते आत हॉलवेच्या भिंतींवर तिची पेंटिंग्स छानशा फ्रेममध्ये लावून प्रदर्शित केली होती. प्रदर्शनाचं नाव होतं 'Chiropractor's office - Impressions'. स्मिताला काय बोलावं कळलंच नाही. आयुषला काही समजलं नाही पहिल्यांदा पण प्रत्येक पेंटिंगच्याखाली 'स्मिता' अशी ओळखीची लफ्फेदार सही पहिली आणि त्याच्या डोळ्यात पाणी तरळलं. स्मिताने तिने काढलेली पेंटिंग्स या क्लिनिकला दान केली होती. आणि त्यांना त्याचे प्रदर्शन भरवून पैसे मिळवण्याचे किंवा ती पेंटिंग्स विकण्याचं स्वातंत्र्य दिलं होतं. अट अशी की त्यांनी हे पैसे गरजूंच्या उपचारासाठी वापरावे. तिच्या पेंटिंग्सचं छोटेखानी उदघाटन झाल्यांनतर डॉ. विल्यमनी आयुषच्या हातात एक लिफाफा दिला आणि हा फीमध्ये दिलेला स्पेशल डिसकाऊन्ट आहे असं म्हणाले आणि स्मिताच्या हातात तिचे रिपोर्ट्स. स्मिताने विचारलं, "Does it mean I am completely healed now?" त्यावर ते हसून म्हणाले, "Not completely...but enough to carry on your own". आणि स्मिताला पटलं ते. ती पूर्ण बरी जरी झाली

नसली तरी ताठ उभं राहण्याइतकी तरी नक्कीच सक्षम झाली आहे. आणि कणा पूर्ण ताठ होत जाणं हे हळू हळू घडत राहणार आहे.

*****************************************************************************

**<u>लेखिकेविषयी -</u>**

**श्रद्धा भट** आर्किटेक्चर या विषयात पदवीधर असून मराठी व इंग्रजी या दोन्हीभाषांमध्ये त्यांचे काव्यलेखन प्रकाशित झाले आहे. जानेवारी २०२०मध्ये त्यांचा "कॅलिडोस्कोप" हा कवितासंग्रह प्रकाशित झाला. "सकाळ", "गावकरी", "महाराष्ट्र टाइम्स", "लोकमत" व इतर साप्ताहिके, मासिके व वृत्तपत्रे यांतून त्यांच्या कविता तसेच विविध नियतकालिकांमधून प्रासंगिकलेख, कथा व लघुकथा प्रसिद्ध झाले आहेत. 'बियॉंड द सी' या अमेरिकेत प्रकाशित झालेल्या इंग्रजी कवितांच्या संकलनामध्ये त्यांच्या कवितेचा समावेश आहे.

*****************************************************************************

**उल्लेखनीय कथा-१**

**नातिचरामि**

**लेखिका: अमृता देवधर**

शेजारी ठेवलेला फोन वाजला तसं निखिलनं मान वळवून बघितलं. फोनवरची अक्षरं चमकत होती. नेत्रा! त्यानं हात लांब करून फोन उचलला. 'कितवी सिगारेट ओढतोयंस?' नेत्राचा प्रश्न. 'मी? आणि सिगरेट? काहीतरीच काय!' निखिलनं स्वतःला वाचवण्याचा दुबळा प्रयत्न करून बघितला. 'नाही? नसेल तर बरंच आहे पण तुला आज ओळखत नाही मी!' ‘करतो ग बंद माझे आई!' निखिल वैतागून म्हणाला. 'दॅट्स बेटर!’ पलीकडून शांत पण तरीही कडक आवाज आला अन् फोन बंद झाला.
खिडकीतून बाहेर बघत निखिलनं पुन्हा एकदा नवी सिगरेट शिलगावली. कितवी कोणास ठाऊक! तिच्यातून निघणाऱ्या कमनीय बांध्याच्या नर्तिकेसारख्या दिसणाऱ्या धुराच्या लकेरीकडे तो पाहत राहिला. सिगरेट हातात असली की विचार करायला सोपं जातं. सिगरेटसारखी दुसरी गोष्ट नाही! ती फक्त आपल्याला सोबत करते. बडबड करून वीट आणत नाही की सतत प्रश्न विचारून अस्वस्थ करत नाही. आणाभाका मागत नाही की आठवणी जाग्या करत नाही. आता नेत्राला आवडत नाही म्हणा ती आपल्याजवळ असलेली पण तिच्यासारखी तीच! दुसरी कोणीही नाही, अगदी नेत्राही!

आज सकाळीच नेत्राशी झक्काझक्की झालेली. दिवस उजाडला नाही की हिचं टुमणं सुरू, ‘विचार कर, विचार कर.’ कितीदा आणि कसला विचार करायचा सारखा सारखा? विचार करकरून, समजावून इतका थकलोय

आता की आज शेवटी ऑफिसला दांडी मारली मी, त्याच्या मनात आलं. आता अजून बॉसचं म्हणणं ऐकून, समजून घेऊन काम करायची शक्तीच उरली नाहीये माझ्यात!
परत विचारांच्या तंद्रीत हरवत निखिलचं मन भूतकाळात शिरलं. अमेरिकेत येऊन पोचलो त्याला किती बरं वर्षं झाली? बापरे, आता एकोणीस- वीस वर्षं होतील जवळपास. आधीची वर्षं चांगली नोकरी शोधण्यात, बस्तान बसवण्यात गेली. मग पुढची वर्षं भारतातलं घर स्थिरस्थावर करण्यात, बहिणीचं लग्न, भावाचं शिक्षण, मग आणखी चांगली नोकरी, आईवडिलांचं म्हातारपण यात कुठे कशी निघून गेली कळलंही नाही. या इतक्या वर्षांमध्ये अपेक्षांची ओझी पूर्ण करत, सगळ्यांना भक्कम आधार देत आपण मात्र धावत राहिलो. निखिलनं थकून डोळे मिटले.

आई होती तोवर ती मागे लागायची, 'मुलगी बघ रे एखादी, लग्न करूनच जा यावेळी अमेरिकेला.' पण घरच्या, नातेवाईकांच्या अपेक्षा पूर्ण करता करता ना इथे कोणी भेटली ना भारतातल्या धावत्या भेटीत कोणी मनासारखी गवसली! कित्येकजणी डोळ्यांखालून गेल्या. कोणी चहा पोहे कार्यक्रमात, कोणी दुसऱ्यांच्या लग्नात तर कोणी चुकून नजरेला पडतील अशा मुद्दाम आणून उभ्या केलेल्या! सगळ्या अमेरिकेच्या स्थळासाठी आसुसलेल्या! पण त्यांना फक्त अमेरिका हवी होती, त्यातल्या कोणालाच मी नको होतो! एखाददुसरी आवडलीही होती त्यातली पण त्या स्थळांचं पुढे काही झालं नाही.
इतक्या वेळा इथून भारतात जाणं झालं असेल पण कधी आईचं आजारपण कधी ताईचं लग्न तर कधी घराचं बांधकाम आडवं यायचं. या सगळ्या कामांमधून सुट्टी कधी संपायची कळायचंदेखील नाही. हे काम झाल्यावर स्थळं बघू, ते झाल्यावर बघू म्हणेपर्यंतच तिथून परतीच्या प्रवासाला निघायची वेळ जवळ यायची. मग दर वेळी 'पुढच्या वेळी आलो की नक्की' असं आश्वासन आईला देऊन आपण बॅग भरायला घ्यायचो. घरातल्या जबाबदाऱ्या निभावता निभावता आपलं लग्न हा विषय नकळत सगळ्यांच्याच मनातून मागे पडत गेला.

या सगळ्या धकाधकीत नेत्रा अचानक कधी बरं आयुष्यात आली, निखिल आठवू लागला. खरंच, कळलंही नाही आपल्याला. कुठल्यातरी मित्रमैत्रिणींच्या ग्रुपमध्ये भेटलो होतो हिला. कधी अन् कशी नजरेला नजर भिडली, जवळीक झाली कळलंच नाही! जवळ येत गेलो, गुंतत गेलो. आजारी पडलो होतो. तोंडाची चव गेली होती. तेव्हा आईच्या मायेनं तिनंच वरण भात लोणचं करून खाऊ घातलं होतं. थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवल्या होत्या. त्राण नव्हतं अंगात तर घरातली कितीतरी छोटी मोठी कामं तीच करत होती. नव्या जॉब इंटरव्ह्यूला जाण्याआधी तिनेच देवाच्या पाया पडायला लावलं होतं. खरंच, बघता बघता कधी तिनं आपला आणि घराचा ताबा घेऊन टाकला कळलंच नाही!
पण आपल्यालाही हवंच होतं की हे सगळं! संध्याकाळी ऑफीस सुटल्यावर थकून घरी येताना यायचंच मनात कधीतरी की कोणीतरी असावं वाट बघणारं! कधीतरी भास व्हायचाच की बांगड्यांचा आवाज येतोय आतल्या खोलीतून. बांगड्या, जोडवी, कुंकू या साऱ्याची आस कधीपासून लागली बरं आपल्याला? नोकरी

करणारी, पैसे मिळवणारी, स्वतंत्र बाण्याची, 'स्वयंपाक मी केलाय, भांडी तू घास' असं म्हणणारी बायकोही चाललीच असती की आपल्याला, निखिलच्या मनात आलं. मग आता हे सगळं मिळतंय तर मन का घाबरतंय? घाबरतंय? छे, आता या सगळ्यासाठीचं वय उलटून गेलंय अन् हे सगळे सोपस्कार नको वाटतायंत आता. आयुष्याचा आस्वाद घ्यायला सोबत मिळावी कोणाची तरी, इतकीच इच्छा आहे आता!

नेत्राही तिच्या घरात थोरली. कनिष्ठ मध्यमवर्गीय घरातली मोठी मुलगी. वडील अचानक गेले. हिचं शिक्षण चालू होतं. ते कसंबसं पूर्ण झालं. पाठच्या तीन बहिणी. सगळ्यांची शिक्षणं, लग्नं सगळी जबाबदारी नेत्रावर येऊन पडली. ती जबाबदारी पूर्ण करायला चांगली नोकरी शोधत शोधत नेत्रा अमेरिकेत येऊन पोचली होती. घरात ताईचा मान मोठा, तिच्या शब्दांना वजन खूप पण तिच्या सुखाचा विचार करायला मात्र कुणाकडे वेळ नाही. किंबहुना तिचं लग्न, तिचं भविष्य हे विषय सोयीस्करपणे टाळलेले. काही काळ वाट बघून तिनंही आपल्या इच्छा, अपेक्षा मनाबाहेर टाकून दिल्या. मन असं रितं होत असताना अचानक मित्रमैत्रिणींच्या गर्दीत तिला निखिल दिसला. तिच्यासारखाच एकाकी. त्याच्या डोळ्यांतून त्याचं एकटेपण नेत्राकडे वाहत गेलं. तिला तो आपलासाच वाटला एकदम. आणखी थोड्या भेटी झाल्या, थोडे आढेवेढे झाले अन् मग ती दोघे एकत्रच राहू लागली.

या अशा एकत्र राहण्याने अमेरिकेसारख्या अवाढव्य देशात कोणालाच फरक पडत नव्हता आणि भारतातल्या नातेवाईकांना कळवून आपल्या पायावर धोंडा पाडून न घेण्याइतपत शहाणपण त्या दोघांकडे एव्हाना आलं होतं! आपलं सुख आपल्यालाच शोधावं आणि निवडावं लागणार आहे, याची उमज इतक्या वर्षांत नक्कीच आली होती. त्यामुळे गेली तीन वर्षं त्यांचं एकमेकांबरोबर बरं चाललं होतं. नाही म्हणायला भारतात फक्त नेत्राच्या आईला ही गोष्ट माहित होती. पचनी पडत नव्हती पण नेत्राच्या कर्तृत्वापुढे तिचं फारसं काही चालत नव्हतं. कारण कितीही झालं तरी नेत्रा त्या घरातला 'कर्ता' होती आणि तिच्यापुढे बोलण्याचं धाष्ट्र्य आईमध्ये नव्हतं. असलंच तर आईचं म्हणणं एकच होतं, 'लग्न कर!'

सुरुवातीला जरा जडच गेलं दोघांनाही. नेत्राचं पाऊल आत पडेपर्यंत निखिलचं अपार्टमेंट म्हणजे संन्याशाची मठी होती. एकटा जीव सदाशिव! त्यामुळे त्याच्या एकट्याचंच सामान आवरून ठेवता ठेवता त्याचं छोटंसं घर बिचारं थकून जायचं. कुठेही, काहीही पडलेलं असायचं. ‘अगं, उलट आवरून ठेवल्या की मिळत नाहीत गोष्टी वेळेवर’, असं तो नेत्राला म्हणायचा. पण नेत्राचा हात फिरला घरावर आणि घराला घरपण आलं! आपलंच घर इतकं नेटकं बघून सुरुवातीला निखिल जरा बिचकलाच. आपल्या एकट्याच्याच वस्तू पोटात न माववू शकणारं हे घर आता दोघांचं सामान घेऊन कसं नीटनेटकं सजून उभं आहे, हे काही त्याला कळेना! 'बास, आता फक्त तुळशी वृंदावन आणलं की झालं', त्याने नेत्राला चिडवलं होतं. पण मनातून मात्र हा साज त्याला आवडला होता. आपल्या घराला आणि आयुष्यालाही 'तिच्या' येण्याची किती निकड होती हे त्याला मनोमन माहित होतं.

दोघांचं एकत्र आयुष्य सुरू झालं. आयुष्याचा आनंद जोडीदाराबरोबर उपभोगणं काय असतं, या अप्रुपाचा अनुभव घेणं आता चालू झालं. दोघांचं एकामेकांसाठीचं जगणं चालू झालं. एकामेकांसोबत राहून तर बघू, जमली भट्टी तर जमली, नाहीतर आहेच आपलं सडाफटिंग आयुष्य, असा विचार करत नेत्रानं अजून आपलं भाड्याचं घर सोडलं नव्हतं. पण लवकरच दोघांनी परस्पर संमतीनं तोही निर्णय घेतला आणि नेत्रा पूर्णपणे निखिलकडे राहायला आली. दोघं एका घरात रमले, एकमेकांच्या आयुष्यात रमले. सगळं छान सुरळीत चालू होतं. अशात कुठून नेत्राच्या मनात हा विचार आला न कळे! निखिलनं वैतागून सिगरेटची राख झटकली आणि तो पाय मोकळे करायला बाहेर पडला.

आताशा नेत्रानं भुणभुण चालवली होती, आपण लग्न करूया. निखिलनं पहिल्यांदा ऐकलं तेव्हा क्षणभर त्याला ती काय म्हणतेय हेच कळेना! “सगळं छान चाललंय की आपलं. एकत्र हिंडतोय, फिरतोय, मजा करतोय, आयुष्य उपभोगतोय. आता ही लग्नाची बेडी कशाला हवी पायात?”, त्यानं न राहवून तिला विचारलं होतं, "लग्न करूनच सुखी होतो की काय माणूस?" तिला मात्र सनई चौघडे, गजरे, मुंडावळ्या, शालू, भटजींचे मंत्र, नातेवाईकांची लगबग या सगळ्याची भूल पडली होती. कधी काळी पाहिलेली कोवळ्या वयातली सोनेरी स्वप्नं निखिलची साथ मिळाल्यावर परत एकदा तवंगासारखी पाण्यावर आली होती. त्याच्या हाती हात देऊन देवाब्राह्मणांच्या साथीनं जन्मभरासाठी त्याला आपला मानायचा होता. त्याच्या नावाचं सौभाग्यलेणं अंगाखांद्यावर ल्यायला नेत्रा आसुसली होती.

सुट्टीच्या दिवशी कुठली तरी बाग बघायला गेले होते दोघेही. अमेरिकन पद्धतीनुसार तिथे कोणाचा तरी लग्नसोहळा सुरू होता. पांढराशुभ्र वधूवेष परिधान केलेली ती नववधू आणि काळ्या सुटात शोभून दिसणारा नवरदेव. त्यांच्यामागे हास्यविनोदात मश्गुल असणारा मित्रमैत्रिणींचा घोळका. दोघांचे थोडे थोडे नातेवाईक आणि या सगळ्यांचे फोटो काढत फिरणारी फोटोग्राफर. नेत्रा अनिमिष नजरेनं हे सगळं पाहत होती. बागेतल्या फुलांपेक्षा तिची नजर या वऱ्हाडावर खिळून होती, हे निखिलनं पाहिलं होतं. खास करून नवरा-नवरीवर! फुलांची साधीशीच सजावट असलेल्या छोट्याश्या स्टेजवर उभं राहून अमेरिकन भटजींसमोर त्यांचं आणाभाका घेणं सुरू होतं.
‘....... फॉर बेटर फॉर वर्स, फॉर रिचर फॉर पुअरर, इन सिकनेस इन हेल्थ, टु लव्ह टु चेरीश, टिल डेथ डु अस अपार्ट, अकॉर्डिंग टु गॉड्स होली लॉ अँड आय प्लेज दी माय फेथ.......!’
‘नातिचरामि’ नेत्रा पुटपुटली. “हं? काय म्हणालीस?” निखिलनं विचारलं. “काही नाही”, नेत्रा म्हणाली पण तिच्या डोळ्याच्या कडांवर उभे असलेले अश्रू निखिलनं पहिले होते. तोही क्षणभरासाठी गप्प झाला. नेत्राला काय अन् कसं समजवावं हे निखिलला कळेना. लग्नाच्या गाठी बांधून- न बांधून काय फरक पडतो? आपण एकमेकांसाठी आहोत ही गोष्ट पुरेशी नाही का? त्याच्या मनात आलं होतं. पण नेत्राच्या मनी हे उतरवणं कर्मकठीण गोष्ट होती. तिच्या मनानं एकच धोसरा घेतला होता, लग्न!

रस्त्यातला एखादा खड्डा फारच मोठा झाला तर माणसं शेवटी त्याला वळसा घालून पुढे जात राहतात तसं झालं. पुन्हा पुन्हा भांडणावर गाडी यायला लागली तेव्हा लग्नाचा प्रश्न तात्पुरता तरी अनुत्तरीतच ठेवून निखिल- नेत्राचं आयुष्य पुढे चालू राहिलं. पण आता त्यात एक प्रकारचा कोरडेपणा आला. निखिललाही हे जाणवत होतं पण यातून पुढची वाट कशी काढायची ते मात्र कळत नव्हतं.
रोजचं दैनंदिन आयुष्य, ऑफीसचं काम, वीकएंडला फिरणं सगळं नेहमीसारखंच चालू होतं. पण एकमेकांच्या सानिध्यात आयुष्याची मजा घेणं मात्र थांबलं होतं. सतारीच्या तारा जुळता जुळत नव्हत्या. सूर विसंवादी लागत होते.

नेत्रा ऑफिसात पोचली तेव्हा तिनं पाहिलं, फक्त मार्था आली होती. दोघींनी या ऑफिसात एकत्रच सुरुवात केली होती. तेव्हापासून दोघींचं एकमेकींशी चांगलं पटत होतं. आपल्या मनात जे उलतंय ते वाटून घ्यायला मार्था अगदी योग्य व्यक्ती आहे, नेत्राला वाटलं. मार्थालाही निखिलबद्दल माहित होतं. गेली काही वर्षं जॉनबरोबर लिव्ह इनमध्ये राहून मार्थानं त्याच्याशी लग्न केलं होतं. तिच्यासारखंच आपणही लिव्ह इनमध्ये राहतोय, लग्न करायचं म्हणतोय. आपल्या मनातलं तिला नेमकं कळेल, आपला लग्न करण्याचा आग्रह कसा बरोबर आहे हे पटेल, याची नेत्राला खात्री होती.
ती मार्थाशी गप्पा मारायला गेली. बोलता बोलता तिनं सहज त्यांच्या लग्नाचा विषय काढला. नेत्राशी बोलताना मार्थालाही कित्येक दिवसांनी मनातलं ऐकणारा, समजून घेणारा श्रोता मिळाला. "काय ग, कशी आहेस? कसं चाललंय दोघांचं?” "हो, बरी आहे की, नसायला काय झालं!” बोलता बोलता मार्था विचारात हरवली, “कंटाळा आलाय ग नेत्रा मला. असं वाटतंय, आधी आम्ही लिव्ह इनमध्ये होतो तेच बरं होतं. बंधनं, जबाबदारी यांच्या ओझ्याखाली प्रेम कुठेतरी हरवूनच गेलंय बघ आमचं!" "का ग असं म्हणतेस? शेवटी नवरा बायको म्हणजे लग्नानं जोडलेलं नातं. त्यात भरवसा असतो. विश्वास असतो.” "नेत्रा, भरवसा आणि विश्वास कुठल्याही नात्यात असू शकतो. निखिल आणि तुझ्यामध्ये या गोष्टी नाहीत का? त्यासाठी नात्याला लग्नाचं लेबल कशाला लावायला हवं? नातं टिकवण्यासाठी प्रेम हवं. समजूतदारपणा हवा. एकमेकांना समजून घेण्यासाठीची परिपक्वता हवी. दोघांमध्ये अनुरूपता हवी. तर आणि तरच नातं टिकेल.”

"अगं पण लग्न केलं की स्थिरता येत नाही का? सामाजिक जाणिवेपोटी का होईना पण चुकीचं पाऊल उचललं जाणार नाही याची खात्री वाटत नाही का?" मार्था हसली, "तसं असतं तर मग घटस्फोट झालेच नसते नेत्रा, नाही का?" नेत्रा गप्प झाली. आपली लग्नासाठीची हुरहूर हिला कशी पटवून द्यावी तिला कळेना. मार्थानं तिचं मन वाचलं. "अगं मी इंडियन वेडिंग पाहिलं आहे. कुणाही मुलीला आवडावं असंच असतं ते! आमचं लग्नही एखाद्या परीकथेसारखंच झालं होतं. लग्नातला पांढराशुभ्र वधुवेष घालून मी आले तेव्हा जॉन माझी वाट बघत उभा होता. जगातली सगळ्यात सुंदर मुलगी त्याच्यासमोर उभी आहे, असं त्याच्या डोळ्यात लिहिलं होतं तेव्हा! पण लग्नानंतर ही भावना हळूहळू कुठे हरवत गेली न कळे! कदाचित तसेच

राहिलो असतो आम्ही लिव्ह इनमध्ये तर ती टिकून राहिली असती का, असं वाटत राहतं आता. केवळ बंधनात बांधलो गेलोय आता म्हणून नाईलाजानं का होईना नातं टिकवून ठेवायचं यात काही अर्थ आहे का सांग बरं!"
"पण मग लग्न करूच नये का?" नेत्रा हिरमुसली होऊन म्हणाली. "हे सगळं टिकणारच नाही असं गृहीत धरूनच चालायचं का?" "ते ज्याचं त्यानं ठरवायचं नेत्रा. हा निर्णय तू आणि निखिलनं मिळून घ्यायला हवा. मला मात्र लग्नाचा निर्णय घेऊन चूक केली असंच वाटतंय," मार्था म्हणाली. नेत्रा तिच्याकडे बघत राहिली. समजा आपण हट्टच धरला आणि निखिलनं आपल्यापुढे नमतं घेऊन लग्न केलंच तर आपण आपलंच खरं केलं असं होईल का? आणि त्यातून काही वर्षांनी आपल्या लग्नाचीही अवस्था मार्थासारखी झाली तर मग जबाबदारी कुणाची? लग्न करून ते निभावता येईल ना, आत्ता असलेली निखळ प्रेमाची भावना आपल्या दोघांच्याही मनात तशीच राहील ना, ही सारी जोखीम पत्करायची की 'जे चाललंय ते बरं चाललंय की' ही निखिलची भूमिका मान्य करायची? नेत्राच्या मनाचा गोंधळ उडायला लागला!

"नाही रे, मुळीच नाही!" ऑफीसच्या कॅन्टीनमध्ये शरद निखिलला समजावत होता, "भारतातल्या जुन्या पिढीतली लग्नं बघ बरं. मी ऐकलंय की त्यातल्या कित्येकजणांनी एकमेकांना लग्नाआधी पाहिलंदेखील नव्हतं. तरीही लग्नं झाली आणि टिकलीही! एकमेकांखेरीज त्यांनी कधी कोणाचा विचारही केला नसेल."
शरदही त्याच्यासारखाच भारतातून इथे नोकरीसाठी आलेला. वेळीच लग्न करून स्थिरस्थावर झालेला. नेत्राचा लग्नाचा हट्ट पुरवायचा विचार करण्याआधी त्याच्यासारख्या अनुभवी मित्राचा सल्ला विचारणं निखिलला भाग होतं.

"किंवा कदाचित मनात आलेला दुसऱ्या कुणाचा विचार त्यांना सोडून द्यावा लागला असेल. जर लग्नाआधी आला असेल तर घरच्यांच्या भीतीने आणि लग्नानंतर आला असेल तर समाजाच्या दडपणाखाली. ही भीती, हे दडपण कशासाठी? नातं कसं हवं, मोकळेपणानं श्वास घेऊ देणारं, गुदमरवणारं नाही! बंधनांच्या, पायबंदांच्या ओझ्याखाली चिरडून टाकणारं नव्हे," निखिल तक्रारीच्या सुरात म्हणाला.
"नातं तसं नसावंच! पण त्याचबरोबर ते एकमेकांना वाढायला, फुलायला मदत करणारं हवं. चूक झालीच तर समजावून, बोट धरून पुन्हा योग्य मार्गावर आणून सोडणारं हवं. वेळ पडलीच तर पाठीशी उभं राहणारं, सोबत नसतानाही एकटं वाटू न देणारं हवं. तरच ते कुठल्याही कसोटीवर खरं ठरेल, बरोबर ना? मग लग्न तसं नातं निर्माण करतं!" शरद म्हणाला तसा निखिल विचार करायला लागला.

"लग्नात जे विधी असतात, सप्तपदी असते, त्यातल्या प्रत्येक पावलाला काहीतरी अर्थ असतो निखिल. हिंदू धर्मानुसार पतीने धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष असे चार पुरुषार्थ सिद्ध करायचे असतात. पैकी मोक्ष हा पुरुषार्थ एकट्यानेच मिळवायचा असतो. 'धर्म' म्हणजे नीतिमत्तेचे आचरण करणे, 'अर्थ' म्हणजे कुटुंबाच्या गरजांसाठी पैसे मिळवणे आणि 'काम' म्हणजे लैंगिक सुख, हे बाकीचे तीन पुरुषार्थ पतीने त्याच्या

पत्नीबरोबर आचरणात आणायचे असतात. आपल्या विवाहविधींनुसार पतीने पत्नीला वचन द्यायचं असतं की हे पुरुषार्थ सिद्ध करत असताना मी मर्यादा सोडणार नाही आणि माझ्याकडून अतिचार होणार नाही आणि हे लग्नगाठीनंच सिद्ध होऊ शकतं.”
“स्वातीची आणि माझी भांडणं काय कमी होतात? होतातच की भरपूर! पण सरतेशेवटी आम्ही असतोच एकमेकांसाठी. हे बघ, प्रेम असेल तर ते कुठलंही नातं घट्ट बांधून ठेवेल आणि नसेल तर कुठलंच नातं टिकून राहणं शक्य नाही. लग्नही नाही आणि लिव्ह इनही नाही!" शरद म्हणाला होता.

निखिलला आता हे पटू लागलं होतं. नेत्रालाही नात्यातली ही असुरक्षितता जाणवत असेल का? म्हणलं तर मित्र, म्हणलं तर नवरा-बायको आणि म्हणलं तर एकमेकांचे कुणीच नाही, अशी अधांतरी अवस्था तिला नकोशी झाली असेल तर त्यात काही शंका नाही. बाहेर फिरता फिरता सिगरेटच्या धुरासोबत निखिलचे विचारही वळसे घेत होते.  शेवटी बाईला स्थिरता हवी असतेच की! तिचं बाईपण जपण्यासाठी, घराचं घरपण टिकवण्यासाठी, कुटुंब निर्माण करण्यासाठी तिला जोडलेल्या नात्याचा आधार हवासा वाटला तर आपण तो द्यायलाच हवा. उद्या जर आपल्या मनात मूल होऊ देण्याचा विचार आला तर या बिननावाच्या नात्यामध्ये आपण त्या नव्या जीवाचं स्वागत करू शकू का? समजा आपण ठाम राहिलो आपल्या निर्णयावर तर ही सगळी भावनिक गुंतागुंत नेत्राला पेलवेल का? आपल्याला वाटत असो अगर नसो, नेत्राची इच्छा म्हणून का होईना लग्न करायलाच हवं! त्यानं हातातल्या घड्याळावर नजर फिरवली. संध्याकाळ झाली होती. तो घराच्या दिशेला वळला.

“नेत्रा, मला तुझं म्हणणं मान्य आहे! कधी करूया लग्न?” तिनं घरात पाऊल ठेवल्या ठेवल्या निखिल म्हणाला.
नेत्रा थबकली. तिनं हातातली बॅग खाली ठेवली. त्याच्याजवळ येऊन बसत ती म्हणाली, “निखिल, मला तुझं म्हणणं पटलंय! नातं टिकणं, ते दोघांनी मिळून टिकवणं महत्त्वाचं! त्यासाठी लग्न करायलाच हवं असा माझा आग्रह नाही!” दोघंही एकमेकांच्या डोळ्यांत पाहत राहिले. दुसऱ्याच्या सुखासाठी बदललेलं आपलं मन चाचपडून बघत राहिले.

निखिलला भरून आलं, “नेत्रा……….” “निखिल, आपल्यातलं हे प्रेम असंच टिकून राहायला हवंय मला! लग्नात घेतल्या जाणाऱ्या आणाभाका कितीजण लक्षात ठेवतात? त्या न घेताही तितकंच प्रेम करत राहशील तू माझ्यावर याची खात्री आहे मला. पण या बंधनाच्या ओझ्यानं आपलं नातं कमकुवत व्हायला नकोय मला,” नेत्रा म्हणाली.
“तू विश्वास ठेव माझ्यावर, लग्न करायचंच नाही, असा माझा हट्ट नाही. पण थोडी सवड दे मला. हे सगळं समजायला, पचवायला. लग्न करायचं ठरवलंच आपण तर त्याचा अर्थ समजून उमजून करूया. केवळ

नात्याला नाव देण्यासाठी म्हणून नव्हे.” निखिलनं तिचा हात हातात घेतला, “आपण लग्न करू किंवा कदाचित न करू पण मी तुला आज एक वचन देतो नेत्रा, 'धर्मे च अर्थे च कामे च नातिचरामि।“
संध्याकाळची सोनेरी किरणं आकाशभर पसरली होती. सतारीचे सूर पुन्हा एकदा जुळले होते.

*****************************************************************************

**उल्लेखनीय कथा- २**

**घर**

**लेखिका: प्रगती नाडकर्णी**

पहाटेच उठून प्रीतम तयार झाला. टॅक्सी असोसिएशनच्या ऑफिसमधून फोन आला. नायगरा शेरेटन हॉटेलमधून कुणालातरी पिक अप करायचं आहे. प्रवेशद्वारापाशी पोचला. आत मधून दोन माणसांनी तिला टॅक्सीपर्यंत आणून पोहोचवलं. स्वतःची, कपड्यांची सभोवतालची, कसलीच शुद्ध नव्हती तिला. हॉटेलच्या दोन कामगारांनी तिला त्याच्या टॅक्सीत जवळजवळ कोंबलंच. प्रीतमने तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला, “हॅलो हॅलो, यू ओके?” तिने फक्त मान झटकली. डोळे उघडण्याचा प्रयत्न करत त्याच्याकडे पाहिलं. हॉटेलच्या कामगाराने तिचा पत्ता दिला. प्रीतमने उतरून दार बंद केलं आणि काळजीपूर्वक ड्राइव्ह करत निघाला. पुन्हा पुन्हा आरशात लक्ष जात होतं. अजूनही तिचे डोळे उघडलेले नव्हते. मागच्या सीटवर तिने अंग टाकून दिलं होतं. कपड्यांची, केसांची शुद्ध नव्हती. मध्येच काहीतरी बडबडत होती. तो पत्त्यावरच्या बिल्डिंगसमोर येऊन थांबला. त्याला कळेना की ही उतरून जाऊ शकेल का. अजून उजाडतच होते. बाहेर कडाक्याची थंडी होती. तिच्या अंगावर जॅकेट सुद्धा नव्हतं.

“मॅडम....हॅलोऽ मॅडम? विच हाऊस? हाऊस नंबर प्लीज?” तो विचारत होता.

ती स्वतःशीच बडबडत होती. तो थोडा वेळ थांबला, मग पाण्याची बाटली तिच्यासमोर धरली. तिने डोळे उघडले. बाटली घेण्याचा प्रयत्न केला. हात थरथरत होते. उठण्याचा प्रयत्न करत होती आणि पुन्हा पुन्हा पडत होती. तिने वाजवीपेक्षा जास्त नशा केलेली होती. तिच्या भोवती दारूचा वास पसरला होता. त्याने थोडेसे बाटलीतले पाणी हातावर घेऊन तिच्या चेहऱ्यावर शिंपडले, तशी ती दचकली. कसेबसे डोळे उघडत म्हणाली, “थ्री वन सेव्हन”. ही एक जुनाट बिल्डिंग होती. त्याला काही उलगडत नव्हतं. ‘आता इथे या बाईला कुठल्या घरात सोडायचं?’ ही त्याच्या मनातली शंका! परत तिच्याकडे वळला.

“विच हाऊस हाऊस नंबर मॅडम?”

तिने डोळे किलकिले केले. बोबड्या स्वरात म्हणाली, “नंबर फोर”.

खाली उतरून त्याने पाठीमागचे दार उघडले आणि आपला हात तिच्यासमोर केला.

“युवर हाऊस मॅडम! हॅलोऽऽ मॅडम”.

उठण्याचा कसाबसा प्रयत्न करत धाडकन पुन्हा एकदा ती सीटवर कोसळली. त्याने तिचा हात पकडला. दुसऱ्या बाजूने काखेखाली उजवा हात अडकवून तिला उभे राहण्यासाठी मदत केली. ती लडखडत होती. समोरच्या तीन पायऱ्या चढून, गेट उघडून, तिला आधार देत कसाबसा तो तिला बिल्डिंगमध्ये घेऊन गेला. खालच्या भागातल्या फ्लॅटपैकी नंबर चारजवळ तिला नेलं. दारावर टकटक केलं. काहीही आवाज नाही, चाहूल नाही. परत दारावर टकटक केलं आणि चिमुकल्या आवाजात आतून शब्द आले, “कमिंग.. वेट..” प्रीतमला काही उलगडाच होत नव्हता. वाटले, कदाचित ऐकण्यामध्ये काहीतरी चूक झाली; आतमध्ये कोणी खूप वयस्कर व्यक्ती असेल. आतून दाराच्या उघडण्याचा आवाज आला. घरात अंधारच होता. तो तिला आत मध्ये घेऊन गेला आणि मागून शब्द आले,… “देअर, बेड इज देअर”. त्याने खाली बघितले. चार एक वर्षाचा छोटा मुलगा आपल्या मोठ्या मोठ्या डोळ्यांनी त्याच्याकडे बघत होता. डोळ्यात भीती होती. चिमुकली पावलं आतल्या खोलीकडे पळत पळत निघाली. “मम्मा.. हिअर..!” म्हणत उडी मारून दिवा लावला. प्रीतमने तिला त्या बेडवर नेऊन बसवले. तोपर्यंत ती लुढकली सुद्धा. त्याने मागे वळून त्या बाळाला विचारले, “एनीबडी विथ यू?”

“नो बडी!” तो म्हणाली. प्रीतमच्या अंगावर सरसरून काटा आला. हा छोटासा जीव रात्रभर या घरात एकटा? तो खाली वाकला. त्याचा हात हातात घेतला, “मी टॅक्सी ड्राइव्हर, प्रीतम”. त्याने प्रीतमकडे पहिले. त्याच्या चमकदार डोळ्यात एक वेदना दडलेली. सामान म्हणायला त्या घरात काही नव्हतंच. एक-दोन खेळणी, एक दोन फाटकी पुस्तके. इथे तिथे पडलेले कपडे. त्यांची दुर्दशा बघत नव्हती. एकच बेड होते. अगदी छोटेसे स्टुडिओ अपार्टमेंट. प्रीतमला भाडे मिळण्याची काही अपेक्षा नव्हती. जिच्याकडून भाडे घ्यायचे तिलाच स्वतःची शुद्ध नव्हती. स्वयंपाकखोलीत काहीही अन्न शिजवल्याची कोणतीही खूण नव्हती. तो त्या छोटू कडे वळून म्हणाला, “लॉक डोअर. आय एम कमिंग बॅक” आणि तो बाहेर गेला. आता हळूहळू थोडं उजाडायला लागलं होतं त्याने भरकन टॅक्सी सुरू केली. गल्लीच्या दुसऱ्या टोकाशी कॉफी शॉप होते. एक कॉफी, मिल्कशेक आणि ब्रेकफास्ट सँडविच एवढं घेऊन परत निघाला. तिच्या घराशी येऊन दारावर टकटक केलं. “हॅलो..ओपन…” दाराजवळ चिमुकली पावलं वाजली, “कोण?”

“आय एम….द टॅक्सी ड्रायव्हर”.

“तुला काय हवंय? मम्मा जागी नाहीय अजून.” मुलगा साशंक स्वरात म्हणाला.

“फूड फॉर यू! तुझ्यासाठी खायला आणलेय,” तो म्हणाला.

छोटूने दार उघडलं. प्रीतमच्या हातातल्या वस्तू पाहून ते तपकिरी डोळे चमकले. तरी तो तसाच उभा राहिला. प्रीतमने मिल्क शेक त्याच्या हातात दिला. सँडविच समोर ठेवलं.

“संपव हं.. आणि दार कुणालाही उघडू नकोस”, असे म्हणत लगबगीने डोळ्यातलं पाणी लपवत प्रीतम टॅक्सी मध्ये येऊन बसला. लहानपणी विधवा आई त्याला घरात ठेवून कामाला जायची ते

दिवस आठवले. शाळा संपून घरी आल्यावर आई नसे. खेळून सगळे परत गेले की आईची वाट पाहात ओट्यावर बसून राहायचं. तो एकाकीपणा पुन्हा अस्वस्थ करून गेला. मन सुन्न झालं.

आईच्या निधनानं खचलेला प्रीतम दोन वर्षां पूर्वी ब्रॅम्प्टन, ऑण्टेरियोला स्थायिक होण्यासाठी आपल्या चाचाजींकडे आला होता. एक दिवस नायगरा फॉल्सला आतेभावाकडे भेटायला म्हणून आला. त्याला ही जागा खूप आवडली. निसर्गरम्य, शांत. नायगराचा धबधबा बघून तर तो हरखून गेला. प्रीतमने विचार बदलला आणि चाचाजींचा निरोप घेऊन स्वतःच्या पायावर उभा राहण्यासाठी तो नायगरा फॉल्सला आला. आतेभावाने टॅक्सी असोसिएशन मधे त्याला रजिस्टर केले आणि प्रीतमचे काम सुरू झाले. प्रेक्षणीय स्थळ असल्यामुळे कामाला तोटा नव्हता. बालपणीची सखी सिमरन आता त्याची भावी वधू होती. त्यांच्या नात्याला घरातल्या मोठ्यांनी रोक्का (साखरपुडा) करून शिक्कामोर्तब केले होते. तिला लवकर इकडे आणायचेय या गोड विचाराने काम करायला अजून जोम येत होता.

२ -३ दिवसांनी प्रीतमला पुन्हा त्याच पत्त्यावर पिक-अपसाठी फोन आला. बाहेरच्या पायऱ्यांवर चुरगळलेला शर्ट आणि एक ढगळी पॅन्ट घालून, बॅकपॅक घेऊन बसलेला छोटू दिसला. पिवळ्या रंगाचा फुलाफुलांचा ब्लाऊज आणि जेमतेम गुडघ्यापर्यंत पोहोचणारा लाल रंगाचा तंग स्कर्ट घालून फोनवर बोलत ती उभी होती. सुंदर, शेलाटी! बदामी चेहऱ्याभोवती सोनेरी-तपकिरी कुरळे केस, तपकिरी चमकदार डोळे, छोटसं नाक, लिपस्टिकने रंगलेली लाल चुटूक जिवणी. फारच आकर्षक रुपडे होते. बिल्डिंगच्या दाराला टेकून उभी असलेली ती लगबगीने खाली आली आणि म्हणाली, "अल्विनला शाळेत सोडायचेय. त्याची बस चुकली. त्याला शाळेत सोडून पुढे मला लेकस्ट्रीटला जायचे आहे." असे म्हणत बसली सुद्धा आत. त्याने टॅक्सीचे मीटर टाकले.

अल्विन बोलत होता, "मॉम, मी ब्रेड स्लाइस घेतलाय लंचला. तू लवकर ये हं". ती फोनवर बोलण्यात गर्क होती. अल्विन पुन्हा पुन्हा आपल्या आईकडे बघत होता. शाळेपाशी आल्यावर अल्विन उतरला. जाताना वळून वळून मम्माकडे बघत होता. ती फोनवरच मग्न होती. कुणाकडून तरी पैसे घेण्यासाठी बोलल्याचे कळत होते. एका आलिशान बंगल्यासमोर ती उतरली आणि प्रीतमला म्हणाली, " तुझा नंबर दे म्हणजे मला लागेल तेव्हा तुलाच सरळ फोन करीन." प्रीतमने कार्ड पुढे केलं. ती "बाय" म्हणून आत निघून गेली. प्रीतम विचार करत होता, "हिला काहीच आठवत नाही?"

दोन-तीन दिवसांनी पुन्हा फोन. आज पण अल्विन उदास चेहऱ्याने दारात बसलेला. ती कशीबशी उभी राहत दारापर्यंत आली. अवतार अगदी पहिल्यांदा भेटली तसाच होता. कशीबशी स्वतःला सांभाळत म्हणाली, "टॅम, याला शाळेत सोऽड..आ.." बोलता बोलताच कोसळली. प्रीतमने खाली उतरून तिला आत नेले. घरभर वस्तूंचा पसारा पडला होता. कसला तरी उग्र वास पसरला होता. त्याने तिला बेडवर झोपवले. पुढे होऊन अल्विनचे केस सारखे केले, त्याची पॅन्ट वर सरकवली आणि विचारले, "तुझ्याकडे खायला आहे?" अल्विनने मान खाली घातली. प्रीतमने त्याला टॅक्सीत

बसवले. आपल्याजवळच्या टिशूने त्याचा चेहरा पुसला. कोपऱ्यावरच्या कॅफेतून एक मफिन घेऊन दिला.

आता वरचेवर हे फोन येऊ लागले. बरेचदा मम्माच्या फोनने अल्विनने हे फोन केलेले असत. प्रीतम आतमध्ये जाई, त्याला तयार करे. कधी त्याला आंघोळ घालून तर कधी त्याची बॅग स्वच्छ करून आणि बरेचदा त्याला काहीतरी खायला घेऊन देऊन शाळेत सोडून देई. अल्विनशी हळूहळू एक नाते जुळू लागले.

तीन एक आठवड्यात तो अल्विनला भेटलाच नव्हता. त्या दिवशी एका पिक-अपसाठी त्या भागात गेला. अल्विनची आठवण तीव्र झाली. त्याने बिल्डिंगच्या समोर टॅक्सी पार्क केली, आत जाऊन दार वाजवले. तिने दार उघडले. “मॅम, इथे आलो होतो तर अल्विनला भेटून जावेसे वाटले”. तिचे केस विस्कटलेले होते. डोळ्याखालची काळी वर्तुळे आणखी मोठी झाली होती. खूप खंगलेली दिसत होती. चेहरा ओढलेला होता. त्याने आत डोकावत विचारले, “अल्विन कुठे आहे?” ती रडू लागली.

‘तो गेला’.

प्रीतम जोरात ओरडला, “कुठे गेला? तो इथे नाहीये? हरवलाय का? तक्रार केली पोलिसात?

“ते त्याला घेऊन गेले’

“कोण घेऊन गेले?

“ ते.. ते” आणि ती हमसून हमसून रडू लागली. प्रीतम अस्वस्थपणे तिच्या समोरच्या स्टुलावर बसला. “कोण घेऊन गेलेय अल्विनला? मी आणू शकतो का त्याला परत? चला.. जाऊया आपण त्याला आणायला”.

तिने एक दीर्घ श्वास घेतला. प्रीतमने उठून पाण्याचा पेला तिच्यासमोर धरला. एक घोट घेऊन ती म्हणाली, “जायला तर हवेच”. प्रीतमने पुन्हा विचारले, “कोणी नेला आहे त्याला?”

ती म्हणाली, “बालसुरक्षा केंद्राच्या लोकांनी. चिल्ड्रन्स एड सोसायटी. त्या दिवशी रात्री मी आले. मला शुद्ध नव्हती. मला कळलंच नाही मी कधी जागी झाले, किती तासांनी जागी झाले. शाळेची बस त्याला सोडून गेली. तो बाहेर दाराची बेल वाजवत होता. मी शुद्धीत नव्हते. त्याने बराच वेळ दार ठोठावलं. मला ऐकू आलं नाही. थकून माझा बाळ दारातच लॉबीमध्ये झोपला. बिल्डिंग मधल्या लोकांनी ते पाहिलं आणि सकाळी त्यांनी फोन करून त्या लोकांना बोलावलं. ते त्याला घेऊन गेले." ती परत रडू लागली. "आज संध्याकाळी मी जाणार आहे तिथे. मी सगळी कागदपत्रं जमा केलीत." प्रीतम उभा राहिला. दाराकडे गेला आणि तिच्याकडे वळून म्हणाला, “एक विचारू?” तिने त्याच्याकडे पाहिलं.

“इतका गोड बाळ आहे तुझ्याजवळ. कशाला इतकी दारू पितेस? एवढी नशा करतेस? त्याला आईची गरज आहे. खूप गुणी मुलगा आहे अल्विन”.

“माझा अल्विन खरंच खूप समजूतदार आहे. चुकीच्या आईच्या पोटी जन्माला आला बिचारा”. त्याला खरं तर तिचा खूप राग येत होता.
“तू असंच वागशील तर त्याला काय आयुष्य देणार तू?”
ती म्हणाली, “काय करू? मला हे थांबवायचे आहे पण कळतच नाही कुठे आणि कसं थांबवू”.
“म्हणजे?” तो न समजून म्हणाला.
“एका फाटक्या कुटुंबात मी जन्माला आले. माझा डॅडी मॉमला खूप मारायचा. मग ती दारू प्यायची. एक दिवस अतिसेवनाने ती गेली. डॅडीला फक्त पैसे हवे असायचे. तो मला लोकांकडे घेऊन जायला लागला. ते घाणेरड्या पद्धतीने मला हात लावायचे मग तो मला ज्यूस द्यायचा. मी विसरायची. हळूहळू कळलं तो नशेचे पदार्थ त्यात घालत होता. ते लोक माझा उपभोग घ्यायचे. त्यातूनच प्रेग्नन्ट राहिले. कुणापासून ते आजतागायत माहिती नाही. अल्विनचा जन्म झाला. तोपर्यंत माझ्या शरीरात नशेचे पदार्थ घर करू लागले होते. आता मी नशेविना राहूच शकत नव्हते. हॉस्पिटलमधून निघताना मी सांगितलं की मला या नशेच्या गुलामीतून बाहेर यायचेय. माझे बाळ मोठे करायचे आहे. त्यांनी अल्विनला एका फॉस्टर फॅमिलीमध्ये आणि मला व्यसनमुक्ती केंद्रामध्ये ठेवले. मी पुष्कळ बरी झाले. अल्विनला घेऊन घरी आले. खाण्यापिण्याचे हाल होते. पैसे नव्हते मग मी मिळेल त्या मार्गाने पैसे कमवू लागले. हळूहळू शरीराच्या वेदना वाढू लागल्या. वेदना झाल्या की दारू प्यायची, ड्रग्ज घ्यायचे. या भीषण चक्रातून मागे येणे अशक्य होऊ लागले. त्या दिवशी मला शुद्धच राहिली नाही आणि ते माझ्या अल्विनला घेऊन गेले. मला दार उघडून बाहेर काढले. हॉस्पिटलमध्ये नेले. झालेल्या प्रकाराचे भान आल्यावर मी विनवण्या करत राहिले. तिथे कळलं कॅन्सर झालाय”. ती एकदम वेड्यासारखी बोलत सुटली. “मला ना अल्विनला मोठा करायचे आहे. मला त्याची चांगली आई होऊन दाखवायचे आहे पण...आता वेळच नाही रे हातात!” आणि त्याच हातात तोंड खूपसून रडू लागली. प्रीतमचे शब्द घशात गोठले गेले होते. त्याला अल्विनचे चमकदार डोळे आणि केविलवाणा चेहरा, गोड बोलणे सगळं काही आठवून भरून येत होते. तो तिला म्हणाला,
“काय केलं म्हणजे अल्विन परत मिळेल?”
“मी.. मी ...डॉक्टरांकडून कागदपत्रं आणलीत. त्या बाल सुरक्षा केंद्राच्या लोकाना सांगितलेय की मी आहे तोपर्यंत माझा बाळ माझ्याकडे द्या. माझ्या शेवटच्या दिवसांमध्ये माझ्या बाळावर मला मनसोक्त माया करू देत. त्याचे लाड करू देत. ते आणणार आहेत अल्विनला. प्रीतम म्हणाला,
“तुला डॉक्टरांनी काय सांगितलंय? म्हणजे..”
“शेवटच्या पायरीचा ब्लॅडर कॅन्सर आहे”.
“ओह नो!” पुढे बोलताना त्याची जीभ रेटेना. “म्हणजे किती.. किती वेळ आहे तुझ्याकडे?”

ती कसंतरी हसली, म्हणाली, “म्हटलं तर सहा महिने, म्हटलं तर सहा आठवडे, आणि म्हटलं तर सहा दिवस सुद्धा. कधीही संपू शकते मी. माझ्या शरीरात रक्त नाही, नशेची रसायने वाहत आहेत. मी काही देऊ शकले नाही त्या गुणी बाळाला.” बोलताना तिचा बांध फुटला.

प्रीतम म्हणाला, “कुठे जायचंय त्याला आणायला ते मला सांग. मी नेतो”. ती काहीच बोलली नाही. प्रीतम बाहेर पडला. डोकं जड झालं होतं, काही सुचत नव्हतं. बाहेर जाऊन त्याने कॉफी आणि ब्रेड घेऊन तिला नेऊन दिला. आज त्याला कुठेच जावेसे वाटत नव्हते. घरी जाऊन नानकजींच्या फोटो समोर बसला. ‘बाबाजी, मला शक्ती द्या”. रात्रभर झोप लागली नाही. दोन दिवस कामात गडबडीत केले. फोन आला होता, सिमरन येत होती. लग्नाची तयारी करायची होती. तो ब्रॅम्प्टनला चाचाजींकडे आला. नव्या तयारीत गुंतून गेला. सिमरन आली. त्याच्या दुसऱ्या चाचाकडे तिला उतरवले होते. तो अगतिकतेने सिमरनला भेटायला गेला. इतक्या दिवसांच्या गुजगोष्टीत प्रेम खुलून आले. सिमरनला काहीतरी खटकत होतं. ती म्हणाली “प्रीतम, तू मध्येच बोलता बोलता हरवून जातो आहेस. काहीतरी नक्की ठीक नाहीये. काय लपवतोयस?” त्याला प्रश्न पडला होता, सिमरनला हे सांगावं का? तिचा गैरसमज तर होणार नाही? शेवटी त्याने तिच्याजवळ मन मोकळं करायचं ठरवलं. तिला अल्विन आणि त्याची आई, मेगन बद्दल सांगितलं. सिमरन ते ऐकून स्तिमित झाली होती.

दोन दिवसांनी गुरुद्वारामध्ये सिमरन आणि प्रीतमचे लग्न झाले. चार-पाच दिवसांसाठी प्रीतम-सिमरन क्वेबेकला फिरून आले आणि सिमरनला घेऊन तो नायगाराला आपल्या घरी आला. सिमरन तिच्या छोट्याशा संसाराकडे बघून खुश झाली. नव्या नव्हाळीने घर लावण्यात गुंतली. प्रीतम कामावर रुजू झाला.

दोन दिवसांनी अल्विनचा फोन आला. “टॅम, मम्माला खूप बरे नाही. बोलता येत नाही. तू ये ना!” तो घरी पोहोचला तेव्हा अल्विन पायऱ्यांवर बसला होता. प्रीतमला पाहून त्याला हुंदका आला. आत गेल्यावर तिची अवस्था पाहून प्रीतमचे पाय जागीच थिजले. तो अस्थिपंजर झालेला देह, डोळ्याखालची काळी वर्तुळे भलीमोठी झालेली. डोळे खोबणीत गेलेले. केस जेमतेम राहिलेले. हाता पायांच्या काड्या झालेल्या. “मेगन .. मॅम” त्याने हाक मारली. डोळे किलकिले करत कष्टाने तिने वर पाहिले. क्षणात त्याने निर्णय घेतला. तिला उचलले आणि टॅक्सीच्या मागच्या सीटवर झोपवले. अल्विनला तिच्या शेजारी बेल्टखाली सरकवले आणि वेगाने निघाला. इमर्जन्सीमधे तिला लगेचच आत घेतलं. त्याने तिची माहिती पुरवली. त्यांनी तिला ॲडमिट करून घेतले. प्रश्न होता, अल्विनला एकटं कसं ठेवायचं? त्याने सिमरनला फोन केला. ती म्हणाली, त्याला घरी घेऊन ये. तो अल्विनला घेऊन त्यांच्या अपार्टमेंटमध्ये आला. सिमरनने अल्विनला खाऊ घातले, त्याच्याशी खेळली. अल्विनला हे प्रेम नवीन होतं. तो लगेच रमला. संध्याकाळी प्रीतम हॉस्पिटलमध्ये गेला. तिची शुद्ध हरपली होती. हॉस्पिटलमध्ये तिच्यावर तातडीने उपचार सुरू होते.

तो सकाळ-संध्याकाळ तिथे जात होता. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी ती शुद्धीवर आली. खूप कष्टाने म्हणाली, “अल्विन?” त्याने सांगितलं, “तो माझ्या घरी ठीक आहे.” तिने त्याला खुणेने पुढे बोलावलं. खोल आवाजात म्हणाली, “आता वेळ फार थोडा आहे”.

तो म्हणाला,”चिंता करू नकोस सगळे ठीक होईल”. ती खिन्नपणे हसली. प्रीतम दुसऱ्या दिवशी पुन्हा गेला तेव्हा सिमरन आणि अल्विन त्याच्या बरोबर होते. तिने अल्विनला हृदयाशी घट्ट धरले. डोळ्यातल्या पाण्याला खळ नव्हता. सिमरन तिच्या शेजारी बसून तिचा हात हातात घेऊन म्हणाली, “तू काळजी करू नकोस”. मेगनने सिमरनकडे बघितलं. क्षणात डोळे विश्वासाने चमकले. त्याच नजरेने तिने प्रीतमकडे पाहिलं.

दुसऱ्या दिवशी तो भेटायला गेला तेव्हा ती म्हणाली, “टॅम, माझ्यावर एक उपकार करशील?”

“काय करू सांग”.

“माझ्या अल्विनला कायम सांभाळशील?” तो विस्मयतेने तिच्याकडे बघतच राहिला.

ती म्हणाली, “सांग ना!”

अभावितपणे प्रीतमच्या तोंडून शब्द निघाले, “हो”.

ती हसली. म्हणाली, “दत्तक विधानाचे पेपर मागवलेत. त्याच्यावर फक्त सही कर. एकच विनंती आहे, त्याचे नांव बदलू नकोस. ‘अल्विन’ हे माझं खूप आवडतं नांव आहे. मी माझ्या बाळाला दिलेली तेवढी एकच आठवण त्याच्याबरोबर कायम राहू दे आणि त्याला एवढेच सांग, मम्मा त्याच्यावर खूप प्रेम करत होती”. प्रीतमला अश्रू अनावर झाले. तो तिथून उठून घरी आला. काय बोलावे, कसे बोलावे, कळत नव्हते. सिमरनचा हात धरून नानकजींच्या फोटो समोर जाऊन उभा राहिला. अल्विन टीव्ही पाहण्यात मग्न होता. प्रीतमने सुरुवात केली, “मेगन शेवटचे श्वास मोजते आहे. आपण अल्विनला सांभाळूया? सिमरन, तू तयार होशील तरच! तू नाही म्हटलीस तर मी तिला नाही म्हणून सांगेन.”सिमरन डोळे फाडून त्याच्याकडे बघत होती. दोघेही स्तब्ध उभे होते. तेवढ्यात अल्विनने तिला हाक मारली. सिमरन  तिकडे गेली आणि संभ्रमित अवस्थेत प्रीतम बसून राहिला. दुसऱ्या दिवशी सकाळी बघतो तर काय! अल्विनला घेऊन सिमरन तयार होती.

तो म्हणाला, “तू कुठे जाणार आहे का?”

“हो, आपण जाणार आहोत. अल्विनला शाळेत सोडून गुरुद्वारामध्ये जाऊ’.

“का गं?”

“मला येऊन एक महिना झाला. पग फेऱ्याला म्हणजे पहिल्या माहेरपणाला इथे कुठे जाणार? म्हणून गुरुद्वारात जावे म्हंटले. तिथे मेगनसाठी प्रार्थना पण करायची आहे. पग फेऱ्याची भेट तरी मिळणार आहे का मला?”

तो म्हणाला, “त्याचा आता काय संबंध?”

“आहे ना!”

“काय हवेय ते सांग’, तो त्रस्त होऊन म्हणाला.
ती म्हणाली, “अल्विन!”.
प्रीतमचे डोळे विस्फारले. सिमरन त्याच्याकडे पाहून खट्याळ हसत होती.
प्रीतम सिमरनला घेऊन हॉस्पिटलमध्ये आला. तिने मेगनला विचारले, ‘कसे वाटतेय आता?”
मेगन कसनुसे हसली. सिमरनचा हात हातात घेऊन काहीच न बोलत शून्य नजरेने पाहात राहिली.
सिमरन म्हणाली, “कागदपत्र कुठे आहेत?” मेगनचे डोळे चमकले.
“तू ..तू.. थांब!”, म्हणत आपल्या उशी खाली ठेवलेले मोठे पाकीट ओढून काढले आणि सिमरनच्या हातात दिले. सिमरन प्रीतमला म्हणाली, “चल आपल्याला वकिलाकडे जायचंय. माझी नवीन घरातली पहिली भेट मला देणार आहेस ना?” प्रीतम भरल्या डोळ्यांनी बघत होता. त्याला हसावं की रडावं हेच कळत नव्हतं. त्याने वेगाने सिमरनला घट्ट मिठीत घेतले. डोळ्यातून आनंदाश्रू वाहत होते. जणू काही अल्विनबरोबर त्यालाच नवीन घर मिळालं होतं!

*****************************************************************************

**उल्लेखनीय कथा- ३**
**बीज अंकुरे अंकुरे**
**लेखिका: चित्रा मेहेंदळे**

ममतानं ऑफिसातून आल्यावर मस्तपैकी आलं घालून चहा केला आणि कप घेऊन ती गॅलरीत बसली. कितीतरी दिवसांनी ती अशी निवांत, एकटी बसली होती. खरं तर घरात ईन-मिन-तीन माणसं - ती, तिचा नवरा मंगेश आणि सासूबाई, वसुधा ताई ! ती ऑफिसातून घरी आली की सासूबाईंबरोबर गप्पा मारत तिचा चहा होई. रोज तिला आयताच सासूबाईंच्या हातचा चहा मिळायचा. ती स्वत:ला भाग्यवान समजायची त्यामुळे.
पण कालच वसुधाताई ट्रिपला गेल्या होत्या त्यांच्या मैत्रिणींबरोबर. आता चार दिवसांनी येतील; म्हणून ममता अशी एकटी चहा घेत बसली होती. तिला वाटलं आज आपण अस्वस्थ आहोत का? एकट्या आहोत म्हणून का?

वसुधाताई अतिशय प्रेमळ होत्या. ममताचे आणि त्यांचे छान जमायचे. मैत्रिणीसारख्या त्या गप्पा मारायच्या, कामं वाटून घ्यायच्या. ममताला कधीच सासुरवास झाला नाही. सासूबाईंचा तिला खूपच आधार होता. निलेश आणि आभा दोघेही शिक्षणासाठी अमेरिकेत गेले आणि तिथलेच झाले. तेव्हा ममता काही दिवस खूप सैरभैर झाली होती. सासूबाईंनीच तिला सावरलं होतं. ममता खूप वेळ एकटीच मागच्या आठवणीत रमली. काळोख झाला तेव्हा ती उठली.

आज मंगेशही उशिरा येणार होता. स्वयंपाकाची काही घाई नव्हती. "काय करावं बरं?"....ममताला वेळ कसा घालवावा कळेना! ती आलेली पत्रं घेऊन बसली. मंगेशची कामाची पत्रं बाजूला ठेवत असतांनाच तिला एका पाकिटावर दोघांचे नांव दिसले. तिनं आश्चर्यानं ते हातात घेतलं. अक्षर ओळखीचं वाटलं... सासूबाईंचं पत्र ! काल ट्रिपला गेल्या आणि आज पत्र ! काय आहे हे? तिला कळेना... जायच्या आधी त्यांनी हे पत्र लिहून पोस्टात टाकले असेल; पण मग त्या बोलल्या का नाहीत ? न बोलता असं लेखी कळवण्यासारखं काय असेल? ममता खूपच अस्वस्थ झाली. पत्र उघडावं की मंगेश येईपर्यंत थांबावं? ...पण वर दोघांचे नांव आहे. तो आल्यावर उघडावं असा विचार करून ममताने ते बाजूला ठेवलं.

मंगेश यायच्या आत तिनं यांत्रिकपणे इतर कामं उरकली. तिच्या मनात त्या पत्राशिवाय दुसरा विचारच नव्हता. मंगेश आल्यावर तिनं जेवण होईपर्यंत त्या पत्राचा विषय काढला नाही. पण तिचा मूड नाहीये हे मंगेशने ओळखलं. एक दोनदा विचारलंही. पण ममतानं सांगितलं नाही. विषय बदलत वेळ मारून नेली.

जेवण झाल्यावर मात्र ममताला राहवलं नाही. तिने ते पत्र मंगेशला दिलं.

"काय असेल रे पत्रात? सासूबाईंनी असे पत्र का पाठवले असेल?"

"अगं, थांब ! उघडू तर दे. मलाही काहीच अंदाज येत नाहीये".

मंगेशने पण कापऱ्या हातानी पाकिट उघडलं आणि तो मोठ्यांदा वाचायला लागला.....

"चि. मंगेश आणि ममतास, अनेक आशीर्वाद.

एका घरात रहात असून मी पत्र का लिहीत आहे असे तुम्हाला वाटत असेल ना? पण विषयच असा आहे. मला वाटले मी समोरासमोर बोलायच्याआधी तुम्हाला थोडी कल्पना द्यावी. मी नसतांना तुम्हांला हे पत्र मिळेल. मी येईपर्यत तुम्ही विचार करून ठेवाल. नमनाला घडाभर तेल नको. मी मूळ मुद्दयावर येते. मी आल्यावर वृध्दाश्रमात रहायला जाणार आहे".

एवढं ऐकल्यावर ममता किंचाळलीच.

"काय? हे काय आहे मंगेश?"

पुढचे न वाचताच मंगेशही गप्प झाला. पांच मिनिटे दोघे शांत बसून राहिले. मग मंगेश पुढचे वाचायला लागला.

"धक्का बसला ना रे पोरांनो ! पण आधी माझे पूर्ण ऐकून तर घ्या. मी हा निर्णय पूर्ण विचारांती घेतला आहे. मी कोणावर रागावून किंवा निराशेने हा निर्णय घेतला नाहीये".

"तुम्हांला आठवतं ? दोन महिन्यांपूर्वी आपल्या शेजारच्या काळेकाकू ज्या वृध्दाश्रमात रहातात, तिथे आपल्या बिल्डिंगमधल्या चार-पांचजणी आम्ही गेलो होतो ? मी आल्यावर तुम्हाला सांगितलंही होतं की तो वृध्दाश्रम खूप चांगला आहे, नवीन असल्यामुळे स्वच्छ आहे, स्टाफ चांगला आहे, सुख सोई आहेत. आवारातच एक डॉक्टर राहतो. समोरच हॉस्पिटल आहे. तिथे रहाणारी

माणसेही चांगल्या घरातली आहेत. काळेकाकू तिथे खुश होत्या. मला तिथे एक पाटी दिसली- “व्यवस्थापनाकरिता महिला कर्मचारी हवी आहे. संपर्क करावा”. ती पाटी पाहून माझ्या मनात कुतूहल निर्माण झाले. म्हणून मी तिथे ऑफिसमध्ये भेटून त्यासंबंधी विचारूनही आले.येतांना माझ्या मनांत एका विचाराचे बीज रुजले. पूर्ण प्रवासभर मी त्याच बीजाचा, त्याच विचाराचा सारासार विचार करत होते. आल्यावर लगेच तुम्हाला बोलले नाही. पण आता निर्णय पक्का झाल्यावर मी तुम्हाला कळवते आहे. मी ही नोकरी करणार आहे.”

“मी हा निर्णय का घेतला? ते आता सांगते. तुम्हीही भावनेच्या आहारी न जाता प्रॅक्टीकली विचार करा. आपल्या निलेशला सहा महिन्यांनी बाळ होणार आहे, ही आनंदाची बातमी मला तिथे जायच्या आधीच तुम्ही सांगितली होती. आधी सुनेच्या आई जातील आणि मग ममताला जायला लागेल, हे उघडच आहे.”

मला आठवतंय, पांच वर्षांपूर्वी आभाच्या बाळंतपणाच्या वेळी आपण सगळेच तिथे गेलो होतो. त्याआधी पण आपण एक एक महिन्यासाठी असे जाऊन, अमेरिका हिंडून आलो होतो. मुलं किती बदलली हे आपण पाहिलं. इथे असतांना मुलांचा अभ्यास, क्लासेस ह्यात त्यांना मोकळा वेळच फारसा मिळायचा नाही. आणि घरात आपण चार मोठी माणसं, त्यांत वरकामाला बायका, त्यामुळे ह्या दोघांना अगदी इकडची काडी तिकडे कधी करायला लागली नव्हती. पण अमेरिकेत आल्यावर सगळीच कामं करायला त्यांना शिकायलाच लागले. आणि किती जबाबदारीने, व्यवस्थित दोघे सर्व करताहेत हे पाहून आपल्यालाही आनंद झाला. दोघे स्वयंपाक तर इतका छान करायला शिकले की आपल्याला आश्चर्य तर वाटलेच आणि सुखद धक्काच बसला होता. आभाला नवराही खूप छान मिळाला आहे. निलेश आणि आभा जवळच रहात असल्यामुळे आभा बाळंतपणाच्या वेळी हॉस्पिटलमधून सरळ बाळासह निलेशच्या घरी आली होती. निलेशचे लग्न नव्हते झाले तेव्हा !

हे सुध्दा होते तेव्हा आपल्याबरोबर. आपण चौघे होतो तरी आपली किती तारांबळ उडत होती सर्व करतांना ! तिथे आणखी मदतीला कोणीच नाही. सर्व कामं आपल्या आपणच करायची ना ! आपल्याला इथे सर्व बायकांची मदत घ्यायची सवय. आपल्यालाही कामं करतांना सुरवातीला जरा जडच गेलं होतं. मग झाली सवय! तू स्वयंपाकघर सांभाळलंस; मी थोडं बाळाचं, थोडी तुला वरकामाला मदत असं केलं. ह्यांनी आणि मंगेशनी चक्क डिशवॉशर लावणं आणि नंतर भांडी जागेवर ठेवणं, हे काम अंगावर घेतलं. आपण प्रथम त्यांनी हे केलं तेव्हा किती हसलो होतो ना ! घरी असतांना कधी चहाचा कप पण विसळण्याची वेळ आली नव्हती दोघांवर! पण आभाच्या मुलानं आजोबा आणि पणजोबांना भांडी लावायला शिकवलं. निलेशनं सर्व बाहेरची कामं पाहिली. तिथे ती कुठे आपल्याला करता येतात ना ? आभा आणि जावई-अमर पूर्ण वेळ बाळाबरोबर त्यामुळे घालवू शकले.

अमेरिकेत हे मात्र बरे आहे. बाळंतपणाची रजा आईबरोबर वडिलांनापण मिळते. ज्यांना इतर मदत नसते ते सुरवातीला दोघे मिळून बाळाला छान सांभाळतात. तसे त्यांना डॉक्टरांकडून शिकवलेही जाते. रजा संपली की पाळणाघरात सोडावेच लागते. हे आणि मंगेश तीन महिने राहून परत आले. आणि आपण पुढे तीन महिने राहिलो तिथे. काही दिवस आभाच्या घरी राहिलो. बाळ होतांना आपण तिथे असणं, मदतीला जाणं किती गरजेच आहे, ते मी पाहिलं आहे. आपण परत इथे आलो, आणि हे अचानक हार्टअटॅक येऊन आपल्याला सोडून गेले. मी त्या धक्क्यानं आजारी पडले. सहा महिने लागले मला बरे व्हायला. पण या पांच वर्षांत तुम्ही मला सोडून तिथे गेला नाहीत. निलेशचे लग्न झाले तीन वर्षांपूर्वी. तेव्हा मुलं इथे आली. पण आता तीन वर्षात ती तुम्हाला भेटली नाहीत. तुमची घालमेल मी समजू शकते. त्यांना भेटायला तुम्ही उत्सुक असणं हे साहजिकच आहे. ह्या आनंदाच्या प्रसंगी तुम्ही दोघांनी एकत्र तिथे असायलाच पाहिजे, तुम्ही दोघांनी तिथे जायलाच पाहिजे, असं मला वाटतं."

"माझ्या ज्या बारीकसारीक शारिरीक तक्रारी सुरू झाल्या आहेत, त्या पहाता मला तिथे येणे फारसे जमणार नाहीये. तुम्ही जरी बोललां नाहीत तरी मला कळतंय, इथे मला एकटीला टाकून तुम्ही दोघे एकत्र जाणार नाहीत. कारण माझ्याजवळ येऊन राहील, असं कोणीच नाही. एकट्या ममताला तिथे जायला लागेल. तिला एकटीला सर्व कठीण होईल,
हे मला दिसतं आहे."

"मग मला वाटलं की मी तुमची ही अडचण का सोडवू नये ? मी आता ७० वर्षांची आहे. हिंडतीफिरती आहे. मी रिटायर व्हायच्या आधी एका हॉस्पिटलमध्ये व्यवस्थापनाचे काम करत होते. मला चांगला अनुभव आहे. या वृध्दाश्रमात तसे कामही फार नसणार आहे. काळेकाकू सोबत असतील. मला चांगली सोबत मिळेल. तुम्हाला काळजी वाटणार नाही. अरे, आता वृध्दाश्रम ही काळाची गरज आहे. आम्ही नाही का जेव्हां गरज होती तेव्हां पाळणाघराचा आधार घेतला ? माझी हॉस्पिटलमधली नोकरी, घरी मदतीला मोठे कोणी नाही. मग मला मंगेशला जवळच्या पाळणाघरात सोडण्यावाचून दुसरा मार्ग नव्हता. तिथल्या मावशीही खूप छान होत्या. मंगेशची मला काळजी वाटायची नाही त्यामुळे. तोही इतर समवयीन मुलांच्यात रमायचा, आनंदानी जायचा. आताही मी पाहिले ना त्या वृध्दाश्रमात किती काळजी घेतली जाते, किती प्रेमाचे, उत्साहाचे वातावरण असते तिथे. वृध्दांनापण आपल्या वयाच्या मित्र-मैत्रिणींचा सहवास हवा असतो. तो वृध्दाश्रमात मिळाल्यामुळे सर्व आनंदी असतात. तिथे त्यांच्यासाठी खूप उपक्रम असतात, करमणुकीचे कार्यक्रम असतात. म्हणूनच तुम्हीपण नकारात्मक भावनेने वृध्दाश्रमाकडे पाहू नका. मग पटेल तुम्हांला माझा विचार ! तुम्ही त्रास देताय, तुम्हांला मला सांभाळता येत नाही, असे काहीच नाहीये. तुम्हांला यांत अपराधी वाटण्याचे कारणच नाही. मी खुषीने जाणार आहे तिथे.

वाटले मला काम झेपत नाही...तर राहीन मी तिथेच काही दिवस तुम्ही येईपर्यंत! तुम्ही आलात की येईन मी परत ! झेपलं, आवडलं काम, तर राहीनही तिथेच, जमेल तितके दिवस !
तिथे सेवा करण्याचं पुण्यही मिळेल मला. बघा पटतोय का तुम्हाला विचार? शांतपणे विचार करा. हा वानप्रस्थाश्रम आहे माझा. तुम्ही मला तिथे जायला मनापासून परवानगी द्याल ना?”

“माझा हा नवीन विचार पटतोय ना तुम्हांला? मी ट्रिपहून आले की आठ दिवसांनी मला रूजू व्हायचे आहे. तेव्हा तुम्ही माझ्याबरोबर या. सर्व पहा. तुम्हांलाही आवडेल ती जागा. त्यातूनही तुमचा अगदी विरोध असेल, तर तुम्हाला दुखवून, मला माझा हट्ट पुरा करायचा नाही. समाधानानी सर्व झाले तर त्यात मजा आहे. म्हणूनच मी आधी म्हटले भावनेनी विचार करू नका. रागावूही नका. सहा महिने तुम्ही शांत मनानी, माझी काळजी न करता अमेरिकेला जाऊन या. निलेशला तुमची गरज आहे, हे मी समजू शकते. मला वाटतं, मी येईन तेव्हा तुमचाही सकारात्मक निर्णय झाला असेल. तुमची आई”

पत्र वाचून मंगेश, ममता न बोलता विचार करत राहिले. आईचा हा विचार आपल्याला झेपेल? काळाबरोबर रहायची, नवीन वाट स्वीकारायची आईनी तयारी दाखवली. आपण तिला सहकार्य करून ती सोपी करायची की विरोध करायचा ? निर्णय कठीण होता, विचार करायला लावणारा होता, एवढे मात्र नक्की!

*****************************************************************************

**उल्लेखनीय कथा- ४**

**कृष्ण धवल**

**सागर साबडे**

नुकताच पाऊस पडून गेला होता. त्यामुळं हवेत थोडा गारवा होता. थोडं आळसावल्यागत झालं होत.

क्षमानं चहाचं आधण उकळायला ठेवलं आणि ती बाल्कनीतून खाली पाहू लागली. दोन मेक्सिकन कामगार झाडाची पानं कापत होते. काळ्या रंगाची हॅट घातलेला एकजण बाजूला उभा राहून त्यांना काहीतरी सूचना देत होता. तिनं आकाशाकडं पाहिलं.

ते अजूनही थोडं भरलेलं होतं.

क्षमा आत आली आणि सवयीनं जुना अल्बम काढला. तिचा जुना छंद.. जुने फोटो पाहायला, त्या आठवणीत रमायला तिला फार आवडायचं. जुन्या आठवणीत रमायला जुने फोटो किती उपयोगी पडतात. अलगदपणे आपल्याला दुसऱ्याच दुनियेत घेऊन जातात.

आईबरोबरचा कृष्णधवल फोटो, मग लग्नातले रंगीत पण हळू हळू रंग फिकट पडलेले फोटो ती पाहू लागली. फोटोतले रंग जणू आपल्या आयुष्याची कथाच सांगतायत असं तिला मनोमन वाटून गेलं. पुढच्या पानावर निहारिकाचा -तिच्या मुलीचा - फोटो होता -पहिल्या वाढदिवसाला काढलेला. नंतर शाळेत पहिली/दुसरीतला.. मग काही ती आणखी मोठी झाल्यावरच होते. मिड्लस्कुल मध्ये गेली व शाळेत 'स्पेलिंग बी' जिंकली तेव्हाचा.. मग हायस्कुल ग्रॅज्युएशनचा .. स्टॅनफोर्डला प्रवेश मिळाला तेंव्हाचा ..

"किती गोंडस होती ना निहू! कधी मोठी झाली कळलंच नाही!" क्षमाच्या मनात विचार अन् त्याबरोबर डोळ्यात पाणी तरळायला लागले.. एकदम तिला निहारिकाचे शब्द आठवले.

'यू आर रेसिस्ट मॉम अँड यू वोन्ट इव्हन ॲडमिट इट!"

क्षमा विचार करायला लागली: आपली निहू आपल्या नकळत कधी एवढी मोठी झाली? एव्हढं सहजतेने आपल्याला उलटून बोलली आणि धाडकन दार लावून निघून गेली. आपण तिच्या वयाचे असताना कधीच मोठयांना उलट बोलायचो नाही.. आता तरी कुठं बोलतो? आपलंच चुकलं का काही?"

चार वर्षांपूर्वी जेव्हा निहारिकाला स्टॅनफोर्डला प्रवेश मिळाला तेव्हा किती आनंद झाला होता आपल्याला. घरापासून ती लांब जाणार, एकटी राहणार याचं दुःख, काळजी होतीच, पण तिन स्वतःच्या बुद्धिमत्तेवर मिळवलेल्या यशाचाही खूप अभिमान होता. पण गेल्या तीन-चार वर्षात ती इतकी बदलेल असं वाटलं नाही. मागच्या आठवड्यात ती घरी आली तेंव्हा किती आनंद झाला. पण तेव्हापासूनच ह्या वादाला तोंड फुटलं.. क्षमाला तो प्रसंग पुन्हा जशाचा तसा आठवला..

* * *

निहारिका फोन वर काहीतरी टेक्स्ट करत, फोटो बघत सोफ्यावर बसली होती. ती आल्यापासनं क्षमाची कोण धांदल सुरु होती. दोन आठवड्याची सुट्टी, लेकीसाठी काय करू आणि काय नको असं तिला झालं होतं. तिच्या आवडीचे मोदक करायचा घाट घातला होता. सहज जाताना क्षमानं तिच्याकडं पाहिलं - आणि फोनवरचा फोटो पाहून क्षमा हादरलीच!

"निहू - कोण ग - कुणाचा फोटो तो?"तिनं न राहून विचारलं.

"नो वन मॉम - जस्ट अ फ्रेंड.. " तिनं उडवाउडवीचे उत्तर दिलं.

"दाखव, दाखव बघू मला " क्षमानं हेका कायम ठेवला.

"इट्स नथिंग मॉम - " निहूनं परत उडवाउडवीचा प्रयत्न केला.

"मला दाखव म्हटलं ना ग मी.." तिचं आईपण तिच्या नकळत पुढं झालं.

"मॉम! तुला प्रायव्हसी ही गोष्ट कळत नाही का!"

"निहू - मला आत्ता बघत होतीस तो फोटो दाखव - आणि कोण आहे तो सांग.. "

“अमेरिकन प्रायव्हसीचा” आईच्या प्रेमापुढे टिकाव लागणं शक्य नव्हतं! आणखी वाद नको, म्हणून थोड्याश्या नाखुषीनेच निहारिकानं फोटो अॅप उघडलं आणि दुसराच एक फोटो काढला.

"धिस वन मॉम? सी व्हॉट यू वॉन्ट"

त्या फोटोत निहारिका आणि तिचे दोन, तीन मित्रमैत्रिणी बीचवर उभे होते..

"निहू - डोन्ट फूल मी! मी थोडासाच  पाहिला तो फोटो - कोण होता तो मुलगा?"

आई आपली ब्याद सोडणार नसल्याचं निहारिकाच्या लक्षात आलं. तिनं एक सुस्कारा सोडला; पण मनाशी काहीतरी ठरवत ती ठामपणे बोलायला लागली.

"वेल - यू हॅव टू फेस इट सम डे .. व्हाय नॉट टुडे?"

क्षमा पुढं काय वाढून ठेवलंय ह्याची प्रतीक्षा करत तिच्याकडं बघत राहिली.

निहारिकानं फोनवर फोटो काढला - तोच जो क्षमानं ओझरता पहिला होता.  फोन क्षमाच्या समोर धरून निहारिका म्हणाली,  "मॉम, धिस इज रॉबर्ट - माय बॉयफ्रेंड . वी आर लिविंग टुगेदर फॉर दि लास्ट इयर ऑर सो अँड प्लॅन टू मॅरी आफ्टर आय फिनिश स्कूल"

एकेक शब्द तप्त लाव्ह्याप्रमाणे क्षमेच्या कानावर पडले.  फोटोत निहारिका रॉबर्टचं चुंबन घेत होती - आधीचा फोटो जिथे  काढला  त्याचं  बीचवर  हा  फोटो काढला असावा.  क्षमा हतबुद्ध होऊन त्या फोटोकडे पाहत होती. गोऱ्यापान निहारिकाच्या कमरेभोवती त्याचा हाताचा विळखा क्षमाला पाहवेना. राग आणि गोंधळ यांचं एक विचित्र मिश्रण तिच्या चेहऱ्यावर दिसायला लागलं.

'  अगं, काय हे निहू? अगं, काय केलंस हे?"

"व्हॉट मॉम, तू एवढी ओव्हर रिऍक्ट का होते आहेस तेच कळत नाहीये मला !  चिल मॉम.. यू  अँड  डॅड  विल मीट  रॉबर्ट... इन ड्यू टाईम. "

"अग दुसरा कोणी मिळाला नाही का तुला?"  क्षमा सहजपणे बोलून गेली..

"व्हॉट? व्हॉट डू यू मीन बाय 'दुसरा कोणी'  मॉम?" हीच का आपली आई अशा चेहऱ्याने निहारिकानं पाहिलं.

खरं तर क्षमाचा  निहारिकाला  बॉयफ्रेंड असण्याबद्दल आक्षेप नव्हता. लिव्ह-इन तर आता भारतात पण स्वीकृत झालं होतं . त्यामुळं अमेरिकन संस्कृतीत तर तो प्रश्नच नव्हता.  पण तरी काहीतरी तिला खटकत होतं. कारण त्या फोटोतला तो मुलगा - रॉबर्ट - हा एक कृष्णवर्णीय, आफ्रिकन अमेरिकन होता.

"अग - हा काळाच मिळाला का तुला एवढ्या विद्यापीठात?"

निहारिका डोळे विस्फारून पाहायला लागली..

"आय डोन्ट बिलिव्ह इट --यु आर सेयिंग धिस मॉम!  हाऊ कॅन यू से इट?  दॅट अल्सो आफ्टर कमिंग फ्रॉम इंडिया !

यू नो व्हॉट - यू से सो बिकॉज यू आर फ्रॉम इंडिया - यू कान्ट हेल्प इट !! "

"  लिसन् निहू ...ऐक जरा माझं  " क्षमा आर्जव करत बोलली .. पण निहारिका काही ऐकायच्या मनस्थितीत नव्हती.

"यू नो व्हॉट - यू आर रेसिस्ट मॉम अँड यू वोन्ट इव्हन ऍडमिट इट!"  - एवढं बोलून ती तिच्या खोलीत निघून गेली व धाडकन दार लावून घेतलं..

सारणाची वाट बघत मोदक तसेच राहिले..  भूक तर केव्हाच उडून गेली होती.

* * *

क्षमा अजून विचारात मग्न होती..

खरंच का आपण रेसिस्ट आहोत? कसं शक्य आहे?  बागकाम करणाऱ्या होजेला दर शनिवारी आपण किती प्रेमानं चहा आणि नाश्ता देतो.. आणि समोरच्या संजनाबरोबर तर किती छान मैत्री आहे आपली. उलट ती पाकिस्तानची असूनही आपली एवढी मैत्री आहे म्हणून इतर काही मैत्रिणींना अचंबा वाटतो. अन् घरी हाऊस

कीपिंग साठी येणारी रुकसाना - ती तर मिडल ईस्टची आहे. पण तिच्याशी किती छान वागतो आपण ? शिवाय शशांकचे मित्र आणि क्लायंट्स - कुठं कधी फरक पडला आपल्याला ते कुठले आहेत ह्याने? छे - निहू लहान आहे अजून, तिला नाही कळत...किती पुढचा विचार करावा लागतो..

क्षमाला आठवलं -- तिचं लग्न ठरलं तेंव्हा सुद्धा तिची मावशी म्हटली होती की शशांक जरा काळसर आहे - पण आपण त्याची कर्तबगारी ओळखली आणि लग्नाला होकार दिला. किती विचारपूर्वक निर्णय घेतला आपण.. अन् आपल्याला असं कसं म्हणते निहू?

शशांक घरी परत आल्यावर क्षमानं त्याच्याशी बोलायला विषय काढला..

"आपली निहू कधी मोठी झाली कळलंच नाही, हो ना?" जरा त्याचा मूड चाचपडत ती म्हणाली.

"हं -- आपणही कुठं लहान राहिलोय आता!" शशांकनं मोघम उत्तर दिलं.

"हो - पण घराबाहेर पडल्यापासून ती हाताबाहेर गेल्यासारखी वाटतेय!"

"हाताबाहेर? म्हणजे काय? उलट आता तिचं ग्रॅज्युएशन संपेल आणि हाताशी येईल म्हण ! "

"तसं नाही हो .. आयुष्याचे मोठे निर्णय स्वतःचे स्वतः घ्यायला लागलीय - आपल्याला सांगतसुद्धा नाही मग विचारणं दूरच राहिलं!"

"ऑफ कोर्स! शी इज अन ऍडल्ट नाऊ!" शशांकनं प्रश्न उडवायचा प्रयत्न केला.

"तसं नाही हो - पण तिचा ... "

"का? आता काय झालं नवीन?" क्षमाचं वाक्य अर्धवट तोडत शशांकनं विचारलं.

क्षमानं तिचा आणि निहारिकाचा संवाद सांगितला आणि फोटोमधल्या कृष्णवर्णीय रॉबर्टबद्दल सांगितलं.

"आणि -- आणि वर निहू मला म्हणाली की मी रेसिस्ट आहे. कसं हो असं म्हणू शकते ती! किती केलं आपण तिच्यासाठी आणि मी किती चांगली वागते तिच्या सगळ्या मित्र मैत्रिणीबरोबर. " थोड्या रडकुंड्या स्वरात क्षमा म्हणाली.

"हं.. असा इश्यू आहे तर!" - थोडासा विचारमग्न होत शशांक बोलता झाला.

"मला वाटतं तुझा प्रॉब्लेम वेगळा आहे. रेसिस्ट नसशीलही तू - पण निहूचा बॉयफ्रेंड म्हणून तुला एका ब्लॅक मुलाचा स्वीकार करणं जड जातंय. हे सगळं पूर्वसंस्काराचं फळ आहे. "

"अहो, तुम्हीही असं काय बोलताय .. " क्षमा अचंबित होऊन म्हणाली. नवरा आपली बाजू घेईल, यातून काहीतरी तोडगा काढेल ही तिची अपेक्षा फोल ठरली.

तिचं फारसं मनावर न घेता शशांक म्हणाला "आता हेच बघ ना - कुठला कोण तो जॉर्ज फ्लॉइड - तो गेला म्हणून आपण हळहळतो, 'ब्लॅक लाइव्ह्ज् मॅटर' चं चित्र फेसबुक वर लावतो, चळवळीला पाठिंबा देतो पण तरीही निहूचा बॉयफ्रेंड फक्त ब्लॅक आहे म्हणून तो तुला नको वाटतो. बाकी त्याचं शिक्षण, नोकरी किंवा तो व्यक्ती म्हणून तो कसा आहे हे सगळे मुद्दे तुला गौण वाटतात! तिचे शाळेतले मित्र/मैत्रीण कुणीही असले तरी तुला फरक पडला नाही पण अशी व्यक्ती आपल्या कुटुंबाचा एक संभाव्य घटक म्हणून स्वीकारणं तुला जड जातंय."

"कसं जमेल निहूला हे? आई वडील म्हणून आपण काळजी नको करायला?"

"त्यानं काय होईल? निहू आता एक स्वतंत्र व्यक्ती आहे. तिचं आयुष्य कसं जगायचं, त्यासाठी काय निर्णय घ्यायचे याचं तिला पूर्ण स्वातंत्र्य असायलाच हवं."

"म्हणजे - तिला वाटेल तसं जगू द्यावं चुकीचे निर्णय घेऊ द्यावे?"

"निर्णय चुकीचा का बरोबर हे आपण कोण ठरवणारे? आपण फक्त आपल्या दृष्टीकोनातून बघणार, आपल्या मध्यमवर्गीय अपेक्षा आणि सुरक्षिततेची भावना तिच्यावर लादणार यात काय अर्थ आहे? तिची ती समंजस आहे आणि समजा चुकीचे निर्णय घेतले तिनं तरी त्याला तोंड द्यायला ती खंबीर आहे. त्यातूनच तर ती शिकणार आहे आणि स्वतःचं आयुष्य घडवणार आहे."

"पण आपली संस्कृती?"

"तिचं काय? संस्कृती म्हणजे स्थायी मालमत्ता थोडीच आहे. ती नेहमी प्रवाही असते! आपले आजी आजोबांची, आई वडिलांची पिढी बघ -- आणि आपली - किती बदललो आपण! पूर्वी समुद्र ओलांडून परदेशी जाणं म्हणजे पाप समजलं जायचं - आणि आता ती अभिमानाची बाब झालीय! शिवाय आपली मुलगी

असली तरी निहू अमेरिकन आहे. तिची मूल्यं ही आपल्यापेक्षा थोडी वेगळी असणारच आणि त्यांचा आदर करणं आणि स्वीकार करणं आवश्यक आहे."

असं म्हणत शशांकनं पुस्तक काढलं.. क्षमाकडं ते देत तो म्हणाला..

"हे कृष्णमूर्तींचं पुस्तक वाच - आपण आपले सगळे पूर्वग्रह घेऊन कसे संकुचित जगतो, स्वतःभोवती काल्पनिक भिंती कशा निर्माण करतो, त्यातूनच भीती कशी निर्माण होते आणि मानसिक गोंधळ कसा होतो -- साऱ्याचा उलगडा होईल तुला. रेसिस्ट वगैरे ही आपण लावलेली बिरुदं आहेत. माणसाला माणूस म्हणून बघायची, त्याच्या गुणदोषांसह स्वीकारायची तयारी करण्यासाठी तुला कृष्णमूर्ती उपयोगी पडतील."

क्षमाच्या डोळ्यात अश्रू जमा झाले होते. "कृष्णमूर्तींची जीवनभाष्ये" तिच्यासाठी नवीन दालने उघडणार होती, स्वतःकडे आणि जगाकडे बघण्यासाठी नवीन दृष्टी प्रदान करणार होती आणि तिला तिने स्वतःभोवती गुंफलेल्या अनामिक भीतीच्या कोषातून तिला मुक्त करणार होती, हा विश्वास तिच्या मनात निर्माण झाला होता. अर्थात हा स्वतःचा शोध होता - अन तो तिचा तिलाच घ्यायचा होता. क्षमानं खिडकीतून बाहेर पाहिलं. परत पाऊस पडायला सुरुवात झाली होती. अजूनही काळसर ढग आकाशात होते पण आता पश्चिमेकडे विलोभनीय इंद्रधनुष्य दिसत होतं.

*****************************************************************************

**उल्लेखनीय कथा-५**

**वेताळ**

**डॉ. शिरीष कीर्तने**

विक्रमादित्य पुन्हा त्या झाडाकडे निघाला. अमावास्येची रात्र. डोळ्यात बोट घातले तरी दिसणार नाही असा अंधार आणि त्याच्या जोडीला स्मशानशांतता - विक्रमादित्याच्या मनात विचार आला आणि त्याचे त्यालाच हसू आले. कारण तो स्मशानातच होता. डोळ्यात बोट घातले तर दिसणार कसे ? नाही म्हणजे बोट डोळ्याच्या जवळ आले तरी दिसणार नाही -असे म्हणायला काय होते...त्याने विचार केला. त्याने त्या झाडाकडे कूच केली. त्या झाडाशी पोहचताच त्याची नजर वर गेली. त्या अंधारातही त्याला ते प्रेत दिसले. झाडावर चढून त्याने दोर कापला आणि ते प्रेत खाली पडले. विक्रमादित्य खाली उतरला आणि त्याने ते प्रेत

खांद्यावर घेतले आणि त्याने चालायला सुरुवात केली. मागच्या अनेक वेळासारखेच त्यातला वेताळ त्याला प्रश्न विचारणार अशी त्याची अपेक्षा होती. पण क्षणभर ती भयाण शांतता चालूच होती. आणि मग वेताळाने बोलायला सुरुवात केली.

वेताळ म्हणाला, “अरे, मला वाटले तू निराश झालास आणि मला विसरून गेलास का काय? नाही म्हणजे चांदोबा मासिक बंद झाले आणि तू यायचे बंद झाले. माझी दर अमावास्येला तुला गोष्ट सांगायची सवय गेली. मला वाटले तू काही आता परत येणार नाहीस. पण तू नेटाने परत आलास. काय बरा आहेस ना? कोव्हीडच्या साथीतून तू सुटलेला दिसतोस. तुझ्या नावाने विक्रम संवत्सर अशी कालमोजणी असायची पण आजकाल कोव्हीड-पूर्व आणि कोव्हीड-नंतर असे म्हणण्याची प्रथा पडली आहे.” विक्रमादित्य काहीच बोलला नाही. मग वेताळच पुन्हा बोलू लागला, “अरे हो, मीच नाही का तुला सांगिंतले होते की तू जर बोलशील तर मी परत त्या झाडावर जाईन म्हणून . ठीक आहे. मग मला आता पूर्वीसारखी तुला एक गोष्ट सांगू दे आणि हो -ज्याप्रमाणे त्या मिशन इम्पॉसिबलच्या प्रत्येक एपिसोडमध्ये किंवा चित्रपटात असते त्याप्रमाणे -If you decide to accept it—and at the end - ही टेप जळून जाईल वगैरे -तसेच माझे पण म्हणणे तेच आहे. मी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर तुला माहित असून तू जर दिले नाहीस तर तुझ्या डोक्याची हजार शकले होतील आणि तुझ्याच पायावर पडतील आणि जगातला कुठलाही प्लास्टिक सर्जन त्यांना पुन्हा एकत्र करू शकणार नाही!”

वेताळाने गोष्ट सांगायला सुरुवात केली-

चीफ ऑफ स्टाफच्या खोलीत अविनाश बसला होता. चीफ ऑफ स्टाफ होऊन त्याला काही महिने झाले होते आणि अजून दीड वर्ष बाकी होते. खास काही काम नसणार अश्या समजुतीने त्याने ही जबाबदारी घेतली होती. पैसे खास नव्हते आणि प्रेस्टीजिअस पोझिशन असली तरी त्याचे अविनाशला काही अट्रॅक्शन नव्हते. तसे खास काम नसायचे. महिन्यातून ३-४ मीटिंग्सला जावे लागे. चहा - कॉफी आणि काही वेळा वाईन तर असायचीच ,पण बरेच वेळा जेवण पण असायचे. त्यामुळे चांगले होते. पण आजची गोष्ट जरा निराळीच होती. त्याला आता मीटिंगला जाण्यासाठी निघणे भाग होते. तो उठला आणि कॉन्फरन्स रूमकडे चालू लागला. तो जेव्हा पोहोचला तेव्हा हॉस्पिटलचा ऍडमिनिस्ट्रेटर आलेलाच होता. अविनाशने त्याला अभिवादन केले आणि तो खुर्चीत बसला. बाजूलाच कॉफी होती . अविनाशने पेला भरून कॉफी घेतली. “माहीत नाही ही मीटिंग किती वेळ चालणार ते”, त्याने विचार केला. झोप लागायला नको. त्यालाच हसू आले. आजची मीटिंग तशी इंटरेस्टिंग होती. पुढच्या तीन मिनिटात एक एक करून सर्व हजर झाले. ऍडमिनने मीटिंगला सुरुवात केली. त्याने अविनाशला गोष्ट सांगायला सांगितले. सर्वांना गोष्ट माहित होतीच. आता जर तुम्ही जांबुवंतासारखे एखाद्या गुहेत वर्षानुवर्षे झोपला असलां तर तुम्हाला ह्याबद्दल माहिती नसू शकेल, अविच्या मनात विचार आला. पण सर्व गोष्टी रीतसर झाल्या पाहिजेत. त्याने बोलायला सुरुवात केली. “तुम्हाला माहीतच असेल की चार दिवसांपूर्वी आपल्या गावात एक चोरी झाली. एका मॉम अँड पॉप ग्रोसरी स्टोअरमध्ये एका माणसाने संध्याकाळी गन दाखवून दुकानाच्या मालकाला -

कॅशियरला -पैसे द्यायला सांगितले - त्या मालकाने कॅश ड्रॉवर उघडताना त्याच्या बाजूला असलेली गन काढली. चोराने स्वतःची गन त्याच्याकडे रोखली होती आणि त्याने त्या मालकावर गोळी झाडली. त्या मालकाने पण पळणाऱ्या चोरावर गोळी झाडली. चोराची  गोळी त्या मालकाला छातीत लागली आणि तो खाली पडला आणि  मेला. चोर पळाला आणि चार तासाने आपल्या  इमर्जन्सी रूम मध्ये पायाला गोळी लागलेला एक पेशंट आला. त्याच्या पायाला - म्हणजे पोटरीच्या मध्ये गोळी लागली होती आणि तशी खास इजा झाली नव्हती. एक छोटीशी शस्त्रक्रिया करून गोळी काढणे शक्य होते." अविनाश थांबला त्याने एक कॉफीचा घोट घेतला. कॉफी गार झाली होती - पण आत्ता उठून नवा कप घेणे शक्य नव्हते. त्याने गोष्ट पुन्हा सुरु केली. “तर त्या चोराच्या पाठोपाठ पोलीस आले – “कॉप्स अँड रॉबर” सारखे”. खोलीतला ताण कमी करायचा त्याने प्रयत्न केला. काही लोक हसले. त्याने परत सुरुवात केली. “तर पोलिसांना त्या चोरीची माहिती मिळाली  होती आणि ते त्या चोराच्या शोधातच होते. गनशॉट लागलेला कोणी आल्याचे त्यांना कळले आणि ते आले. त्या चोरावर शस्त्रक्रिया करून गोळी काढायचे ठरले होते. अर्थात पोलीस त्याचीच वाट पाहत होते. त्याला लागलेली गोळी त्या स्टोअरच्या मालकाच्या पिस्तुलाच्या गोळीशी मॅच झाली- जुळली- की झाले!  तो परत थांबला. आत्तापर्यंतची गोष्ट सर्वांनाच  माहित होती.

नर्सिंग सुपरवायझरने प्रश्न विचारला,” पण मग आता घोडे कुठे अडले आहे? सर्जन नाही म्हणतो आहे का ऑपरेशन  थिएटर मिळत नाहीये?” त्याने तिच्याकडे पहिले. नर्सिंग सुपरवायझर असूनसुद्धा स्वतःच्या पायाखाली काय जळतंय ह्याचा हिला पत्ता नाही ह्याचे त्याला आश्चर्य वाटले. ऍडमिन मध्ये पडला, तो म्हणाला, “तो प्रश्न नाहीये. पण पेशंटचा कंसेंट -  त्याची सर्जरी करायला परवानगी - ती मिळत नाहीये.”

पण आपल्याला ज्ञान आहे हे दाखवायला काही लोकांना आवडते. ती परत म्हणाली “त्यात काय! आपण ऍडमिनिस्ट्रेटिव्ह परवानगी नाही का घेत ? बरेच वेळा तुम्ही सही केली आहे आणि मीपण अश्या  प्रसंगात सही केली आहे.” हॉस्पिटलचा काउंसिल मध्ये पडला. तो वदला, “मला काही गोष्टी क्लिअर करू द्या. म्हणजे मग आपल्यापुढच्या प्रोब्लेमवर आपल्याला चर्चा करता येईल. ह्या पेशंटच्या पायाला गोळीने जखम झालेली आहे. त्यावर शस्त्रक्रिया केली नाही तर तो मरणार नाही. आपण ऍडमिनिस्ट्रेटिव्ह परवानगी घेतो तेव्हा एखादे प्रोसिजर करणे जरुरी असते. अश्या वेळी थांबायला वेळ नसतो आणि पेशंट किंवा  त्याचे नातेवाईक ती देण्याच्या परिस्थितीत नसतात. उदाहरणार्थ, बेशुद्ध पेशंट...नातेवाईकांचा पत्ता नाही- त्यावेळी अशी परवानगी चालते. कारण प्रोसिजर केले नाही तर रोग्याचा जीव धोक्यात असतो आणि नातेवाईकांची वाट पाहणे शक्य नसते. ह्याचे उत्तम उदाहरण म्हणजे लंग कोलॅप्स झालेले असता छातीत ट्यूब टाकणे किंवा ब्लड प्रेशर बरेच कमी झालेलं असता सेंट्रल लाईन टाकणे वगैरे. ह्या केसमध्ये असे नाही. तो पेशंट शस्त्रक्रियेला नाही म्हणाला तर आपल्याला काहीच करता येणार नाही. Administrative consent will not work in this case”.

खोलीत शांतता पसरली होती. आता पुढे काय करायचे ह्याबद्दल निर्णय घेणे जरूर होते. अविनाश म्हणाला, “आपल्या स्टाफवरचा एकही सर्जन पेशंटच्या परवानगीशिवाय ह्या पेशंटवर सर्जरी करणार नाही”. चीफ ऑफ सर्जरी म्हणाला, “मग आता काय करायचे? नाही म्हणजे पोलिसांचे काय म्हणणे आहे?

त्यांच्याकडे काहीतरी मार्ग असणारच." अविनाश म्हणाला, "पूर्वी अश्या केसेस झाल्या आहेतच. जेहोवा विटनेसच्या पेशंटने ब्लड ट्रान्सफ्युजन घेण्यास नकार दिला. तसेच काही वेळा लहान मुलाच्या पालकांनी ट्रीटमेंट करण्यास नकार दिला असता कोर्टापुढे अश्या केसेस आलेल्या असणारच. त्यावेळी काय झाले? कोर्टाने काय निर्णय दिला?"

शेवटचा प्रश्न हॉस्पिटलच्या वकिलाला केला होता. त्याने उत्तर दिले. "xxxxx".

वेताळाने गोष्ट संपवली होती. त्याने काही क्षणांत बोलणे परत सुरू केले.
"तर राजा, ह्या प्रश्नावर तुझे उत्तर काय आहे ? तुला काय वाटते? पोलिसांनी काय करावे? सर्जनने पेशंटच्या इच्छेच्या विरुद्ध सर्जरी करावी का? आणि तुला माहीतच आहे की ह्या प्रश्नाचे उत्तर तुला माहित असून तू जर दिले नाहीस तर तुझ्या डोक्याची हजार शकले होतील आणि कुठलाही प्लास्टिक सर्जन ती पुन्हा जोडू शकणार नाही."

विक्रमादित्याने एक क्षणभर मौन पाळले. आणि मग एकदम बोलायला सुरुवात केली-
"आता हा सर्व प्रकार कुठे झाला ह्यावर खरे तर उत्तर अवलंबून आहे. ही गोष्ट जर भारतात झाली असती तर पोलिसी खाक्या दाखवून - दोन थोबाडीत देऊन किंवा लाथ मारून त्याला सर्जरीला मंजूर केले असते. आता ही गोष्ट अमेरिकेत झाली असल्यामुळे ती कुठल्या राज्यात - ब्लू स्टेट का रेड स्टेटमध्ये-झाली आहे ह्यावर उत्तर अवलंबून आहे. काही राज्यात हल्ली अश्या गुन्हेगारांवर खटलाच होणार नाही आणि त्या दुकानदाराचीच चूक कशी होती हे सिद्ध होईल. त्यामुळे गोळी काढून त्याच्यावर खटला दाखल होण्याचा प्रश्नच उभा राहत नाही. आता तुझ्या प्रश्नाचे खरे उत्तर. हा प्रश्न पूर्वीपण कोर्टापुढे आलेला आहे. दारू पिऊन गाडी चालवणाऱ्या माणसाने अल्कोहोलचे रक्तातले प्रमाण मोजायला संमती दिली नाही तर काय करायचे ह्या प्रश्नापासून ते सहकार्य न देणाऱ्या संशयित गुन्हेगारावर शस्त्रक्रिया करून पिस्तोलची गोळी काढायची का नाही, हा प्रश्न कोर्टाने हाताळला आहे. अर्थात तू जर चॅटजीपीटीला विचारले तर तुला चटकन उत्तर मिळाले असते."

विक्रमादित्याने एक दीर्घ श्वास घेतला. कारण ह्या चॅटजीपीटीच्या युगात आपले मौन भंग करून ह्याने त्रास दिला. त्याने बोलणे पुन्हा सुरु केले. ह्या तुझ्या गोष्टीत दोन प्रश्न आहेत. एक म्हणजे रोग्याच्या इच्छेविरुद्ध जाऊन सर्जरी करायला कुठला तरी सर्जन तयार होईल का? पण काही राज्यात अश्या डॉक्टरला कायदा मदत करतो. १९८५ साली अशीच एक केस हाय कोर्टात गेली होती आणि त्या वेळच्या ब्रेनन नावाच्या जजने आपले मत सांगितले होते. त्यात तो म्हणाला कीं प्रत्येक केसमध्ये योग्यता - अयोग्यता ठरविली पाहिजे. त्या वेळी अश्याच एका गुन्हेगाराने एका दुकानदाराला गोळी मारली. आणि ते दोघेही जगले. पण गोळीच्या अभावात केस कशी चालवणार असा प्रश्न पडला. खालच्या कोर्टाने उलट सुलट उत्तरे दिली आणि त्यामुळे ही केस शेवटी हाय कोर्टात गेली. अमेरिकेच्या कॉन्स्टिट्यूशन च्या चौथ्या कलमानुसार($4^{th}$ amendment ) अयोग्य-अवास्तविक 'शोध ' आणि 'काबीज' (UNREASONABLE SERCHES AND SEIZURES) करणे हे कायद्याच्या विरुद्ध आहे. पेशंटची परवानगी नसताना पेशंटच्या शरीरावर शस्त्रक्रिया करून गोळी काढणे, हे

कायद्याविरुद्ध होईल. त्यामुळे गोळी न काढता केस सिद्ध करता आली तर ते करणे जास्त योग्य आहे. त्यामुळे क्लोज सर्किट टीवी, किंवा एखादा साक्षीदार ज्याने ह्याला बाहेर जाताना पाहिले असेल अथवा अन्य काही पुरावा मिळाला तर बरे, नाहीतर ही केस कोर्टाकडे -अगदी हाय कोर्टाकडे जाणार, हे नक्की ! त्यावेळी त्या कोर्टात लिबरल आणि कॉँझर्व्हेटिव्ह जजचे काय प्रमाण आहे ह्यावर त्याचा निर्णय ठरणार!"

"म्हणतात ना की हजार गुन्हेगार सुटले तरी हरकत नाही पण एक निरपराधी माणसाला शिक्षा व्हायला नको. कोर्टात केस न्यावी आणि काय होतेय ते पाहावे. जर कोर्टाने परवानगी दिली तर गोळी काढावी. नाहीतर जो काही इतर पुरावा असेल त्याने केस करावी. त्या चोराचे पिस्तूल मिळाले तर त्याची गोळी आणि दुकानदाराला लागलेली गोळी मॅच करता येईल. अर्थात चोरांचे पिस्तूल मिळाले तर!"

विक्रमादित्याने उत्तर पुरे केले. पण वेताळ त्याच्या हातातून सुटला होता. जाताजाता त्याने राजाकडे पाहून एक विकट हास्य केले आणि म्हणाला, "सकर अगेन !!!!"

*****************************************************************

अक्षय भाषा AKSHAYBHASHA

A non-profit organization in Mesa, AZ, USA Tax ID # 30-0280809

<u>अक्षयभाषा निर्मिती</u>